दैनिक
जनप्रभात
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

■(आष्टी) वर्धा ■सोमवार, दि.२२ जानेवारी २०२४ ■ वर्ष २ रे ■अंक १९६ ■पृष्ठ ८ ■मुल्य ५.०० ■मुख्यसंपादक : राहुल गजरे ■कार्यकारी संपादक : अवधूत शेंद्रे RNI NO : MAHAR/2020/82242

ट्रकने सायकलस्वारास दिली धडक:महाबला येथील नायरा पेट्रोल पंप येथील घटना



प्रशांत झाडे सेलू : दिनांक २१ ला युवक आपल्या सायकलने आपल्या मूळ गावी टाकली खोडे येथे जाण्यास निघाला असताना त्यांना नागपूर वरून वर्धे च्या दिशेने जाणाऱ्या ट्रक ने धडक देऊन पसार झाला. जखमीचे नाव विनोद सुरेश चौधरी वय वर्ष ३५ असे असून सदर व्यक्ती हा मूकबधिर आहे. सदर घटनेची माहिती प्रज्वल लटारे यांना मिळताच त्यांनी सेलू येथील शासकीय ग्रामीण रुग्णालय सेलू येथे सदर जखमी व्यक्तीला उपचारा करिता दाखल केले.

मागासवर्ग आयोगातर्फे २३ जानेवारीपासून युद्धपातळीवर सुरु होणार सर्वेक्षण

यंत्रणा सज्ज ठेवा, गावोगावी दवंडी द्या, नागरिकांना माहिती द्या : अचूक, कालबद्धपणे काम व्हावे;चोवीस तास कॉल सेंटर सुरु ठेवा : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश

वृत्तसंस्था ■ नवी मुंबई

मराठा समाजाचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक मागासलेपण तपासण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोगामार्फत २३ जानेवारीपासून युद्धपातळीवर सुरु होणाऱ्या सर्वेक्षणासाठी सर्व शासकीय यंत्रणा सज्ज ठेवण्याची तसेच या कामाला सर्वोच्च प्राधान्य देऊन कालबद्धरितीने अचूक सर्वेक्षण करण्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज निर्देश दिले. गावोगावी दवंडी द्या, सूचना फलकांवर माहिती द्या, लोकांना या सर्वेविषयी कळू द्या, असे निर्देशही त्यांनी दिले.

ते आज वर्षा निवासस्थानी मराठा आरक्षणविषयक बैठकीत राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मनपा आयुक्त यांच्याशी दूरदृश्य प्रणालीद्वारे बोलत होते.या बैठकीस निवृत्त न्या. दिलीप भोसले, निवृत्त न्या. मारोती गायकवाड, निवृत्त न्या. संदीप शिंदे, महसूल अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, नगरविकास प्रधान सचिव डॉ के एच गोविंदराज, इतर मागास विभागाचे सचिव अंशू सिन्हा, विधि व न्याय सचिव श्री कलोते यांची उपस्थिती होती. प्रारंभी सामान्य प्रशासन



विभागाचे सचिव (सावीस) सुमंत भांगे यांनी मराठा आरक्षणासंदर्भात आजवर घेण्यात आलेल्या निर्णयांची माहिती दिली.

मागासवर्ग आयोगाच्या सर्वेक्षणाचे काम २३ जानेवारी ते ३१ जानेवारीपर्यंत होणार असून मराठा व बिगर मराठा खुला प्रवर्गाचे सर्वेक्षण करण्यात येईल. अशारीतीने राज्यातील अंदाजे अडीच कोटी कुटूंबांचे सर्वेक्षण होणार आहे. याकामी गोखले इन्स्टिट्युट, आयआयपीएस या नामांकित संस्थांची मदत होणार आहे.

सामाजिक भावनेने काम करण्याचे आवाहन

मराठा समाजाला टिकणारं आणि कायद्याच्या चौकटीत बसणारं आरक्षण मिळवून देण्यासाठी राज्यशासन कटीबध्द असून प्रशासनाने सुध्दा या अतिशय महत्वाच्या कामामध्ये पूर्णशक्ती एकवटून एक सामाजिक भावनेने हे काम करावे, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले.

गावोगावी दवंडी द्या, सूचना फलकांवर माहिती द्या

मुख्यमंत्री म्हणाले की, हे सर्वेक्षण अतिशय महत्वाचे असून तीनही शिफ्ट्समध्ये काम करावे. गावोगावी या सर्वेक्षणाबाबत दवंडी द्या, ग्रामपंचायतीच्या फलकांवर सुचना द्या तसेच विविध माध्यमातून लोकांना याविषयी माहिती द्या. सर्वेक्षणाला येणाऱ्या व्यक्तीला प्रत्येक घरातून माहिती मिळाली पाहिजे, म्हणजे परिपूर्ण आणि बिनचूक सर्वेक्षण होईल. सर्वेक्षणाच्या काळात तहसीलदार आणि सर्व संबंधितांनी दररोज आपल्या कामाचा अहवाल द्यायचा आहे.

२४ तास कॉल सेंटर सुरु ठेवा

यावेळी गोखले इन्स्टिट्यूटचे अजित रानडे यांनी सर्वेक्षणाबाबत माहिती दिली. शिक्षक, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, तलाठी असे सव्वा लाख पेक्षा जास्त प्रगणक आठ दिवसात हे काम पूर्ण करणार आहेत, असे ते म्हणाले. ३६ जिल्हे, २७ नगरपालिका, ७ कॅन्टोनमेंट क्षेत्रात प्रशिक्षण आजपासून सुरु झाले आहे.

यासंदर्भात मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, प्रगणकांचे तसेच अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण अतिशय व्यवस्थितपणे करा तसेच आपल्या अहवालात देखील प्रशिक्षण सत्र, बैठका या सर्व बाबींचे रेकॉर्ड ठेवा. न्या. गायकवाड अहवालातील त्रुटी दूर करणे गरजेचे आहे, असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, २००८ मधील अहवाल आणि सध्याचा मागासवर्ग आयोगाचा अहवाल यात नेमका काय फरक आहे आणि नव्याने कसा हा इंटेन्सिव्ह डेटा संकलित करण्यात येत आहे, हे व्यवस्थित तयार करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

वंशावळीसाठी तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली समिती करा

कुणबी नोंदीबाबत वंशावळी जुळविणे महत्वाचे असून नोंदीची प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी बार्टी तसेच इतर सक्षम संस्थेच्या तज्ज्ञांचे पथक तातडीने नेमण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला दिले. या पथकात मोडी भाषा तज्ज्ञ, तहसीलदार यांचा समावेश करा. ज्या गावांत अत्यल्प नोंदी सापडल्या आहेत, तिथे परत खातरजमा करण्यासाठी विशेष मोहीम राबवा, दवंडी द्या, तसेच पोलीस पाटील व खासगी व्यक्तींकडे काही कागदपत्रे असतील तर तीही स्वीकारा, असे मुख्यमंत्री म्हणाले.

ऑक्टोबरपासून १ लाख ४७ हजार कुणबी प्रमाणपत्रे वितरीत

निवृत्त न्या, संदीप शिंदे यांच्या समितीने काम सुरु केल्यापासून १ लाख ४७ हजार कुणबी नोंदी प्रमाणपत्रे संबंधिताना वितरीत करण्यात आले आहेत. एकट्या मराठवाड्यात ३२ हजार नोंदी आढळल्या असून १८ हजार ६०० कुणबी प्रमाणपत्रे दिली आहेत. न्या संदीप शिंदे समितीने लातूर, मराठवाड्यात बैठकीची दुसरी फेरी पण पूर्ण केली आहे अशी माहिती सुमंत भांगे यांनी यावेळी दिली.

२० फुटांच्या बांधकामावरुन पडून मजुराचा मृत्यू

कांढळी येथिल नव्याने सुरू होत असलेल्या बियाणे कंपनीतील घटना



समुद्रपूर ■ अमोल झाडे

समुद्रपुरः तालुक्यातील कांढळी येथे नव्याने सुरू होत असलेल्या बियाणे कंपनीच्या इमारतीचे लोखंडी यंगलचे काम करीत असताना मजूराचा २० फुट उंचीवरुन तोल जाऊन जमिनीवर पडून दुर्दैवी मृत्यू झाला.

प्राप्त माहितीनुसार कांढळी येथिल नव्याने उभारण्यात येणाऱ्या बियाणे कंपनीतीच्या इमारतीचे बांधकाम सुरू असुन १९ जानेवारीला दूपारच्या सुमारास या इमारतीवर लोंखडी यंगलचे काम करीत असताना हिरालाल तेजराम मिना वय ३३ वर्ष राहणार राजस्थान यांचा अचानक २० फुट उंच इमारतीवरून तोल गेल्याने खाली पडला त्यातच त्याचे डोक्याला मार लागल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला .हिरालाल तेजराम मिना हा १५ दिवसांपासून याठिकाणी काम करीत होता.घटनेची माहिती मिळताच ठाणेदार संतोष शेगावकर, पोलिस कर्मचारी विनायक खेकडे, विक्की मस्के, जयपाल सुर्यवंशी यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदना समुद्रपुर येथिल ग्रामीण रुग्णालयात दाखल केला.यावेळी कंपनी मालकाकडून मृत्यक हिरालाल तेजराम मिना याच्या कुटुंबियांना गट विम्याची रक्कम देण्यात आली.या घटनेचा पुढील तपास ठाणेदार संतोष शेगावकर यांच्या मार्गदर्शनात पोलिस उपनिरीक्षक अनिल दरेकर व पोलीस करीत आहे करीत आहे.

हिंदी विश्वविद्यालयात श्रीराम लला यांच्या प्राण-प्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त दीपोत्सव, आंतरराष्ट्रीय चर्चासत्र, सुन्दरकाण्डचे आयोजन

वर्धा ■ प्रतिनिधी

महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात अयोध्या येथे २२ जानेवारी रोजी आयोजित प्रभु श्रीराम लला यांच्या प्राण-प्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त दीपोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे विश्वविद्यालयातील सर्व इमारती आणि मुख्य स्थळांवर दीपक प्रज्ज्वलित करुन हा उत्सव साजरा करण्यात येणार आहे. या आयोजनाबाबत कुलसचिव डॉ. धरवेश कठेरिया यांनी शनिवार, २० रोजी ऑनलाइन माध्यमातून आढावा बैठक घेऊन सर्वांनी या उत्सवात सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन केले. अयोध्या नगरीत २२ जानेवारीला रोजी आयोजित प्रभु श्रीराम लला यांचा प्राण-प्रतिष्ठा समारंभाचे लाइव प्रसारण पाहण्याची व्यवस्था अध्यापक, अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी गालिब सभागृहात व महादेवी वर्मा सभागृहात तर शोधार्थी व विद्यार्थी यांच्यासाठी कस्तूरबा व सप्रे सभागृहात सकाळी ११:३० वा. करण्यात आली आहे. या निमित्त अज्ञेय संकुलमधील वशिष्ठ वाटिका परिसरात सांस्कृतिक उत्सव दुपारी २:३० वा. आयोजित होईल.



यावेळी सुन्दरकाण्ड पाठ व संकीर्तन करण्यात येईल. सायंकाळी ६ वा. भव्य दीपोत्सवाचे आयोजन करण्यात येणार असून सर्व इमारती आणि मुख्य स्थळांवर दीपक प्रज्ज्वलित करण्यात येईल. यानिमित्त सर्व इमारतींवर आकर्षक रोशनाईही करण्यात आले असून रांगोळयांनी परिसराची सजावट करण्यात येणार आहे. समता भवन प्रांगणात प्रभु श्रीरामजी यांचा सेल्फी पॉइंटही लावण्यात येणार आहे.

विश्वविद्यालय व महाराष्ट्र राज्य हिंदी अकादमी, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने 'सनातन परंपरा आणि मर्यादा पुरूषोत्तम श्रीराम' या विषयावर आंतरराष्ट्रीय चर्चासत्र कुलगुरु डॉ. भीमराय मेत्री यांच्या अध्यक्षतेखाली सकाळी ९:३० पासून गालिब सभागृहात आयोजित करण्यात आले आहे. चर्चासत्रात माजी कुलगुरु प्रो. जी. गोपीनाथन, अनुवाद व निर्वचन विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रो. कृष्ण कुमार सिंह, वाराणसीचे प्रो. श्रीनिवास पांडेय, क्वांगटोंग विश्वविद्यालय,चीन येथील डॉ. विवेकमणि त्रिपाठी, मुंबईचे प्रो. करुणाशंकर उपाध्याय विशिष्ट वक्ता म्हणून विचार मांडतील. चर्चासत्राचे समारोपीय सत्र महाराष्ट्र राज्य हिंदी अकादमी, मुंबईचे कार्यकारी अध्यक्ष प्रो. शीतला प्रसाद दुबे यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी २:३० वा. सम्पन्न होईल. याप्रसंगी वडोदरा, गुजरात येथील डॉ. स्वेता जेजुरकर, नवी दिल्लीचे रवि कुमार गोंड, चित्रकुटचे डॉ. करुणाशंकर द्विवेदी, हैम्बर्ग जर्मनीचे डॉ. रामप्रसाद भट्ट, हिंदी साहित्य विभागाचे अध्यक्ष प्रो. अवधेश कुमार विशिष्ट वक्ता म्हणून संबोधित करतील. कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. धरवेश कठेरिया, संयोजक, साहित्य विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रो. अखिलेश कुमार दुबे, सह-संयोजक, साहित्य विभागाचे अध्यक्ष प्रो. अवधेश कुमार यांनी केले आहे.

सावनेर पोलीसांकडुन अट्टल घरफोडीचा गुन्हेगारांना अटक



सावनेर ■ दिलीप येवले

८ गुन्ह्याची कबुली करून चोरीचा मुददेमाल हस्तगत करण्यात आला

पोलीस स्टेशन सावनेर येथे दाखल झालेले अप.क. २८/२४ कलम ४५८, ३८०, ५११ भादवी सहकलम ४. २६ आर्म अॅक्टमध्ये अटक केलेले आरोपी १. आकाश विलास लांजेवार (२४), २. सुरज संजय कोहळे (२१) दोन्ही रा. नंदनवन झोपडपटटी नागपुर यांना अटक करून त्यांचे कडुन घफोडी करने करीता वापरलेली कार आय २० कमांक एम.एच. ०२ ९७२५, एक तलवार व घरफोडीचे साहीत्य असा १,००,३९०/- रू. चा मुददेमाल जप्त करून त्यांचे कडुन पाटणसावंगी व सावनेर परिसरातील पोलीस स्टेशन सावनेर येथे दाखल असलेले घरफोडीचे ८ गुन्हे उघड करून चोरी केलेल्या मालापैकी सोनार अंकुश गणपतराय नेरकर (३३) रा. दिघोरी नागपुर व सचीन दत्तात्रय कावळे रा. इतवारी नागपुर यांचेकडुन १८.९९ तोळे सोने व ४ तोळे चांदीचे दागीने किमंत ६.७९,३४२/- रुपये असा एकुण ७,७९,७३२/- रूपये किंमतीचा एवज जप्त करण्यात आला आहे.

सदरची कामगीरी पोलीस अधिक्षक हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधिक्षक संदीप पखाले, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल मस्के, पोलीस निरीक्षक रवीन्द्र मानकर यांचा मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी नागवे, शरव भस्मे, चालक स.फी राजु कडु, पोलीस हवालदार रवीन्द्र चटप, अतुल खोडनकर, अविनाश बाहेकर, माणीक शेरे, बालक पोहवा प्रितम पवार, पोलीस नाईक रजंन काबळे, पो.शि. अंकुश मुळे, अशोक निस्ताने यांनी केली आहे.

दरवर्षी २२ जानेवारीला रामटेक येथे राम महोत्सव घेणार : देवेंद्र फडणवीस

महासंस्कृती महोत्सवाच्या तिसऱ्या दिवसाच्या कार्यक्रमाचा उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ

नागपूर ■ दिलीप येवले

प्रभू श्रीरामाच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या पवित्र रामटेक भूमीमध्ये दरवर्षी २२ जानेवारीला रामटेक महोत्सव राज्य शासनामार्फत घेण्यात येईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केली.

राज्याच्या सांस्कृतिक कार्य विभाग व जिल्हा प्रशासनामार्फत रामटेक येथे १९ ते २३ जानेवारी पर्यंत महासंस्कृती महोत्सव सुरू आहे.आज तिसऱ्या दिवशी ख्यातनाम भक्ती गीत गायक हंसराज रघुवंशी यांच्या कार्यक्रमाची सुरुवात करताना त्यांनी ही घोषणा केली. उद्या अयोध्या येथे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते राम लल्ला यांची राममंदिरात प्राणप्रतिष्ठा होत असल्याच्या शुभ दिनाची आठवण म्हणून रामटेक येथे दरवर्षी हा महोत्सव घेण्यात येईल, अशी घोषणा हजारो रसिक प्रेक्षकांच्या उपस्थितीत केली. यावेळी दीप प्रज्वलन करून त्यांनी आजच्या सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात केली.

यावेळी मंचावर रामटेकचे खासदार कृपाल तुमाने, आमदार ॲड आशिष जायस्वाल, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौम्या शर्मा,अप्पर जिल्हाधिकारी आशा पठाण, उपविभागीय अधिकारी वंदना सवरंगपते व मान्यवर उपस्थित होते.

रामटेकचा विकास आराखडा वर्षभरात अंमलात येईल व या



विकास आराखड्याच्या देखभाल दुरुस्तीसाठी कायमस्वरूपी निधीची तरतूद करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. विदर्भातील एक सर्वांग सुंदर धार्मिक पर्यटन स्थळ म्हणून रामटेकच्या विकासासाठी राज्य शासन वचनबद्ध असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक महोत्सवाची सुरुवात रामटेक सारख्या ऐतिहासिक स्थळावरून होत असल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक आमदार ॲड आशिष जायस्वाल यांनी केले.

गडमंदिर येथे घेतले श्रीरामाचे दर्शन

तत्पूर्वी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथील प्रसिद्ध व प्राचीन गड मंदिरात प्रभू श्रीरामाची आरती, पूजन केले व दर्शन घेतले.शहरात सुरू असलेला महासंस्कृती महोत्सव आणि अयोध्येत होत असलेल्या रामलल्ला प्राण प्रतिष्ठेच्या पार्श्वभूमीवर गड मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली. जिल्ह्यातील तरुण, महिला,अबाल-वृद्ध मोठ्या संख्येने गडावर आले होते. हातात भगवे झेंडे आणि मुखी जय श्रीरामच्या जय घोषाणे वातावरण निनादून गेले होते.

अशा भक्तीमय व उत्साहाच्या वातावरणात श्री. फडणवीस यांनी सायंकाळी गडावर प्रवेश केला. मंदिराच्या प्रवेशद्वारा शेजारील पटांगणात आयोजित आरतीत त्यांनी सहभाग घेतला. मंदिरात विराजित प्रभू श्रीरामाच्या मूर्तीचे पूजन करून त्यांनी आशीर्वाद घेतला. यावेळी रामटेकचे खासदार कृपाल तुमाने,आमदार ?ड.आशिष जयस्वाल, माजी आमदार मल्लिकार्जुन रेड्डी, विशेष पोलीस महानिरीक्षक छेरींग दोरजे, ग्रामीण पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार आदी उपस्थित होते. रामटेकच्या उपविभागीय अधिकारी वंदना सवरंगपते यांनी श्री. फडणवीस यांचे मंदिर समितीच्यावतीने शाल व श्रीफळ देवून स्वागत केले.

उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत कोराडी मंदिरात आज आनंदोत्सव

कोराडी ■ दिलीप येवले

श्री राम प्रतिष्ठापणा दिन : भरगच्च धार्मिक कार्यक्रम ६००० किलोंचा रामहलवा, २५,००० दीपमाळा उजळणार राज्याचे नेते तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत कोराडी येथील श्री महालक्ष्मी जगदंबा मंदिरात आनंदोत्सव साजरा केला जाणार आहे. मंदिरात मिष्ठान्न म्हणून ६००० किलोचा रामहलवा तसेच २५ हजार दीपमाळा उजळून प्रभू श्री राम प्रतिष्ठापणा दिनी दिवाळीसारखा उत्सव साजरा केला जाणार आहे.

श्री राम प्रतिष्ठापणा सोहळा हा भारताच्या धार्मिक, सांस्कृतिक तसेच एतिहासिक वारशाचा अभूतपूर्व सोहळा असून त्या निमित्त सर्व नागरिकांनी आपआपल्या घरावर भगवा ध्वज लावावा तसेच किमान पाच दिवे घराच्या प्रवेशद्वारावर लावून आनंदोत्सव साजरा करावा, कोराडी देवी मंदिरातील कार्यक्रमात सामील व्हावे, असे आवाहन भाजपा प्रदेशाध्यक्ष तसेच श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थानचे अध्यक्ष श्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या



प्रमुख उपस्थितीत अयोध्येत प्रभू श्री राम प्रतिष्ठापणा सोहळा असून या आनंदात सर्व भारतवासी सहभागी होत आहेत. कोराडी येथील श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थानचे अध्यक्ष तसेच भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्त्वात या सोहळ्यानिमित्त जय्यत तयारी केली आहे. मंदिरात सर्वत्र रोशनाई करण्यात आली आहे. प्रतिष्ठापणा झाल्यावर २५ हजार दिवे लावून दीपमाळा उजळविण्यात येतील. मिष्ठान्न म्हणून ६००० किलोचा रामहलवा प्रसाद शिजविला जाणार आहे.

मंदिर प्रशासन सेवेसाठी सज्ज

श्री महालक्ष्मी जगदंबा मंदिर प्रशासनाच्या वतीने भाविकांसाठी सर्व सुविधांची सोय करण्यात आली आहे. ज्येष्ठ नागरिक व अपंगांच्या दर्शनासाठी इलेक्ट्रीक व्हेईकलची सोय मंदिर प्रशासनाने केली आहे. पोलिस प्रशासनाकडूनही सर्व तयारी पूर्ण असल्याचा दावा करण्यात आला आहे. मंदिराच्या वतीने चालविण्यात येणारे अन्नछत्राचा लाभ व नजिकच्या रामायण सांस्कृतिक केंद्राला भेट देण्याचे आवाहन मंदिर प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

भाविकांची मांदियाळी

श्री राम प्रतिष्ठापणा सोहळ्या निमित्त शासकीय सुटी जाहीर केल्याने नागपूर जिल्ह्यासह संपूर्ण मध्य भारतातून भाविक येथे उपस्थित राहतील असे मंदिर प्रशासनाने कळविले आहे. सुमारे ३० हजारांहून अधिक भाविक सोमवारी मंदिरात दर्शन घेतील तसेच नागपूर जिल्ह्यातील मान्यवर तथा नेते उपस्थित राहून राम हलव्याचा प्रसाद घेणार आहे.

रामंदिरात आज महापूजा

कोराडी देवी मंदिर परिसरात असलेल्या राम मंदिरात १२.२० वा. प्रभू श्री रामाची महापूजा व आरती केली जाणार. सोबतच येथे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून सकाळी ९.०० वा. रामभक्त मिथिलेश तिवारी सुंदरकांडाचे पठण करणार आहेत.

१००० स्केअर फुटांची भव्य एलईडी स्क्रीन

अयोध्येतील प्रभू श्री राम प्रतिष्ठापणा दिनाच्या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपणासाठी मंदिर परिसरात विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. १००० चौरस फुटाची भव्य एलईडी स्क्रीन लावण्यात येणार आहे. यावरून प्रतिष्ठापणा दिनाचा कार्यक्रम हजारो भाविक थेट अयोध्येतील प्रतिष्ठापणा सोहळा पाहू शकतील.

सकाळी ६.३० वा सुरू होणार राम हलवा

श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान कोराडी तसेच श्रीमती विमलादेवी जैन ट्रस्ट व डी.पी. जैन यांच्या सहकार्याने या ६००० किलो रामहलवा तयार करण्यात येणार आहे. सुप्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर यांनी या राम हलव्याची रेसिपी तयार केली आहे. यासाठी १८०० किलो वजनाची भव्य कढई तयार करण्यात आली आहे. सकाळी ६.३० वा. रामहलवा शिजविणे सुरू होईल. सकाळी ९.३० वा. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहून रामहलवा शिजविण्यात मदत करणार आहेत.



संपादकीय...

अस्वस्थ तरुणांचे वर्तमान!...

भरती परीक्षांतील गोंधळावर तरुण आक्षेप घेत असतानासुद्धा सरकार पेपरफुटीविरुद्ध कठोर कायदाही करत नाही की लोकसेवा आयोगावरच जबाबदारीही देत नाही.राज्य, प्रदेश वा देश यांच्या विकासासाठी भौतिक पायाभूत सुविधा अत्यावश्यक हे खरेच. म्हणजे आधुनिक गतिमान रस्ते, महामार्ग, रेल्वे, विमान सेवा, वेगवान इंटरनेट इत्यादींची गरज असतेच असते. पण कोणतेही राज्य, प्रदेश वा देश यांत अत्यंत पायाभूत असतो तो विद्यार्थीवर्ग. जनसामान्यांसाठी भौतिक सोयी-सुविधा निर्माण करीत असतानाच उद्याचे नागरिक असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आश्वासक सोयी-संधी निर्माण करत राहणे हे कोणत्याही प्रदेशासाठी भविष्याची बेगमी करणारे असते. खराब, खड्डेयुक्त रस्त्यांमुळे वाहतुकीचा वेग मंदावेल; पण निराश, हताश विद्यार्थीवर्गामुळे ते राज्य वा प्रदेश आपले गती-प्रेरणाच हरवून बसेल. सध्या महाराष्ट्रातील विविध विद्यार्थीवर्गातील खदखद पाहता हा धोका आपल्या राज्यकर्त्यांनी ओळखायला हवा. गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने कानावर आदळणाऱ्या पेपरफुटीच्या बातम्या नोकरीच्या प्रतीक्षेत असलेल्या राज्यभरच्या लाखो सुशिक्षित बेरोजगारांच्या संतापात भर टाकणाऱ्या आहेतच, शिवाय त्या राज्य सरकारच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उभ्या करणाऱ्या आहेत. सध्या वारंवार येत असलेल्या तलाठी आदी भरतींतील कथित घोटाळ्यांच्या बातम्या आणि विद्यार्थ्यांतील असंतोष या प्रश्नचिन्हांची जाणीव करून देतात. उद्याच्या पिढीची ही खदखद वेळीच ओळखायला हवी.नोकरीच्या संधी व बेरोजगारीचे प्रमाण कायम व्यस्त राहत असल्याने कुठलीही नोकरभरतीची प्रक्रिया ही पारदर्शक, त्यात सहभागी होणाऱ्या उमेदवारांचा विश्वास जिंकणारी असायला हवी. याकडे लक्ष देणे हे कुठल्याही सरकारचे कर्तव्यच. गेल्या दोन सरकारांच्या काळात या मूलभूत गरजेकडे वारंवार दुर्लक्ष होत असल्याचे दिसते. ही बाब अशोभनीय. मात्र सत्ताधाऱ्यांना त्याचे काहीही सोयरसुतक आहे, असे म्हणणे धार्ष्टयाचे ठरेल. तलाठी भरतीतील घोळ समोर आल्यानंतर महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे धमकीवजा विधान हेच दर्शवते. राज्यात सुमारे ३० ते ३५ लाख तरुण सरळसेवा भरतीतून सरकारी नोकरीत येण्याच्या प्रतीक्षेत आहेत. अतिशय प्रतिकूल स्थितीत अभ्यास करून नोकरी मिळेल या आशेवर जगणाऱ्या या तरुणाईला वारंवार अपेक्षाभंगाच्या दुःखाला सामोरे जावे लागणे हे दुर्दैवी म्हणून सोडून देता येणारे नाही. करोनाकाळात खासगी कंपन्यांकडून परीक्षा घेण्याचा सरकारचा निर्णय आरोग्य खात्यातील भरतीच्या वेळी वादग्रस्त ठरला. यावरून नामुष्की ओढवल्यावर ही भरतीच रद्द केली गेली व 'टीसीएस' व 'आयबीपीएस' या नामांकित कंपन्यांना हे काम देण्यात आले. 'टीसीएस' ही टाटा समूहातील अग्रगण्य कंपनी तर 'आयबीपीएस'ला केंद्रपातळीवरील नोकरभरतीचा दीर्घ अनुभव. त्यामुळे तरुणांनी या निर्णयावर विश्वास ठेवला, पण आता त्यालाच तडा जात असल्याचे दिसून आले. 'टीसीएस'च्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या नातेवाईकांना या भरतीत फायदा पोहोचवणे व लातूरसारख्या ठिकाणी प्रश्नपत्रिका फोडण्याचा गुन्हा दाखल होणे या अलीकडे 'लोकसत्ता'ने उजेडात आणलेल्या दोन घटना. त्यामुळे विश्वास तरी कोणावर ठेवायचा असा प्रश्न या भरतीकडे डोळे लावून बसलेल्या तरुणांना पडलेला दिसतो. महायुतीने सत्तेत आल्यावर ७५ हजार जागा भरू असे जाहीर केले. त्यासंबंधीचा शासकीय आदेश प्रसृत करताना एक लाखापेक्षा कमी उमेदवार असतील तर प्रति उमेदवार नऊशे रुपये, दोन ते तीन लाख असतील तर आठशे व पाच लाख असतील तर ४७५ रुपये प्रवेश शुल्क आकारू असे सांगितले. यानंतर झालेल्या बहुतांश परीक्षांमध्ये पाच लाखांपेक्षा जास्त उमेदवार सामील झाले. तरीही नऊशे रुपयेच शुल्क आकारले गेले. हे कसे? ही वसुली कशासाठी करण्यात आली? एकीकडे अशा शुल्कांतून सणसणीत कमाई करायची आणि त्याच वेळी दुसरीकडे निवड प्रक्रियादेखील घोळविरहित ठेवायची नाही. म्हणजे विद्यार्थ्यांसाठी 'इकडे आड आणि तिकडे विहीर' अशीच अवस्था. अशाने नोकरीच्या प्रतीक्षेत वर्षानुवर्षे रखडणाऱ्या तरुणांस वैफल्य छळणार आणि हे वैफल्यग्रस्त तरुण उमेदवार यावर चिडणार यात आश्चर्य ते काय. असे झाल्यावर सरकार या तरुणांनाच दमदाटी करणार. हे कायद्याचे राज्य? अलीकडे झालेल्या सर्वच परीक्षांमध्ये गैरप्रकार होत असल्याचे निदर्शनास येते. कधी परीक्षा केंद्रावरच्या कर्मचाऱ्यांच्या सक्रिय सहकार्याने तर कधी उच्च तंत्रज्ञानाच्या मदतीने पेपर फुटतो वा प्रश्नांची उत्तरे पुरवली जातात. तरीही सरकारला जाग येत नसेल तर ही तरुणाईशी केलेली प्रतारणा नाही का? भरती प्रक्रियेची जबाबदारी असलेल्या या विविध यंत्रणांकडे संपूर्ण राज्यभर परीक्षा घेण्यासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा नाहीत. त्यावर तोडगा म्हणून या कंपन्या विविध संगणक प्रशिक्षण केंद्रांना हाताशी धरतात. या केंद्रांतील संबंधितांनाच हाताशी धरून गैरप्रकार झाल्याचे मराठवाडा व विदर्भात अनेक ठिकाणी उघडकीस आले. तरीही सरकार आम्ही करतो ते योग्यच असा दावा कशाच्या बळावर करते? परीक्षा केंद्रे हाताळणारे, प्रश्नपत्रिका फोडणारे, सामूहिक कॉप्या करणारे अशा टोळयाच आता राज्यात तयार झालेल्या आहेत. त्यांच्या पाठीशी नेमके कोण आहेत? याची साधी चौकशीही करायची तयारी राज्यकर्ते दाखवत नाहीत. हा उद्दामपणा नाही तर आणखी काय? मागे 'टीईटी'-शिक्षक पात्रता- परीक्षेत घोटाळा झाला म्हणून परीक्षा आयुक्तालाच अटक झाली. शिक्षण खात्यातील सचिव दर्जाचा सनदी अधिकारी गजाआड गेला. त्याला पुन्हा आता सेवेत घेण्यात आले. यातून सरकारला नेमका कोणता संदेश बेरोजगार तरुणांना द्यायचा आहे? अलीकडेच अर्थ व सांख्यिकी खात्यातील भरतीचा निकाल संशय निर्माण करणारा ठरला. कंपनीने निवड केलेल्या उमेदवारांच्या यादीत या खात्यातील काहींनी इतर नावे घुसवली, असा उमेदवारांचा आक्षेप आहे. त्याचे निराकरण करण्याची जबाबदारी सरकारची नाही काय? प्रत्येक परीक्षेतील गोंधळावर तरुण आक्षेप घेत असतानासुद्धा सरकार पेपरफुटीविरुद्ध कठोर कायदाही करायला तयार नाही. राज्यात असे प्रकरण उघडकीस आले की विद्यापीठ कायदा व माहिती तंत्रज्ञान कायद्यातील तरतुदीनुसार गुन्हा दाखल होतो. पण तो जामीनपात्र आणि त्यात जास्तीत जास्त सहा महिन्यांची शिक्षा. याचा फायदा घेत फूट प्रकरणातील अनेक आरोपी जामिनावर सुटले व नव्याने गैरप्रकार करू लागले. हे लक्षात येऊनसुद्धा सरकार ढिम्म असेल तर त्यातून नेमका कोणता अर्थ काढायचा? राजस्थान व उत्तराखंड या दोन राज्यांनी नव्याने कठोर कायदा करून अशा गुन्ह्यांतील आरोपींस किमान दहा वर्षे व कमाल जन्मठेपेच्या शिक्षेची तरतूद केलेली आहे. असा कठोर कायदा करा अशी तरुणांची मागणी असूनही त्यासाठी चालढकल का चालवली जात आहे? केवळ आश्वासन देऊन व समिती नेमून निवडणुकीपर्यंत वेळ काढायचा हाच सरकारचा हेतू यातून स्पष्ट दिसतो. हे सारे लक्षात येत असल्याने राज्यातला सुशिक्षित तरुण कमालीचा अस्वस्थ आहे. प्रत्येक गैरप्रकाराविरुद्ध सरकारकडे दाद मागणे व आंदोलने करणे यापलीकडे त्याच्या हातात काहीही नाही. या तरुणांची न्यायालयात जाण्याची ऐपतही नाही. अशा स्थितीत राज्य लोकसेवा आयोगाकडून नोकरभरतीची प्रक्रिया राबवणे हाच एकमात्र उपाय शिल्लक राहतो. त्यासाठी सरकार का तयारी दर्शवत नाही? या आयोगाची गरजच नसेल तर तो गुंडाळून तरी टाका. आयोग ठेवायचा आणि त्यास शासकीय भरतीचे नियोजित कामही द्यायचे नाही, यात काय शहाणपणा? केरळसारख्या सुशिक्षित राज्यात सर्वच शासकीय भरत्या आयोगामार्फतच होतात. अशा वेळी या आयोगाला अधिक सक्षम करणे, मनुष्यबळ पुरवणे यासाठी आता सरकारने पुढाकार घेतला नाही तर या अस्वस्थ तरुणाईच्या संतापाचा आणखी उद्रेक होईल आणि तो याच काय, कोणत्याही सरकारला परवडणारा नसेल. पूल, रस्ते बांधण्याप्रमाणेच तरुणांतील अस्वस्थता दूर करणे हीदेखील पायाभूत सुविधाच आहे.

ईव्हीएम हटाव; भारतदेश बचाव!

(ईव्हीएम मशीन विरोधी आंदोलन विशेष)...



सध्या देशभरात निवडणुका होत आहेत. सन २०१४च्या निवडणुकांमध्ये ईव्हीएम मशीन्स हॅक करण्यात आल्या होत्या, असा दावा अमेरिकास्थित तंत्रज्ञाने केला. भारताच्या निवडणूक आयोगाने मात्र हा दावा फेटाळून लावला होता. मात्र तरीही या यंत्रांच्या विश्वासार्हतेबद्दल शंका आहे. या मशीन्सच्या कामकाजासंदर्भात तसंच विश्वासार्हतेबद्दल न्यायालयात सात आक्षेप मांडण्यात आले आहेत. मात्र निवडणूक आयोगाने हे आक्षेप मोडून काढत मशीन्समध्ये फेरफार करता येत नाही, असा दावा केला आहे. परंतु यावर विश्वास बसत नाही, यंत्र आहे, त्यात काहीही करामती होऊ शकतात. सर्व पक्ष, संघ, संघटना आणि मतदारराजांनी या अविश्वसनीय यंत्रांवर एकजुटीने एकमुखी बंदी घातलीच पाहिजे. श्री कृष्णकुमार लक्ष्मी-गोविंदा निकोडे गुरूजींचा हा मार्गदर्शक प्रेरणादायी लेख... संपादक.

देशातल्या सोळा लाख मतदान यंत्रांमध्ये प्रत्येकी दोन हजार मतांची गणना होते, कारण कोणत्याही मतदान केंद्रावर अधिकृत मतदारांची संख्या दीड हजारांहून जास्त नसते. वीजपुरवठा अनियमित असणाऱ्या ठिकाणीही ही यंत्रे वापरली जाऊ शकतात. प्रशासनातर्फे चालवण्यात येणाऱ्या इलेक्ट्रॉनिक्स कंपनीमधील अभियंत्यांनी या यंत्रांची निर्मिती केली आहे. या मशीन्स आणि त्यांचा तपशील याची माहिती अभियंत्यांचा गट सोडला, तर कोणालाही माहिती नाही, असा दावा संबंधितांतर्फे करण्यात येतो. मशीनवरचं बटण दाबून मतदार आपलं मत नोंदवतात. आणखी एका बटणाद्वारे, मतदान अधिकारी मतदानाची प्रक्रिया थांबवू शकतात. मतदानाची वेळ संपल्यानंतर हे बटन दाबून प्रक्रिया थांबवली जाते. याव्यतिरिक्त मतदान केंद्र ताब्यात घेतल्यास किंवा मतदान प्रक्रियेत बाधा आणल्यास, हे बटन दाबून प्रक्रिया थांबवली जाते. मतदान यंत्राबरोबर कोणतीही छेडछाड होऊ नये, यासाठी मतदान अधिकारी ते लाखेने सीलबंद करतात. निवडणूक आयोगातर्फे पुरवण्यात आलेल्या खास धाग्याने ते बांधले जाते. याला एक सीरियल नंबर-अनुक्रमांक दिला जातो. आतापर्यंत ईव्हीएम मशीन्स देश पातळीवरील तीन आणि राज्यातल्या ११३ निवडणुकांमध्ये वापरली गेली आहेत.

निवडणुकांत या मशीन्समुळे वेळ वाचतो. एका मतदारसंघातील यंत्रातील मतं तीन ते पाच तासात गणना होऊन निकाल लागू शकतो. कागदी मतपत्रिका असताना यासाठी ४० तास लागत असत. मशीन्समुळे अवैध मतांचा मुद्दा निकाली निघाला आहे. यामुळे होणारा पैशाचा अपव्ययही टळला आहे, असे तज्ज्ञांचे मत आहे. मशीनमुळेच मतदान प्रक्रियेतले घोटाळे कमी झाले असेही मानले जात आहे. मशीन्सच्या आगमनानंतर मतदान प्रक्रियेतील घोटाळ्यांचं प्रमाण कमी झाल्याचं संशोधनाद्वारे स्पष्ट झालं आहे. मतदान प्रक्रियेतील मानवी चुकांचं प्रमाण कमी होणं लोकशाहीसाठी महत्त्वाचं आहे. शिशिर देबनाथ, मुदित कपूर आणि शमिका रवी या संशोधकांनी सन २०१७च्या निवडणुकांमध्ये मशीन्सचा परिणाम किती याचा अभ्यास केला होता. त्यांच्या अभ्यासात काही बाबी स्पष्ट झाल्या. मशीन्समुळे मतदान प्रक्रियेतील घोटाळ्यांचं प्रमाण कमी झालं आहे. मशीन्सच्या आगमनानंतर गरीब आणि उपेक्षित वर्गाचं मतदानाला उपस्थित राहण्याचं प्रमाण वाढलं आहे. मशीन्सच्या आगमनानंतर मतदानाची प्रक्रिया गतिमान होऊन अंर्तबाह्य बदलली आहे. मशीन्सच्या आगमनानंतर सत्ताधारी पक्षांच्या मतांमध्ये घट झाल्याचं निरीक्षण या अभ्यासगटाने नोंदवलं आहे.

मतदान यंत्रांमध्ये कोणतेही फेरफार, गडबड करता येत नाही यावर निवडणूक आयोग ठाम आहे. मॅन्युअली एखाद्याने यंत्रामध्ये फेरफार केली, तर ते टिपता येतं, असं निवडणूक आयोगाचं म्हणणं आहे. निवडणूक आयोगाच्या या दाव्याला राजकीय पक्षांनी सातत्याने आव्हान दिलं आहे. आठ वर्षांपूवी मिशीगन विद्यापीठात एक प्रयोग करण्यात आला. घरगुती स्वरूपाचं उपकरण तयार करण्यात आलं. हे मशीन ईव्हीएमशी जोडण्यात आलं. मोबाईल फोनद्वारे पाठवण्यात आलेल्या टेक्स्ट मेसेजद्वारे मतदान यंत्रात नोंदण्यात आलेलं मत बदलता आलं. भारतीय निवडणूक अधिकाऱ्यांनी या प्रयोगाला फेटाळून लावलं आहे. मशीनचा ताबा मिळवणंही कठीण असल्याचं आयोगाने म्हटलं आहे. सत्ताधारी पक्षाच्या हाताखाली सर्व यंत्रणा, निवडणूक आयोग किंवा तंत्रज्ञमंडळी दबावात येऊन कामे करतात, हे अगदी स्पष्ट आहे. त्यामुळे मतदान यंत्रांत फेरफार करणे अशक्य मुळीच नाही. कसं रोखता येऊ शकतं हॅकिंग? हजारो मतदान यंत्रांमध्ये फेरफार घडवून आणण्यासाठी प्रचंड पैसा लागेल, असं मॅसेच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये कार्यरत धीरज सिन्हा यांनी स्पष्ट केलं असलं तरी मात्र सत्ताधारी पक्षांना ते जड- हलकं काहीच नाही. कारण जाणारा पैसा त्यांच्या बापाच्या खिशातला नसतो. अतोनात खर्च केला, तरी विचारतो कोण त्यांना? कारण आपलीच पोळी भाजून घेण्यात कोणीही कंजूषी करणार नाही. यासाठी मशीन तयार करणारी यंत्रणा आणि मशीन्सचा उपयोग करणारी व्यवस्था हे सहभागी असतील. मशीन्समध्ये फेरफार करण्यासाठी माणसाच्या डोळ्याला दिसणारही नाही असा अँटेना मशीनला बसवणं आवश्यक असते, ही इत्थंभूत प्रक्रिया ते करू शकतात. वायरलेस हॅकिंग रोखण्यासाठी मशीनला रेडिओ रिसीव्हर जोडलेला असणं आवश्यक आहे. यामध्ये इलेक्ट्रॉनिक सर्किट आणि अँटेना असतो. भारतात वापरल्या जाणाऱ्या मशीन्सला असं सर्किट जोडण्यात आलेलं नाही असं संबंधितांनी सांगितलं. त्यामुळे घाऊक प्रमाणावर भारतातील मतदान यंत्रांमध्ये फेरफार घडवणं अशक्य कोटीची गोष्ट आहे, असे म्हटले जाते. माणसानेच यंत्र तयार केले, त्यातील बिघाड तोच दुरूस्त करू शकतो किंवा चांगल्यात बिघाडही तोच आणू शकतो. मग पाहिजे तसा बदलही त्यात का घडवून आणू शकणार नाही.

निवडणूक आयोगाची प्रमुखमंडळी काय सांगतात? पेपर ट्रेल स्लिप आणि इलेक्ट्रॉनिक मशीनमध्ये नोंदली गेलेली मतं यांची तुलना किमान पाच मतदान केंद्रांमध्ये केली जाते. पेपर ट्रेलचा ताळेबंद ठेवणं हे खर्चिक आणि वेळखाऊ आहे. संशोधकांनी धोका कमीत कमी राहील असं लेखापरीक्षण सुचवलं आहे. तूर्तास पेपर ट्रेल व्यवस्थेमुळे मतदार आणि राजकीय पक्षांनी निर्धोक राहावे, असं निवडणूक आयोगाचे माजी प्रमुख एस.वाय.कुरेशी यांनी सांगितलं आहे. सन २०१५पासून सर्व राज्यातील निवडणुकांमध्ये पेपर ट्रेलचा वापर करण्यात आला आहे. दीड हजार मशीन्सच्या माध्यमातून तयार झालेल्या पेपर ट्रेल्सची मोजदाद करण्यात आली. पेपर ट्रेल आणि प्रत्यक्ष मतं यांचा तौलनिक अभ्यास करण्यात आला. यामध्ये एकातही गडबड आढळली नसल्याचं कुरेशी यांनी सांगितलं. ईव्हीएमबाबत मतदारांमध्ये नेहमी कुतूहल तर विरोधकांमध्ये नेहमी संशयच राहिला आहे. पण खरंच ईव्हीएम हॅक होऊ शकतात का? होय, केल्या जाऊ शकतात. याचा वेध बीबीसी प्रतिनिधी सौतिक बिस्वास यांनीही घेतला. मागील एका निवडणुकीत कोणत्याही उमेदवारास मत टाकले, तरी ते अमुक एकाच चिन्हावर अंकित झाल्याची मतदारांत कुजबुज दिसून आली, हे सत्य कसं काय असू शकत नाही? आपल्या पसंतीच्या उमेदवाराला मत मिळालं याची खात्री करतांना समजून आले. आपण मतदान केलं, पण ते अन्यत्रच गेलं. म्हणून ऐंशी कोटी मतदार आणि जवळपास दोन हजार राजकीय पक्ष या प्रचंड पसाऱ्यामुळे देशात होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुका ही एक गुंतागुंताची प्रकिया बनली आहे, हे उघड आहे. या किचकट आणि आव्हानात्मक प्रक्रियेत मतदार हा केंद्रस्थानी आहे. मतांचं पावित्र्य हा सगळ्यांत संवेदनशील मुद्दा आहे. त्यामुळे मतदारांच्या मागणीचा व भावनांचा विचार प्राधान्याने केला गेला पाहिजे, असे वाटते.

काही वर्षांपूर्वीपर्यंत कार्यकर्त्यांनी मतदान केंद्रं ताब्यात घेणं आणि मतपेट्यांमध्ये फेरफार करणं हे चित्र आपल्याला दिसत होतं. तेच चित्र गुप्तमार्गांनी उभे होत आहेत, असे का वाटू नये? ईव्हीएम मशीनच्या आगमनाने या पारंपरिक चित्राला छेद मिळाला. मतदान इलेक्ट्रॉनिक पद्धतीने होऊ लागलं. मात्र आता ही निर्जीव इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रं वादाच्या भोवऱ्यात सापडली आहेत, हेच खरे! ईव्हीएम हॅकिंगचा आरोप का होतो?

पराभूत होणारे पक्ष नेहमीच ईव्हीएम मशीन्स हॅक करण्यात आली असून, मतांमध्ये फेरफार झाला आहे, असा आरोप करताना दिसतात. निवडणुकीत ईव्हीएम मशीनमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत असल्याचा आरोप करत बहुजन समाज पार्टी भिवंडी तालुका अध्यक्ष कैलास गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली शुक्रवारी भिवंडीत उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन करून ईव्हीएम मशीन विरोधात निदर्शने करण्यात आली. सर्वत्र अशीच निदर्शने केली जावीत. भ्रष्टाचार आज शिष्टाचार झाला आहे. अधिकारी तंत्रज्ञान मंडळी चिरीमिरी घेऊन हवे ते बदल करू शकतात. खूप खर्च आला तरी तो सरकारी तिजोरीतून केला जातो. ईव्हीएम यंत्र बाद करून होणारा खर्च बॅलेटपेपरवर केल्यास तो अधिक लाभदायक ठरेल. मतमोजणीत व इतर ठिकाणी खर्च होणारा पैसा सत्कारणी लागेल, तो कुठल्याही चोर, भष्टाचारी, विघ्नसंतोषी, कावेबाज, देशद्रोही व्यक्तीच्या घस्यांत पडणार नाही, तर जनतेच्या आर्थिक समस्या दूर करण्यात अर्थात छोट्या कर्मचाऱ्यांच्या खिशात पडेल. निवडणूक पारदर्शक झाल्याचा समाधान राहील, या विश्वासार्ह प्रक्रियेमुळे मतदारांना वेळोंवेळी पस्तावत जाण्याची नौबतच येणार नाही. भारतात ईव्हीएम मशीन हॅक करून त्यामध्ये फेरफार केल्याचा आरोप होत असून त्याच्याजिवावर भाजपा निवडणुका जिंकून देशात हुकूमशाही पद्धती अवलंबू पहात आहे. पुढे जाऊन निवडणुकीचा अवास्तव खर्च टाळण्यासाठी निवडणुकाच रद्दबातल करू शकेल. म्हणून त्याचा सर्वच राजकीय पक्ष विरोध करीत असून त्यावर बहुजन समाज पार्टी संपूर्ण देशभर आंदोलन करीत आहेत, हे योग्यच आहे. अशी माहिती कैलास गायकवाड यांनी दिली आहे. उप विभागीय अधिकारी कार्यालयासमोर निदर्शने केल्यानंतर उपविभागीय अधिकारी अमित सानप यांना मुख्य निवडणूक आयुक्त यांच्या नावे असलेले आपल्या मागण्यांचे निवेदन यावेळी दिले आहे. यासंदर्भातील निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, शासनाच्या चुकीच्या धोरणांमुळे बेरोजगारांची संख्या वाढली आहे. युवकांच्या समस्या सोडविण्याबाबत उदासीनता बाळगण्यात येत आहे. निवडणुकीत वापरली जाणारी इव्हीएम मशीनही पारदर्शक नसल्याचा आरोप भारतीय युवा व बेरोजगार मोर्चाने केला आहे. कोरोना काळापासून आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यावर उपाय म्हणून सतत बंद पाळला जात असल्याने बेरोजगारीत वाढ झाली आहे. एनसीआरबीच्या अहवालानुसार देशात प्रत्येक दिवसाला ३८ बेरोजगार आत्महत्या करत आहेत. त्यास शासनाचे चुकीचे धोरण कारणीभूत असल्याचा मुद्दा समोर करून भारतीय बेरोजगार मोर्चाने आंदोलन पुकारले असून दुसऱ्या टप्प्यात 'इव्हीएम मशीनची प्रतिमा जलाओ!' आंदोलन करण्यात आले,

देशातील राज्यांच्या विधानसभा निवडणुका पार पडल्या. मध्यप्रदेश, राजस्थान, छत्तीसगढ, तेलंगणा या राज्यांच्या निवडणुकींचा निकाल जाहीर झाला. या निवडणुकांची मतमोजणी ज्या मशिनद्वारे केली जाते. ते मशिन म्हणजे ईव्हीएम- इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशिन होय. मध्यंतरी या ईव्हीएम मशिनमुळे चांगलाच वाद-विवाद रंगला होता. त्यामुळे, हे ईव्हीएम मशिन चांगलेच चर्चेत आले होते. ते आता तात्काळ हटविले गेले पाहिजे, नेहमी होणाऱ्या वादंगाला कायमचा लगाम घालायलाच हवा.

परंतु, आपणास या भ्रष्टाचारी ईव्हीएम मशिनचा इतिहास माहित आहे का? या मशिनचा वापर सर्वात आधी कुठे करण्यात आला होता? या संदर्भातली रंजक माहिती... ईव्हीएम मशिनचा इतिहास- भारतात पहिल्यांदा या ईव्हीएम मशिनचा शोध हा १९८०मध्ये लावण्यात आला होता. एम.बी.हनिफा यांनी या मशिनचा शोध लावला होता. हनिफा यांनी १५ ऑक्टोबर १९८० रोजी इलेक्ट्रॉनिकली ऑपरेटेड व्होट काऊंटिंग मशिन म्हणून याची नोंदणी केली होती. एम.बी.हनिफा यांनी एकात्मिक सर्किट्सचा वापर करून मूळ ईव्हीएम मशिन डिझाईन केले होते. हे ईव्हीएम मशिन त्यावेळी तामिळनाडूच्या ६ शहरांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या सरकारी प्रदर्शनात जनतेसाठी ठेवण्यात आले होते. त्यावेळी लोकांनी सर्वात आधी हे ईव्हीएम मशिन पाहिले होते. त्यानंतर निवडणूक आयोगाने याचा वापर करण्याचा विचार केला. सन १९८९मध्ये भारतातील ईव्हीएम मशिनचे उत्पादन भारतीय निवडणूक आयोगाने इलेक्ट्रॉनिक्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेडच्या सहकार्याने सुरू केले. ईव्हीएमचे औद्योगिक डिझायनर औद्योगिक डिझाईन सेंटर- आइआइटी बॉम्बेचे फॅकल्टी सदस्य होते. देशात ईव्हीएम मशिनचा वापर हा सर्वात आधी १९८२मध्ये मे महिन्यात करण्यात आला होता. त्यावेळी केरळच्या परावूर विधानसभेतील ५० मतदान केंद्रांवर या मशिनचा वापर करण्यात आला होता. मात्र त्यानंतर एका उमेदवाराने निवडणुकीतील त्याच्या पराभवाचे श्रेय हे ईव्हीएम मशिनलाच दिले होते. त्या उमेदवाराचे नाव एस.सी.जोस असे होते. जोस यांनी ईव्हीएम मशिनचा निवडणुकीत करण्यात आलेला वापर आणि निकालांना न्यायालयात आव्हान दिले होते. त्यानंतर कोर्टाने पुन्हा निवडणूक घेण्याचे आदेश दिले होते. मात्र न्यायालयाने ईव्हीएम मशिनमध्ये कोणताही बिघाड झाल्याचा संशय व्यक्त केला नव्हता.

काही काळापर्यंत या मशिनचा वापर करण्यात आला नव्हता. देशात ईव्हीएम मशिनचा वापर सुरू झाला मात्र १९८३नंतर काही वर्षांपर्यंत ईव्हीएमचा वापर करण्यात आला नव्हता. सर्वोच्च न्यायालयाने यासाठी कायदेशीर तरतूद करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार सन १९८८मध्ये डिसेंबर महिन्यात संसदेत कायद्यात सुधारणा करण्यात आली आणि लोकप्रतिनिधी कायदा १९५१मध्ये कलम ६१- अ जोडण्यात आले. ज्या अंतर्गत निवडणूक आयोगाला मतदान यंत्र वापरण्याचा अधिकार प्राप्त झाला. ज्या ईव्हीएम मशिनची निर्मिती १९८९-९०च्या दरम्यान करण्यात आली होती, त्यांचा वापर नोव्हेंबर १९९८च्या विधानसभा निवडणुकीत करण्यात आला होता. या मशिनचा प्रयोग म्हणून वापर हा मध्यप्रदेशातील ५, राजस्थानच्या ६ आणि दिल्लीतील ६ विधानसभा मतदारसंघात करण्यात आला होता. परंतु सन २००४नंतर सर्व निवडणुकांमध्ये ईव्हीएम मशिनचा वापर केला जाऊ लागला. तो आजतागायत सुरू आहे. राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि मतदार यांनी मतदान यंत्र- इव्हीएम हटाव करीता एकमुखी जोरदार उठाव केल्यास ते शक्य आहे. इव्हीएमचे कोणी बांधील नाही. मतदारांसाठी विश्वासार्ह निवडणूक पद्धती केव्हाही चांगलीच! तीच खरी लोकशाहीची आण, बाण व शान ठरेल.

!! एकच नाराः ईव्हीएम व्हीव्हीपॅट सोडा; मतदारांची खट्टू मने जोडा! पारदर्शक निवडणुकीचा हाच फंडा !!

एकच आस मनी धरा- आहे भारतीय पावन धरा; आधी ईव्हीएममुक्त करा !!

- संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार लक्ष्मी-गोविंदा निकोडे गुरूजी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सअॅप- ९४२३७१४८८३.

रामधाम...

रामाचे झाले
मंदीर
मनात सर्वां ध्यास
रोमा रोमात भरला
प्रभू आमचा श्वास

मंदीर निर्माण करी
उरी होता विश्वास
दिन येई सोनियाचा
करता शिलान्यास

सजे अयोध्या सारी
जागोजागी आरास
अवनीवरी साक्षात
स्वर्गाचाचं आभास

राम नाम जयघोष
प्रतिध्वनी कानास
सर्व धर्म समभाव
वाढो मनाचा व्यास

राम नवमी उत्सवी
पुरी होई सारीआस
स्वप्न पाही सत्यास
तृप्ती मिळे मनास

राम लल्ला सर्वांचा
करे मोठा मनव्यास
रामनावे राजकारण
नको फुका हव्यास

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६

जागृत मंदिर...

प्रतिक्षा
पाचशे वर्षे
खूपचि झाली रामा
मुहूर्त लाभला छान
बांधाया तव धामा

कारसेवक ते झटले
कसलीनव्हती तमा
प्रमाद घडे नकळत
श्रीरामा करीरे क्षमा

मलम लाव काळाचे
विसर जुन्या जखमा
वैर वितुष्ट संपवावे
करा इतिहास जमा

संकल्पसिध्दी झाली
त्वरित लागू रे कामा
जाणूनि घ्यावे रामा
मर्यादा पुरूषोत्तमा

गुण गृहण करूजरा
तो वसावा रोमारोमा
जागृत भक्ती मंदिरा
दुजी नसावी उपमा

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६

विदर्भ स्तरीय खासदार चषक स्पर्धेत पोलिस कर्मचारी देवेंद्र उडाण यांनी पटकविले ४ स्वर्ण १ कांस्य पदक

समुद्रपूर ■ अमोल झाडे



समुद्रपूर :तालुक्यातील गिरड पोलीस ठाण्यात कार्यरत पोलिस कर्मचारी देवेंद्र उडाण यांनी नागपूर येथे नुकत्याच पार पडलेल्या विदर्भ स्तरीय खासदार चषक स्पर्धेत उंच भरारी घेत ४ स्वर्ण १ कांस्य अशा एकूण तब्बल ५ स्वर्ण पदकांची कमाई केली आहे.या त्यांच्या कामगिरी बद्दल सर्वत्र अभिनंदन करण्यात आले आहे. १३ ते १४ जानेवारी नागपूर येथे विदर्भ स्तरीय खासदार चषक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते यावेळी गिरड पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलिस कर्मचारी देवेंद्र उडाण यांनी या स्पर्धेत सहभागी होत ३५ वर्षीय वयोगटात १०० मिटर रिले स्पर्धेत गोल्ड ४०० मिटर दौड स्पर्धेत कांस्य पदक पटकाविले तर १७ जानेवारीला झालेल्या मास्टर ॲथेलाटीक्स स्पर्धेत ४० वयोगटामध्ये ४०० मिटर गोल्ड आणि २०० मिटर गोल्ड असे एकूण ४ गोल्ड १ कांस्य पदक अशा एकूण ५ पदकांची कमाई केली या आधी सुद्धा पोलिस कर्मचारी उडाण यांनी १ महिन्या अगोदर नाशिक मध्ये पार पडलेल्या राज्यस्तरीय मास्टर्स स्पर्धेत चार सुवर्ण पदक मिळविले होते.आता पुन्हा पुन्हा यात त्यांनी नविन ४ गोल्ड १ कांस्य पदकाची कमाई केली आहे.१३ फेब्रुवारी ते १७ फेब्रुवारी दरम्यान पुणे येथे होणाऱ्या नॅशनलसाठी सुध्दा त्यांची निवड झाली आहे.यावेळी २०१० मध्ये कॉमनवेल्थ गेम्स दिल्ली येथे स्पर्धेत विजेता रीतेश आंनद यांच्या हस्ते देवेंद्र उडाण यांनी पदक देण्यात आले.या त्यांच्या कामगिरी बद्दल उपविभागीय पोलिस अधिकारी रोशन पंडित, समुद्रपुर पोलिस ठाण्याचे ठाणेदार संतोष शेगावकर,गिरड पोलीस ठाण्याचे ठाणेदार संदिप गाडे,गिरड ग्रामपंचायतीचे सरपंच राजू नौकरकर, मोहगांव ग्रामपंचायतीचे सरपंच विलास नवघरे, उपसरपंच मंगेश गिरडे, पत्रकार गजानन गारघाटे, प्रशांत ठाकूर, प्रशांत भगत,व सर्व पोलीस कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करीत पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

भजन, गझल, गाजलेल्या गाण्यांचे श्रोत्यांवर गारूड

सुरेश वाडकरांच्या जादूई सूरांनी गाजविला महासंस्कृती महोत्सवाचा दुसरा दिवस;हजारोंच्या संख्येने श्रोत्यांची उपस्थिती;विदर्भाच्या अयोध्येत आज हंसराज रघुवंशी यांचे भक्तीगीत

रामटेक ■ जयश्री मेंघरे





रामटेक - विख्यात गायक सुरेश वाडकर यांच्या जादूई सूरांनी महासंस्कृती महोत्सवाचा दुसरा दिवस गाजवला.रामटेक गडकिल्याच्या पायथ्याशी भक्तीगीत, भजन, गाजलेली चित्रपट गाणी, गझल त्यांनी आपल्या मधूर आवाजात सादर केली. हजारोंच्या संख्येने उपस्थित रसिक श्रोते आणि मनाला भिडणारा सुमधुर स्वर अशी साद- प्रतिसादाची मैफल रामटेकरांनी अनुभवली.

सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्यावतीने व जिल्हा प्रशासनाच्या समन्वयाने रामटेक येथील नेहरू मैदानावर पाच दिवसीय महासंस्कृती महोत्सवाचा शुभारंभ काल करण्यात आला. महोत्सवाच्या पहिल्या दिवशी अभिनेत्री हेमा मालिनी यांनी रामायणावर आधारित नृत्य नाटिकेचे सादरीकरण करीत रसिकांची मने जिंकली होती. त्यानंतर आज दुस-या दिवशी आवाजाचे जादूगर सुरेश वाडकर यांची गाणी श्रोत्यांच्या हृदयाला भिडली.

सुरेश वाडकर यांनी प्रामुख्याने हिंदी आणि मराठी गाणी गायली. अनेक हिट गाण्यांना त्यांनी आपला आवाज दिला आहे. हिंदी-मराठीच नव्हे तर भोजपुरी, सिंधी आणि कोकणी भाषांमध्येही अनेक गाणी गायली आहेत. आज त्यांच्या याच गाण्यांना पुन्हा एकदा नेहरू स्टेडियमवरील श्रोत्यांची वाहवा मिळविली.

नेहरू मैदानावर त्यांनी सादर केलेल्या 'मेघा रे मेघा रे', 'ए जिंदगी गले लगाले' , लगी आज सावन की फिर वो झडी है, सांज ढले गगन तले, और इस दिल मे क्या रखा है, मैं हू प्रेम रोगी यांसारख्या त्यांच्या गाण्यांनी प्रेक्षकांच्या मनाला भुरळ घातली. 'प्रेमरोग', 'सदमा' या चित्रपटातील त्यांच्या गाण्यांनी श्रोत्यांवर अक्षरशः गारूड केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला त्यांनी गुरुवंदना गायली. महोत्सवाच्या दुस-या दिवशी आ. ॲड. आशीष जायस्वाल, उपविभागीय अधिकारी वंदना सवरंगपते, तहसिलदार हंसा मोहने आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

गोविंदपुर ग्रामपंचायतीच्या वतीने घेण्यात आला हळदीकुंकू समारंभ



समुद्रपूर ■ अमोल झाडे

समुद्रपुरः- तालुक्यातील गोविंदपुर ग्रामपंचायतीमध्ये गेल्या १० वर्षांपासून सरपंच्या सौ शारदाई तुमराम यांच्या पुढाकाराने वर्षातून एकदा गावातील महिलांना एकत्रितपणे आणून गावातील महिलांसाठी ग्रामपंचायत सभागृहात हळदीकुंकवाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.हिच परंपरा कायम ठेवत यंदाही हळदीकुंकवाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सरपंच सौ शारदाई दिवाकर तुमराम तर प्रमुख पाहुणे म्हणून नारायणपूर ग्रामपंचायतीचे माजी सरपंच डॉ युवराज तांदुळकर, कवठा ग्रामपंचायतीचे सरपंच प्रविण जायजे,जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक हरीचंद्र ढोले, उपसरपंच स्वप्नील पंढरपूरे ग्रामसेवक रविंद्र जवादे,आदी प्रामुख्याने उपस्थित होते यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून हळदीकुंकवाच्या कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.यावेळी सरपंच शारदाताई तुमराम व महिला ग्रामपंचायत सदस्यांनी उपस्थित महिलांना हळदी कुंकू लावून वाण दिला तसेच महिलांसाठी केंद्र व राज्य सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती देण्यात आली या कार्यक्रमाला ग्रामपंचायत सदस्य ध्मविना वानखडे ,विना दारोकर,अरुणा शेंडे,विद्या शेंडे, देवांगना गेडाम, हेमलता चांदेकर, रुपाली जायजे,करुणा पांडे, दिवाकर तुमराम,श्रावण तुमराम, आदिंसह गावातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

हस्ताक्षर सुधारले कि विद्यार्थी जीवनात सुधार होतो :प्रदीपकुमार नागपुरकर

समुद्रपूर ■ अमोल झाडे



समुद्रपूरः जनता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय मंगरुळ येथे शनिवारला स्वयंम् हस्ताक्षर सुधार वर्गाचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी भारतीय युवा संस्कार परीषद संस्थापक तथा हस्ताक्षर सुधार प्रकल्प प्रचारक प्रदीपकुमार नागपुरकर प्रमुख मार्गदर्शन करतांना म्हणाले की, विद्यार्थी जीवनात स्वयंम् हस्ताक्षर सुधारातून आपले जीवनात सरळता, एकनिष्ठता, ध्येयवादी या त्रिसुत्रीचा गुणाचा भाव जागृत होतो मी सरळ माझी रेषा सरळ, माझे जीवन सरळ हा अक्षर महामंत्र अक्षराणोम्- अकारोस्मिः ह्यातून अक्षरांचे नवचिन्हाचे महत्व विद्यार्थांनी सरावातून रेषा मोठी चिन्हे अर्धी हे सांगत यातून रामनाम जपाचे नव्हे ते अक्षर स्वरुपातून साकार करता येते ह्या प्रयोगात्मक सरळे, वाटोळे, मोकळे त्रिसुत्रीचा मंत्र देतांना प्रदीपकुमार नागपुरकर यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जनता कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य मनोहर कोल्हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून हस्ताक्षर सुधार प्रकल्प प्रचारक प्रदीपकुमार नागपुरकर तथा विशेष अतिथि मोतीराम मुन, सामाजिक कार्यकर्ते व ग्रामपंचायत सदस्य किशोर तांदुळकर, आदि मान्यवर उपस्थित होते.स्वयंम् हस्ताक्षर सुधार वर्गाची सुरुवात प.पू. सावित्रीमाई फुले यांचे प्रतिमेचे पूजन करुन मनाचे श्लोक व वाचिता,लिहीता चुकतो सदा, बुध्दी दे रघुनायका या प्रार्थना गीताने झाली.

प्रमुख मान्यवरांना विद्यार्थांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.अध्यक्षीय भाषण करतांना प्राचार्य मनोहर कोल्हे म्हणाले कि विद्यार्थांनी नेहमी प्रयोगशील असले पाहिजे, आपल्या अक्षर सुधारणेच्या वर्गातून विद्यार्थी हा शिक्षणासाठी ध्येयवादी व खरोखरच अलंकारिक होतो तेव्हां ह्या अक्षर सुधार वर्गाचे माध्यमातून मिळालेल्या संधीचे सोने करून घ्यावे असे त्यांनी सांगितले. यामध्ये विद्यालयातील ८ ते १२ वर्गाचे विद्यार्थी विद्यार्थांनी १५० विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी विद्यार्थांना युवा-संस्कार पुस्तकांचे वितरण करण्यात आले,वर्गाचे सुत्रसंचालन सचिन धोंगडे आभार प्रदर्शन संदीप सातारकर यांनी मानले. यशस्वीतेसाठी सतिश पराते, गजानन मांडवकर,कृष्णा डंभारे, ज्ञानदेव श्रीरामे,महेंद्र कोसुरकर, अमित म्हैसेकर, निलीमा ठाकरे, रंजना जौहरी आदीसह सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

पोलीस स्टेशन सावनेर यांनी प्रतिबंधीत तंबाकु व गुटका वाहतुक करणारा कन्टेंनर पकडलाः ६३,७५०००/- रुपाचा प्रतिबंधीत तंबाकु व गुटका केला जप्त

सावनेर ■ दिलीप येवले



दिनांकः २०/०१/२०२४ रोजी सकाळी १०.०० वा. सुमारास गुप्त माहीतगाराव्दारा माहिती मिळाली की, पांढुर्णा कडुन हेटी मार्गे तेलकामठी कडे एका कंटेनर मध्ये अवैध्यरित्या प्रतिबंधीत तंबाकु व गुटखा भरून जात असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्याने सावनेर पोलीस स्टेशनचे डी. बी. पथक हे लगेच पंचासह मुखबीराने सांगितलेल्या प्रमाणे ठिकाणी जावुन पाहणी केली असता हेटी कडुन तेलकामठी कडे एक मोठा कंटेनर जात असतांना दिसला जसेच आम्ही आपले सरकारी वाहन त्या कंटेनर च्या मागे लावुन त्या कंटेनर चा पाठलाग करू लागलो तसेच कंटेनर चालकाने आपले कंटेनर हेटी तेलकामठी हायवे रोडवर लावुन शेती झाडझुडपी चा फायदा घेवुन शेतात पडुन गेला कंटेनर क्रः ११ उण ५८१३ ची पंचासमक्ष पाहणी केली असता कंटेनर मध्ये काही घरी घुती सामान व त्यानंतर मधोमधात प्रतिबंधीत अवैध्य गुटका व सुगधित तंबाकु लपवुन घेवुन जात असल्याने दिसुन आले वरुन सदरचा कंटेनर क्रः ११ उण ५८१३ पो.स्टे. ला आणुन पाहनी केली असता सदर कंटेन्टर मध्ये प्रतिबंधीत अवैध्य गुटका व सुगधित तंबाकु एकुन किंमत ३३,७५,०००/- रुपयाचा मुददेमाल मिळुन आला त्या बबात अन्न व औषधी प्रशासन विभाग यांना माहिती देवुन श्रीमती ए. व्ही. बाभरे अन्न व सुरक्षा अधिकारी नागपुर यांनी पंचनामा कार्यवाही करुन सदर प्रकरणात ३३,७५०००/- रु.चा प्रतिबंधीत गुटखा व सुगधित तबांखु जप्ती करण्यात आला तसेच कंटेनर क्रः ११ उण ५८१३ चा कि. अ. ३०,००००/- रुपचा असा एकुन ६३,७५,०००/- रू. माल ताब्यात घेवुन जप्त करण्यात आला असुन सदर प्रकरणात कलमः ३२८, २७२, २७३, १८८ भादवि सह कलम अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ व त्या अंतर्गत नियम व नियमन २०११ चे कलम २६ (१), २६ (२), २७ (३) (ा), ३० (२) (ॅ) सहवाचन कलम ३ (१), (ॅ), (ग्न), (ग्ग), (न्) शिक्षापात्र कलमः ५९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधिक्षक संदिप पखाले, सहायक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावेनर अनिल म्हस्के, यांचे मार्गदर्शनाखाली तसेच पोलीस निरीक्षक रविंद्र मानकर ठाणेदार पोलीस स्टेशन सावनेर यांचे नेतृत्वात सपोनी शरद भस्मे, गणेश रॉय, अविनाश बाहेकर, रवि मेश्राम, प्रमिला चौधरी, दाउद मोहम्मद, अंकुश शास्त्री, किशोर राठोड यांनी केली.

रोटरॅक्ट क्लबच्या सायकल मॅरेथॉन स्पर्धेला उदंड प्रतिसाद लाभला

शारीरिक तंदुरुस्तीबाबत जागरुकता आणण्यासाठी क्लबचा उपक्रम

हिंगणघाट ■ अब्दूल कदीर बख्श



हिंगणघाट.- रोटरॅक्ट क्लब, हिंगणघाट यांच्यावतीने २१ जानेवारी रोजी आयोजित १० किलोमीटर सायकल मॅरेथॉन कारंजा चौकातून सुरू होऊन विठोबा चौक मार्गे शमशान घाट रोड ते दाभा रेल्वे गेट व तेथून परत कारंजा चौकात सांगता झाली. स्पर्धेची सुरुवात प्रमुख पाहुणे अतुलभाऊ वांदिले यांच्या हस्ते झेंडा दाखवून करण्यात आली.या स्पर्धेत १०० हून अधिक जणांनी सहभाग घेतला.शारीरिक तंदुरुस्तीबाबत जनजागृती करण्यासाठी रोटरॅक्ट क्लब हा उपक्रम दोन वर्षांपासून राबवत आहे.या स्पर्धेतील प्रथम पारितोषिक स्पोर्ट सायकल भूषण कोल्हे, द्वितीय पारितोषिक स्मार्ट वॉच सतीश टेमांडे यांनी पटकावले, तृतीय पारितोषिक ट्रफल बॅग वासिद पठाण यांनी पटकावले तसेच प्रोत्साहनपर पारितोषिक यश वानखेडे, लक्ष्मी बिडकर आणि अखिलेश हुलके यांनी पटकावले. स्पर्धेचे मुख्य आयोजक आधार फाऊंडेशनचे अतुलभाऊ वांदिले तर सहआयोजक ठाकरे सायकल, धनलक्ष्मी ज्वेलर्स आणि धनलक्ष्मी इव्हेंट्स हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून आधार फाउंडेशनचे अतुलभाऊ वंदिले, ठाकरे सायकलचे संचालक अथर्व ठाकरे, धनलक्ष्मी इव्हेंट्सचे संचालक कृष्णा करवा, धनलक्ष्मी ज्वेलर्सचे संचालक मोहित नहार, रोटरी क्लबचे डॉ.अशोक मुखी, डॉ.राजू निखाडे प्रामुख्याने उपस्थित होते. पुरस्कार वितरण उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऋचा पालीवाल व सतीश खियानी यांनी केले तर आभार स्वाती कासवा यांनी मानले. पुरस्कारासाठी अमला अमृत यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रोटरॅक्ट क्लबचे अध्यक्ष हर्षल सॅम्युअल, सचिव स्वाती कासवा, प्रकल्प संचालक सोनू लखानी, निकुंज मुंधरा, ऋचा पालीवाल यांच्यासह सदस्य डॉ.शिवली, किन्नरी जावडे, निखाडे, हितेश कटारिया, मनन कोचर, रोहित बसंतानी, मयूर कटारिया, विशाल यांनी परिश्रम घेतले. दुंबानी, आयुष लाहोटी, सतीश खियानी, रिचा पालीवाल, श्रुती लाहोटी, चंचल वाधवानी, पूजा बत्रा, निकिता मुंधरा यांनी परिश्रम घेतले.तसेच पोलीस प्रशासन, रोटरी क्लब व इनरव्हील क्लब यांचे सहकार्य लाभले.

प्रथम एज्युकेशन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने काटोल तालुक्यात नई किरण उपक्रम उत्कृष्ट पणे सुरु आहे

नागपूर ■ दिलीप येवले



जिल्हा परिषद नागपुर मुख्य कार्यकारी अधिकारी सोम्या शर्मा यांच्या मार्गदर्शनाने तसेच पंचायत समिती काटोल व प्रथम एज्युकेशन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने काटोल तालुक्यात नई किरण उपक्रम उत्कृष्ट पणे सुरु आहे महिलांना पुन्हा एकदा आपले राहिलेले शिक्षण पूर्ण करण्याची संधी प्राप्त झालेली आहे तसेच निरक्षर महिलांना साक्षर करणे वर्ग ५ वी पूर्ण करणे व ज्या महिलांचे शिक्षण वर्ग ५ वी पास व ९ वी पास/नापास आहे अशा महिलांना वर्ग १० वी पास करून त्यांच्या आत्मविश्वास वाढवणे या उपक्रमाचा उद्देश आहेत. काटोल तालुक्याचे नई किरण उपक्रम प्रतिनिधी मयूर साठोणे, अनिता सहस्त्रबुद्दे आदि परिश्रम घेत आहेत काटोल मधील २५ गावामध्ये निरक्षर महिला घरचे काम पूर्ण करून सायंकाळी एकत्र येऊन बसतात व वर्गात गावातील स्वयंसेवक महिलांना अभ्यासात मदत करतात.विषेष म्हणजे नागपूर जिल्हामध्ये नई किरण उपक्रम पंचायत समिती काटोल येथे (उत्तर प्रदेश) राज्य प्रमुख नूज्जत मलिक मॅडम यांनी उपक्रम कशाप्रकारे चालतात हे जाणून घेण्यासाठी सभापती संजय डांगोरे, गटविकास अधिकारी दीपक गरुड, गट शिक्षणाधिकारी नरेश भोयर सर यांना भेटून नई किरण उपक्रम अंतर्गत माहिती जानून घेतली तसेच प्रत्येक महिला कशाप्रकारे साक्षर होतील व इयत्ता १० वी पूर्ण करेल याबद्दल सविस्तर चर्चा केली तसेच काटोल तालुक्यातील जास्तीत जास्त महिला या उपक्रम अंतर्गत साक्षर होणार याबद्दल चर्चा केली.

नूज्जत मलिक मॅडम'नई किरण' उपक्रम अंतर्गत अंबाडा सोनक गावामध्ये भेट दिली गावातील स्वयंसेवक भूमिका धुर्वे, निकिता तायावाडे, पूनम धुर्वे, नयन वर्गट, श्रुती शिरपूरकर, नेहा परतेती, साहिल पेंदाम, अमिषा तायवाडे, अभिजीत खंडाते यांनी पाहुण्यांचे पुष्पगुच्च देऊन स्वागत केले तसेच प्रौढ साक्षरता वर्गाला भेट दिली स्वयंसेवक त्रिवेणी धुर्वे महिलांना रोज एक तास शिकवतात.

तसेच नूज्जत मलिक मॅडम यांनी महिलांना लिहण्यासाठी पाटी, व शैक्षणिक साहित्य दिले हे पाहून महिलांना आंनद झाला. अंबाडा गावामध्ये निपुण महाराष्ट्र इध्द अंतर्गत नागपूर विभाग प्रमुख रंजना पेंदोर, राणी गिरडकर मॅडम यांनी वर्ग १ ली ते ३ री च्या माता गटांना भेट देऊन मुलांचा अभ्यास कशाप्रकारे करून घ्यावा याबद्दल महिलांशी संवाद साधला.

माता गटामध्ये लीडर माता विमल उईके यांनी सांगितले की आम्ही मुलांना खेळाच्या माध्यमातून आणि आयडिया विडिओ च्या माध्यमातून आम्ही मुलांना शिकवतो आणि मुलांचा सुद्धा अभ्यास गटाच्या माध्यमातून करून घेतो. तसेच माता गटामध्ये मनीषा युनाते, शुभांगी युनाते, कल्पना युनाते, कविता युनाते, सुनीता येडमे, रेखा परतेती यांचा समावेश आहे.

भेटी दरम्यान महाराष्ट्र राज्य प्रमुख सोमराज गिरडकर, प्रोग्राम हेड नरेंद्र लांजेवार, हमारा गाव उपक्रम प्रोग्राम हेड प्रफुल जावंजाळ,राणी गिरडकर जिल्हा समन्वयक गुरुदेव तिरणकर, निलेश सहस्त्रबुद्दे, नागपूर विभाग प्रमुख रंजना पेंदोर उपस्थित होते.

अटल भूजल योजनेअंतर्गत माहीती शिक्षण संवाद जिल्हास्तरीय संवाद कार्यशाळा संपन्न

काटोल ■ प्रशांत पवार



दिनांक १९/०१/२०२४ रोजी डॉ. विपीन इटनकर जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा नियोजन व समन्वय समिती, अटल भूजल योजना, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली अटल भूजल योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी माहिती शिक्षण संवादच्या माध्यमातून लोकसहभाग जास्तीत जास्त मिळावा आणि जलसुरक्षा आराखडयाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी जिल्हास्तरीय एकदिवसीय कार्यशाळा रॉक्स सेलिब्रेशन सभागृह काटोल येथे घेण्यात आली.

सदर कार्यशाळेचे उद्घाटन मंचावर उपस्थित मान्यंवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. प्रस्तावनामध्ये मध्ये डॉ.वर्षा पी. माने वरिष्ठ भूवैज्ञानिक नागपूर यांनी अटल भूजल योजनेची सर्वसाधारण माहिती, उद्दिष्टे, अध्द क्ष१ यांची माहिती सार्वजनिक ठिकाणी प्रदर्शित करण्याची साधनाबददलची माहिती ,इतर शासकीय विभागांच्या योजनांचे अभिसरण करावयाचे असल्याने आराखडयातील नियोजित कामांच्या अमंलबजावणीसाठी अभिसरणाची संकल्पना व महत्व संबधीतांना त्याबाबतची माहीती होणेकरीता या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असल्याचे सांगीतले. तसेच संलग्न विभाग व योजनानिहाय प्रस्तावित अभिसरण कार्यक्रम, अटल भूजल योजनेअंतर्गत जलसुरक्षा आराखडा तयार करून पाण्याची पातळीतील घसरण थांबविणे, संलग्न विभागाची जबाबदारी व महत्त्व आणि पाण्याचे मागणी व पुरवठा आधारीत कामांच्या अंमलबजावणीसाठी विविध शासकीय विभागाच्या योजनांच्या अभिसरणातुन ही योजना राबवुन त्याची अंमलबजावणी करण्यासाठी उपस्थितांना मार्गदर्शन केले. उपविभागीय कृषी अधिकारी ,काटोल यांनी अटल भूजल योजना कार्यक्षम पाणी वापर पदधतीचा अंगीकार करणे (अध्द क्ष४)च्या अनुषंगाने पाणी बचतीच्या उपाययोजना,पिक फेरबदल, गट शेती तसेच कृषी विभागाच्या विविध योजना विषयी सविस्तर सादरीकरण करून उपस्थितांना मार्गदर्शन केले. मा. बावणे सर ,उपअभियंता लघु पाटबंधारे जिल्हा परिषद नागपूर यांनी त्यांच्या विभागामार्फत राबविण्यात येत असणाऱ्या विविध शासकीय योजना बाबत माहिती दिली, त्यानंतर मा. दीपक गरुड सर गटविकास अधिकारी काटोल यांनी जिल्हा परिषद तसेच पंचायत समिती मार्फत राबविण्यात येत असलेल्या शासकीय योजना बाबत मार्गदर्शन केले त्यानंतर राजू रणवीर ,तहसीलदार काटोल यांनी सदर कार्यशाळेबाबत मनोगत व्यक्त करून मार्गदर्शन केले त्यानंतर मा.डॉ. विपीन इटनकर, जिल्हाधिकारी, नागपूर यांनी जिल्हास्तरीय संवाद कार्यशाळेस आभासी पद्धतीने उपस्थित राहून उपस्थित असलेल्या सरपंच, सचिव, संलग्न विभागाचे अधिकारी कर्मचारी, प्रगतशील शेतकरी त्यांचे मनोगत जाणून घेतले व त्याविषयी माननीय जिल्हाधिकारी यांनी उपस्थिततांसोबत संवाद साधून कार्यशाळेत मार्गदर्शन केले त्यानंतर त्यानंतर श्री अजय गजभिये, कृषी सल्लागार यांनी,शेतकऱ्यांच्या उत्पादन पद्धतीमध्ये कशी सुधारणा करावी तसेच शेडनेट हाऊस ,पॉलीहाऊस, मल्चिंग, मार्केटिंग , फ्लोरिकल्चर इत्यादी विषयाबाबत मार्गदर्शन केले त्यानंतर मा. शिवराज पडोळे सर उपविभागीय महसूल अधिकारी, काटोल ,यांच्या हस्ते अटल भूजल योजनेच्या प्रचार प्रसिद्धीकरिता ग्रामपंचायत स्तरावर वितरित करण्यात येणाऱ्या टी-शर्ट ,कॅप, माहिती पत्रके, स्टिकर्स, चित्ररथ अनावरण करण्यात आले व कार्यशाळेस उपस्थिताना मार्गदर्शन केले तसेच काटोल व नरखेड येथील उपस्थित असलेल्या शेतकरी शेतकरी अटल भूजल योजनेच्या माध्यमातून जलसंधारणाच्या कामातून झालेले फायदयाबाबत मनोगत व्यक्त केले. तसेच श्रीमती प्रगती सावध सरपंच, सिंदी (उमरी) यांनी अटल भूजल योजनेतून झालेला लाभ बाबत मनोगत व्यक्त केले.

कार्यशाळा दरम्यान विविध संलग्न विभागाचे अधिकारी/कर्मचारी, सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, प्रगतशील शेतकरी, महिला शेतकरी, महिला बचत गट, भूजलमित्र, जलसुरक्षक उपस्थित होते. प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्ष,वरीष्ठ भूवैज्ञानिक कार्यालय, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा आणि जिल्हा अंमलबजावणी भागीदार संस्था, सदभावना ग्रामीण विकास संस्था, वर्धा येथील समन्वयक, विषय तज्ञ ,सर्व समूह संघटक यांनी परीश्रम घेतले. सदर प्रशिक्षण कार्यशाळेचे सुत्रसंचालन श्रीमती शिल्पा जनक, कनिष्ठ वैज्ञानिक यांनी केले तर आभार निलेश खंडारे, माहिती शिक्षण संवाद व क्षमता बांधणी तज्ञ यांनी मानले.

२३ जानेवारीला अंतिम मतदार यादी

नागपूर ■ दिलीप येवले

भारत निवडणूक आयोगाच्या सुधारित कार्यक्रमानुसार मतदार यादीची अंतिम प्रसिद्धी दिनांक २३ जानेवारी २०२४ रोजी करण्यात येणार आहे. याच दिवशी राजकीय पक्षाची सभा व पत्रकार परिषद घेऊन मतदार यादी संदर्भात माहिती देण्यात येणार असल्याचे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी प्रवीण महिरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

भारत निवडणूक आयोगाने १ जानेवारी २०२४ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार यादीचा सुधारित संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम जाहीर केला आहे. यानुसार मतदार यादीची अंतिम प्रसिद्धी करण्याचा दिनांक २२ जानेवारी २०२४ असा होता. तथापि महाराष्ट्र शासनाच्या दिनांक १९ जानेवारी २०२४ च्या अधिसूचनेनुसार सोमवार दिनांक २२ जानेवारी २०२४ रोजी श्री राम लल्ला प्राणप्रतिष्ठा दिनानिमित्त सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. त्यामुळे भारत निवडणूक आयोगाने त्यांच्या दिनांक १९ जानेवारी २०२४ च्या पत्रानव्ये राज्यातील सर्व विधानसभा मतदारसंघाच्या अंतिम मतदार याद्या दिनांक २३ जानेवारी २०२४ रोजी प्रसिद्ध करण्याचे निर्देश दिले आहेत.

दरम्यान, नागपूर जिल्हास्तरावरील विद्यार्थ्यांचे मतदार नोंदणी विषयक तसेच निवडणूक विषयक जनजागृती करण्याकरिता सिव्हील लाईन येथील डॉ.वसंतराव देशपांडे सभागृहात 'फरक पडतो' या पथनाट्य स्पर्धेचे आयोजन दि. २४ जानेवारी २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता करण्यात आले आहे. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भाग घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी केले आहे.

विद्यार्थ्यांना दैवत मानून केलेली सेवा हीच आयुष्यातील माझी खरी संपत्ती:मनीषाताई लटांबळे

शिरुर (पुणे) ■ शकील मनियार



शिरूर तालुक्यातील निर्वी ता.शिरूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षिका मनीषाताई लटांबळे यांची निर्वी येथून तालुक्यातच गुनाट ता. शिरूर येथे बदली झाली असून त्यांचा निरोप संभारंभ कार्यक्रम जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वतीने घेण्यात आला. या कार्यक्रमाला निर्वी गावातील ग्रामस्थ,जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षक व शिक्षिका,सामाजिक कार्यकर्ते,पत्रकार बांधव तसेच विद्यार्थी आणि विद्यार्थिनीं मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आदर्श उपसरपंच निलेश सोनवणे म्हणाले की मनीषाताई लटांबळे मॅडमचं काम दीपस्तंभाप्रमाणे आहे समाजामध्ये आदर्शवत काम त्यांनी आपल्या अखंड सेवेमध्ये केलेला आहे अनेक विद्यार्थी स्वतःच्या पायावर आयुष्यात उभे करण्याचे काम सौ.लटांबळे यांनी केले असून भविष्यातील कामासाठी निर्वीवासीयांच्या वतीने मी त्यांना शुभेच्छा देतो.

कार्यक्रमां प्रसंगी दिलीप घुले ,तुकाराम सोनवणे, संगीता घुले,कल्पना बडे,पत्रकार शकीलभाई मणियार आदींनी आपल्या भावना व्यक्त केल्या.निरोप समारंभाच्या कार्यक्रमाला उत्तर देताना आदर्श शिक्षिका मनीषाताई लटांबळे म्हणाल्या की आज पर्यंत सेवा करताना विद्यार्थ्यांना दैवत म्हणून आदर्श विद्यार्थी घडवण्याचा प्रयत्न केला.निर्वी हे गाव एक आदर्श पुण्यभुमी असलेले गाव आहे.

या गावातील ग्रामस्थही चांगले असून माझा स्टाफही खूप खूप चांगला आहे. मला या शाळेतून जाताना निश्चितपणानं माझ्या चांगल्या आठवणी जागृत झाल्याशिवाय राहत नाही माझे मन या शाळेत खूप रमले होते परंतु आपल्याला प्रशासनाच्या नियमापुढे जाता येत नाही.मला येथील ग्रामस्थांची चांगल्या प्रकारे साथ मिळाली त्याबद्दल मी सर्वांना धन्यवाद देते. या कार्यक्रमाला माजी आदर्श उपसरपंच निलेश सोनवणे,शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रदीप साळुंके,ग्रामपंचायत सदस्या भाग्यश्री बुऱ्हाडे,शरद पवार,संचालक संपत सोनवणे,तुकाराम सोनवणे,आदर्श ग्रामसेवक सुरेश साळवे, सुनील लटांबळे सर,उत्तम साळुंके,शांताबाई राजगुरव,छबाताई आखुटे, ज्येष्ठ पत्रकार वसंत सकट,पत्रकार योगेश पाचंगे,पालक वर्ग आदी मान्यवर मोठ्या बहुसंख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिलीप घुले यांनी केले तर अनुमोदन कल्पना बडे यांनी दिले व आभार तुकाराम सोनवणे यांनी मानले.

विकसित भारत संकल्प चित्ररथ यात्रेचे शेडेगावात मोठ्या उत्साहात स्वागत : देण्यात आली सरकारच्या विविध योजनांची माहिती

समुद्रपूर ■ अमोल झाडे



समुद्रपुरःकेंन्द्र शासनाच्या विविध योजनांची माहिती जनसामान्यां पर्यंत पोहचविण्यासाठी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून भारत व महाराष्ट्र राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने भारत संकल्प यात्रेचे आयोजन करण्यात आले असून.हि चित्ररथ यात्रा शेडगाव येथे दाखल होताच उपस्थित गावकऱ्यांनी मोठ्या उत्साहात या चित्ररथ यात्रेचे स्वागत केले.यावेळी ग्रामपंचायतीच्या प्रांगणात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मोहगाव येथिल माजी सैनिक तथा सरपंच मुर्लिधर चौधरी प्रमुख पाहुणे म्हणून विस्तार अधिकारी तडस ,उपसरपंच निशाताई पावडे, ग्रामपंचायत सदस्य, रामभाऊ दाणव,मंगेश शेगोकर,देवकाबाई उईके,रेखा गौरकर,सचिव दिनेश थुल, त्र्यंबकराव डेवडे,हनुमान तडस,मनोहर काळे आदी प्रामुख्याने उपस्थित होते.यावेळी उपस्तितीत मान्यवरांच्या हस्ते चित्ररथाचे व डॉ बाबासाहेब आंबेडकर ,संत गाडगेबाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून माल्यार्पण करण्यात आले. चित्ररथाचे पुजन पाहुण्यांचे हस्ते करण्यात आले. प्रसंगी विकसित भारत संकल्प शपथ देण्यात आली.तसेच गुणवंत विद्यार्थी,भजन मंडळी, विविध शासनाच्या योजनाचा लाभ घेतल्या लाभार्थी व जिल्हा परिषद शाळेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शिक्षिका काबंडे यांचा सत्कार करण्यात आला. माजी सैनिक तथा सरपंच मुर्लिधर यांनी विकसित भारत संकल्प चित्ररथ यात्रेचे उद्दिष्ट म्हणजे केंद्र शासनाच्या विविध योजनांची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहचविण्यासाठी असून या यात्रेच्या माध्यमातून दिल्या जाणारी माहिती घेऊन आपण सुध्दा या योजनेचा लाभ द्यावा असे आवाहन केले.आरोग्य विभागाच्या वतीने विद्यार्थ्या व नागरिकांची तपास तसेच आयुष्यमान भारत कार्ड काढून देण्यात आले.यावेळी आतापर्यंत शासनाच्या विविध योजनांची माहिती घेतलेल्या नागरिकांनी आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी मुख्याध्यापक हांडे, मुख्याध्यापक तिपले, मुख्याध्यापक भालकर, रामदास वैद्य मुख्य पाहुणे राजु काकडे आदिंसह गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

समुद्रपुरात स्पीड ब्रेकर बसवले



समुद्रपूर ■ अमोल झाडे

समुद्रपूर :शहरातील करोना सिमेंट रस्त्याचे काम काल पूर्ण झाले. सिमेंट रस्ता मोठा करण्यात आला, डिव्हायडर बसवण्यात आले, समुद्रपुरात बायपास असूनही दिशादर्शक नसल्यामुळे सर्व लहान-मोठी वाहने समुद्रपूरच्या मध्यातून जात होती, स्पीड ब्रेकर नसल्याने समुद्रपूर शहरात अपघात झाल्याचे पुरावे. खूप वाढले, रोज अनेक छोटे-मोठे अपघात घडत होते, अनेक जनावरांना जीव गमवावा लागत होता, ही बाब समुद्रपूरचे सामाजिक कार्यकर्ते वीरेंद्र सुगनचंद सिसोदिया यांच्या लक्षात येताच त्यांनी २ वर्षांपूर्वी सार्वजनिक धरण बांधकाम विभाग व महानगरपालिकेकडे धाव घेतली होती. त्यांच्या बाजूला स्पीड ब्रेकर बसवण्याची मागणी केली होती, पण २ वर्षांपासून ना सार्वजनिक धरण विभागाने लक्ष दिले ना नगर पंचायतीने. २ वर्षापासून श्री वीरेंद्र सिसोदिया या संदर्भात दोन्ही विभागांमध्ये फेऱ्या मारत होते, अखेर त्यांनी ही बाब श्री समीर कुणावर (आमदार) यांच्या निदर्शनास आणून दिली, प्रकरणाचे गांभीर्य पाहून श्री. समीर कुणावर यांनी पुढाकार घेतला. सर्वच चौकात स्पीड ब्रेकर बसवल्याबद्दल समुद्रपूरवासीयांनी वीरेंद्र सिसोदिया यांचे अभिनंदन केले.

खासदार चषक हँडबॉल स्पर्धेत लाखोटिया भुतडा हायस्कूलने पहिला, दुसरा, तिसरा विजेता चषका सह पाच चषक पटकावले

काटोल ■ प्रशांत पवार

कोंढाळी लाखोटिया भुतडा कनिष्ठ महाविद्यालय संघ पाच चषकांसह सांघिक विजेता;कोंढाळी येथे विजयोत्सव साजरा



विभागीय क्रीडा संकुल, मानकापूर ,नागपूर येथे आयोजित खासदार क्रीडा महोत्सवांतर्गत १८ ते २० जानेवारी दरम्यान आयोजित हँडबॉल स्पर्धेत लाखोटिया, भुतडा हायस्कूल, कनिष्ठ महाविद्यालय आणि सीबीएसई हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांका सह सांघिक विजेता चषका सह पाच चषक पटकावले.

नागपूर येथे आयोजित खोलो नागपूर खेलो खासदार चषक, च्या क्रीडा स्पर्धांच्या आयोजनात हैन्डबॉल स्पर्धात कोंढाळी येथील लाखोटीया हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय तसेच लाखोटीया ?भुतडा सीबीएसई हायस्कूल मुले/ विजेते संघाच्या हँडबॉल स्पर्धेत पाच चषकांवर आपल्या ?शाळेचे नांव कोरले. खासदार नागपूर येथील खासदार चषकांसह (पाच ही चषकांसह) कोंढाळी येथे पोहोचताच येथील बसस्थानकावर बस स्थानक नियंत्रक व कोंढाळी नागरीतील आजी माजी खेळाडूंकडून जंगी स्वागत करण्यात आले. तसेच विजेत्या (मुले/ मुली) खेळाडूंना बसस्थानक ते कनिष्ठ महाविद्यालय व सी बी एस ई हायस्कूल पर्यंत वाजत गाजत मोठ्या उत्साहात शाळेपर्यंत पहचविण्यात आले.

१८ ते २० जानेवारी दरम्यान विभाग क्रीडा संकुल मानकापूर येथे झालेल्या खासदार क्रीडा महोत्सवातील हँडबॉल स्पर्धेत लखोटिया भुतडा हायस्कूलच्या १७ वर्षीय खेळाडूंनी (मुले) प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावला, तर लखोटिया भुतडा सीबीएसई हायस्कूलच्या १७ वर्षीय मुलींनी द्वितीय क्रमांक पटकावला. तसेच वरिष्ठ गट मुली द्वितीय तर वरिष्ठ गट मुले तृतीय स्थान पटकावले,. हैन्डबॉल स्पर्धात मैन आफ द रनर अप मैच हर्षल काळसर्पे,मैन आफ द मैच, प्रथमेश घाटोळे, बेस्ट प्लेअर ऑफ टूर्नामेंट जैद असिफ सैय्यद, बेस्ट गोलकिपर -विपूल वाघमारे, तसेच मुलींमध्ये मैन आफ द टूर्नामेंट आदिती प्रविण खेडकर यांनी पटकाविले.

खासदर चषक येथील हँडबॉल स्पर्धेचे तयारी करिता प्रशिक्षक भूषण राचलवार, उज्वल मोटघरे, आकिब खान यांच्यासह अजिंक्य क्लबचे प्रशिक्षक शरद येलेकर आणि नागपूर पोलिसांचे अनिल बोटरे, राहुल बोटरे यांनी परिश्रम घेतले. खासदर चषक स्पर्धातील हैन्डबॉल संघाच्या विजयी खेळाचे विजयोत्सवासाठी माजी खेळाडू गुड्डू पठाण, नीतिन फरकाडे, आसिफ सय्यद, पवन पोकळे यांनी परिश्रम घेतले.

नागपूर येथील खासदार चषक स्पर्धेत अतिप्रतिम कामगिरी बजावणाऱ्या हैन्डबॉल खेळाडूं (मुलें / मुली)सह सर्व प्रशिक्षकांचे लाखोटीया ?भुतडा संस्थेचे अध्यक्ष राजेश राठी ?सचीव डॉ श्याम सुन्दर लद्धड, उपाध्यक्ष रेखाताई राठी, कोषाध्यक्ष मधुसूदन राठी तसेच सर्व संचालक आणि लाखोटीया ?भुतडा कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य सुधीर बुटे, उप प्राचार्य कैलास थुल, सी बी एस ई चे प्राचार्य योगेश चौधरी, पर्यवेक्षक मनोज ढाले हरिष राठी, ज्ञानेश्वर भक्ते,सोनाली पडोळे(ठवळे)यांनी सर्व खेळाडू व प्रशिक्षकांचे अभिनंदन केले.

रामकृष्ण वाघ कला व वाणिज्य महाविद्यालयात माजी विद्यार्थी संघ स्थापना करण्यात आली

कोराडी ■ दिलीप येवले



छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेद्वारा संचालित रामकृष्ण वाघ कला व वाणिज्य महाविद्यालयात माजी विद्यार्थी संस्थेची स्थापना करण्यात आली. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून नेक असोसिएशनचे मार्गदर्शक समृद्धी शिरगावकर उपस्थित होत्या ज्यांनी माजी व आजी विद्यार्थ्यांना माजी विद्यार्थ्यांच्या स्थापनेचे महत्त्व तसेच [illegible] मध्ये माजी विद्यार्थी सभेचे स्थान व जबाबदाऱ्या समजून सांगितल्या. त्याचप्रमाणे संस्थेचे संचालक माननीय डॉ. मारुती वाघ यांनी माझी विद्यार्थ्यांचे माजी विद्यार्थी सभेचे मार्गदर्शन करून सर्व संबंधित सदस्यांचे सत्कार व अभिनंदन केले. त्याचप्रमाणे संस्थेच्या संचालिका लता वाघ यांनी माजी व आजी विद्यार्थ्यांना संस्था ही एक कुटुंब असून कुटुंबामध्ये माजी विद्यार्थ्यांचे स्थान मोठ्या मुलांचे असून त्यांनी येणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या अनुभवातून व मार्गदर्शनातून मुलांना योग्य ते मार्गदर्शन करावे असे उपदेश दिले. माजी विद्यार्थी संदेश बोरकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले जात मागील दहा दहा वर्षाचे सुखद व चांगले अनुभव विद्यार्थ्यां समोर व्यक्त केले. प्रांजली कानोले माजी विद्यार्थी तसेच माजी विद्यार्थी संघाची अध्यक्ष हिने आपल्या मागील सात वर्षाचे अनुभव व झालेल्या प्रगतीला आजी व माजी विद्यार्थ्यांसोबत व्यक्त केले. या कार्यक्रमाला धर्मदाय आयुक्त कार्यालय नागपूर यांच्याकडून रीतसर नोंदणी झाली व पत्र मिळालेल्या मान्यतेला सर्व प्राध्यापक रुंद व आजी व माजी विद्यार्थ्यांनी रीतसर पद्धतीने उद्घाटन करून संपूर्ण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी विद्यार्थिनी तसेच जॉईन सेक्रेटरी माजी विद्यार्थी समितीची प्राजक्ता केने हिने केले. या कार्यक्रमाला माजी विद्यार्थी संघटनेचे सचिव अयाज बागडे कोषाध्यक्ष रुपेश चोंदे तसेच बाकी सर्व माजी विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संपूर्ण मार्गदर्शन व व्यवस्थापन माजी विद्यार्थी संघटनेच्या संचालिका डॉ. अर्चना काहाळे पतकी तसेच सहाय्यक प्राध्यापिका किरण पांडे यांनी कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन केले होते. कार्यक्रमाला उपस्थित प्राध्यापक अष्टपुत्रे सातपुते, वाडेकर, रुईकर, मनीषा, पंकज झगडे, दीपक, देशमुख होते.

महासंस्कृती महोत्सवात भक्तीगीत गायक हंसराज रघुवंशी यांची दमदार प्रस्तुती

प्रेक्षकांनी गायनातून अनुभवले भक्तीमय वातावरणः आज सिंधुरागिरी महानाट्य सादर होणार

नागपूर ■ दिलीप येवले



प्रसिद्ध भक्तीगीत गायक हंसराज रघुवंशी यांनी सादर केलेल्या भगवान श्रीराम, भगवान शंकर आदींवरील एकापेक्षा एक सरसभक्ती रचनांनी महासंस्कृती महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी रसिक प्रेक्षक भक्ती रसात न्हाहून निघाले.

येथील नेहरू मैदानावर सुरू असलेल्या महासंस्कृती महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते कार्यक्रमाचा शुभारंभ झाला.खासदार कृपाल तुमाने,आमदार ॲड.आशिष जयस्वाल, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौम्या शर्मा,अतिरिक्त जिल्हाधिकारी आशा पठाण, रामटेकच्या उप विभागीय अधिकारी वंदना सवरंगपते आदी उपस्थित होते.

'शंभू शंकर नमः शिवाय ...' या सुमधूर गिताने कार्यक्रमाची सुरुवात झाली आणि बघता बघता प्रेक्षकही या गीतावर तल्लीन झाले. सर्वांच्या ओठावर असणारे आणि विशेषतः ग्रामीण भागात अनेक धार्मिक कार्यात प्रामुख्याने गायले जाणारे 'ओम् नमः शिवाय,ओम् नमः शिवाय ओम् नमः शिवाय गीत सुरू होताच हंसराज यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत प्रेक्षकांनी मोबाईलचे टॉर्च हातात उंचावले व त्यांच्या मागे सर्वांनी गीत गायले.

गहन आध्यात्मिक अर्थाने ओतप्रोत असणारे 'शिव समा रहे मुझमे ओर मैं शून्य हो रहा हुं...' या गीताच्या सादरीकरणाने नेहरू मैदानावरील वातावरण काही काळासाठी स्तब्ध झाले होते. शिवशंकर आणि प्रभू श्रीराम यांच्या व्यक्तीमत्वाचा एक- एक धागा उलगडणारी भक्तीभाव आणि आध्यात्मविचार मांडणारी रचना महासंस्कृती महोत्सवाचा तिसरा दिवस स्मरणीय करणारी ठरली.

राज्य शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग आणि जिल्हा प्रशासनाच्यावतीने राज्यातील पहिला महासंस्कृती महोत्सव रामटेक येथे सुरू असून या महोत्सवाचा आज तिसरा दिवस आहे. पहिल्या दिवशी प्रसिद्ध नृत्यांगना हेमा मालिनी यांचे सादरीकरण झाले. दुसऱ्या दिवशी प्रसिद्ध गायक सुरेश वाडकर यांच्या गीत गायनाचा कार्यक्रम झाला.सोमवार २२ जानेवारी रोजी या महोत्सवाच्या चौथ्या दिवशी सायंकाळी ७.०० वाजता रामटेक व प्रभू रामचंद्रांच्या दोन भेटींचे महात्म्य सांगणारे सिंधुरागिरी हे महानाट्य सादर होणार आहे. मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याच्या आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

हिंगणघाट तसेच समुद्रपूर तालुक्यातील शेकडो काँग्रेसवासी व प्रहार कार्यकर्त्यांनी केला भाजपात प्रवेश

समुद्रपूर ■ अमोल झाडे

आ. समिर कुणावार यांचे प्रमुख उपस्थितीत स्वीकारला भाजपाचा शेला



समुद्रपुरःदि. २१ जानेवारी २०२४ रोजी हिंगणघाट विधानसभा क्षेत्रात दिवसेंदिवस भाजपाचा मोठया प्रमाणात विस्तार होत असून विधानसभा क्षेत्रातील नागरीक तसेच युवा कार्यकर्ते आ.समिर कुणावार यांचे नेतृत्वावर विश्वास व्यक्त करीत मोठया प्रमाणात भारतीय जनता पक्षात प्रवेश करीत आहेत. काल दि. २० रोजी हिंगणघाट, समुद्रपुर, सिंदी रेल्वे विधानसभा क्षेत्रातील हिंगणघाट तालुक्यातील तसेच समुद्रपूर तालुक्यातील बहुसंख्य कार्यकर्त्यांनी आ. समीर कुणावार यांचा विधानसभा क्षेत्रातील लोकाभिमुख विकास तसेच कार्यसम्राट आमदार यांची कार्यशैली पहाता रामलल्ला प्राणप्रतिष्ठा सोहळयाचे औचित्य साधून मोठ्या संख्येने भाजपात प्रवेश केला. सदर प्रवेश सोहळयाचे आयोजन काल दि. २० रोजी आ. समीर कुणावार यांच्या स्थानिक जनसंपर्क कार्यालयात करण्यात आले.

याप्रसंगी प्रामुख्याने राहुल हरिभाऊ ढगे , विजय सातपैसे, निखिल शेंडे, विशाल पर्वत , दीपक येरचे, प्रफुल बोबडे, साहिल देहारे, संतोष देहारे, महेश राऊत, प्रज्वल वैद्य , शंकर मानकर , प्रमोद नाचनकर मधुकर किन्नाके, त्रेंबक नाचनकर, लक्ष्मण बाहुरे, दुर्वास नाचणकर, भोजराज बाहुरे, श्रमिक टेकाम, रोशन गायकवाड, रवी मैस्कर, चेतन कावळे, मंगेश मसराम ,बाळू मसराम, संजय सातपैसे, जीवन चिंचोलकर, संजय चौधरी, मयूर येरचे , आर्यन केळझरकर, किशोर देहारे, आशिष वागदे, प्रवीण तडस, विजय गायकवाड, मुकेश भगत, गणेश चौधरी, किसना मसराम, अशोक नाचणकर, नितीन सातपुते, प्रफुल पाल , वैभव राऊत, रोशन कटारे, अंकुर वैद्य, शमा जराटे , सुनील इंगळे, गजानन डंबारे, सुभाष बावणे, मुकेश इंगळे, रणजीत सराटे, गजानन बावणे, अजय देवाडे, रुपेश भडके, शुभम सराटे, खुशाल राऊत, प्रफुल कोवे, चरणदास बोरकुटे, धनंजय वाघ, प्रदीप नरुले, सुभाष मानकर, पांडुरंग मानकर, कुंडलिक सातारकर, खुशाल ठोंबरे, गिरीश काटकर ,संजय देवडे, अमोल मोहिजे, कवडु सालेकर, राजू बावणे, शमाजी पढाल, नितीन लडके, गणेश खडसे, आकाश पोटफोडे, शुभम गिरडे, अविनाश शेंडे, साहिल तेलंग ,प्रशांत डोंगरे, अभिषेक खडसे, सुनील झोबाडे, संतोष डोंगरे, अविनाश चव्हाण, कृष्णा गायकवाड ,शुभम भगत, दिनेश झाडे, नीरज मेंढे , शुभम गवई ,सुनील बावणे , साहिल बावणे, गणेश बावणे , सुरज बावणे, प्रकाश रोकडे, राजू बोभाटे, राहुल ढगे, संदेश ससाने, प्रशांत मानकर, सुरज गौलकार, आकाश मसकर, प्रशांत राऊत, राजु चौधरी, दिनेश सातपुते, अर्जुन अंबोरे, राहुल अंबोरे, हनुमान मस्कर, सचिन कांबळे, प्रज्वल दहीलकर, प्रतीक वादाफळे, भारत हजारे, गजानन महाकाळे, पंजाब यादव ,रामदास कुऱ्हाडे, अमोल भोसले, अतुल बावणे, विनोद अंबोरे, साहिल चौधरी , आकाश अंबोरे, मारुती नन्नावरे, दामूजी कुकडे, सुनील राजपूत, मोरेश्वर थुल, विकास मडावी, विक्की गावंडे, महेश डहाळकर, दिलीप चावरे, दिनेश उईके, धर्मेंद्र पंचभाई, योगेश सातपुते, भारत हजारे, प्रमोद ढोक, आदित्य येडसे, नितेश येडसे , अनिल कोडापे, अनिकेत उईके, चंद्रशेखर येडसे, सचिन एरकाडे, मारुती लोखंडे, संकेत मजरे , विशाल कोडापे, विशाल उईके, सोनू मडावी , विठ्ठल गेडाम, महेश मडावी, विनोद मेश्राम, अनिल वलके , रामाजी कोडापे, संतोष खुडसंगे, वैभव कन्नाके, कवडू पंधरे,विशाल सलाम, मंगेश कोडापे, यादव उईके, पवन कुडमेथे, मुकेश खोडापे, चंद्रशेखर शेडमाके, देवेंद्र खुडसंगे, पंढरीनाथ कुमरे, प्रकाश खुडसंगे, अनुप आत्राम, रोहन मडावी , आकाश कुमरे, जगत गोडसे, साहिल राऊत, गजानन लोखंडे, राज देवाराई, तुषार काकडे, विशाल सलाम, सागर नागपुरे , अनिकेत सोयाम , सतीश आत्राम, अक्षय कंगाले, अविनाश हांडे, सुभाष मेश्राम, महेंद्र बाळबुद्धे, हेमंत शिंदे , नरेश परचाके, हरीश कोवे, अविनाश कुमरे. इत्यादी कार्यकर्त्यांना भाजपात रितसर प्रवेश देण्यात आला.

उपरोक्त कार्यक्रम आमदार समीर कुणावार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.सदर कार्यक्रमाचे वेळी कार्यसम्राट आ.समीर कुणावार यांचेसह भाजपा जिल्हा उपाध्यक्ष किशोर दिघे, भाजपा अनुसूचित जमाती प्रदेश महामंत्री नितीन मडावी, भाजपा जिल्हा महामंत्री आकाश पोहाणे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष छाया सातपुते, हिंगणघाट तालुका भाजपा अध्यक्ष विनोद विटाळे, समुद्रपूर माजी नगराध्यक्ष गजानन राऊत, भाजपा हिंगणघाट शहर अध्यक्ष भूषण पिसे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रफुल बाडे, भाजपा महिला ग्रामीण तालुकाध्यक्षा कीर्ती सायंकार ,माजी पंचायत समिती सदस्य वैशाली पुरके ,ओबीसी प्रदेश महामंत्री रवी उपासे , भाजपा माजी शहराध्यक्ष आशिष पर्बत, डॉ.उमेश तुळसकर, सुभाष कुंटेवार, रामदास गेडेकार , भाजपा कार्यकर्ता संजय माडे, अनिल गहरवार, दिनेश वर्मा, अनुकूल कोचर, अमोल त्रिपाठी, श्री. मानकर इत्यादी भाजपा पदाधिकारी तसेच जेष्ठ कार्यकर्ते सदर पक्ष सोहळ्यास उपस्थित होते.

रामटेक येथे विविध विकास कामाचे भूमिपूजन

रामटेक ■ नंदू कोल्हे



रामटेक येथील कृषी उत्पन्न बाजार समिती येथे प्रवेशद्वार, सी.एस. सी. केंद्र व विविध विकास कामाचे भूमिपूजन १८ जानेवारी २०२४ ला माजी मंत्री सुनील केदार यांचे हस्ते करण्यात आले. याप्रसंगी माजी मंत्री व काँग्रेस कमिटी ग्रामीण जिल्हाध्यक्ष राजेंद्र मुळक, पर्यटक मित्र चंद्रपाल चौकसे, उपाध्यक्ष काँग्रेस कमिटी ग्रामीण नागपुर नरेश बर्वे, अनिल रॉय आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत भुमिपुजन सोहळा पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन कृषी उत्पन्न बाजार समिती रामटेक सभापती सचिन किरपान व संचालक मंडळ ने केले होते.

या कार्यक्रमाला अनिल (मिन्नु) गुप्ता, असलम शेख, बबनराव झाडे , शांताताई कुंभरे, स्वप्निल श्रावणकर, अशोक चिखले, राजेश ठवकर, महेश बम्हनोटे, अरुण बनसोड, कलाताई ठाकरे, रिताताई बर्वे, लक्ष्मीताई कुमरे, सुभाष तळस, अश्विताताई बिरणवार, रविंद्र कुंमरे, बबलू बर्वे, देविदास जामदार, नितीन भैसारे, निखिल पाटील, जयश्रीताई मडावी, रवींद्र कुंमरे, सुनिताताई मिसाळ, शरद दडूरे, महेंद्र दिवटे, श्रीकिसन उईके, कृ.उ.बा.स. रामटेक चे सर्व संचालक त्रिलोकचंद मेहर, विरेश अष्टनकर, रामू झाडे, यशवंत भलावी, नरेश मोहने, साबेरा पठाण, नीलकंठ महाजन, नकुल बरबटे, उमेश भांडारकर, बाबू वरखडे, भीमराव आंबिलढुके, विजय मदनकर, शंकर तांबुलकर, शोभाताई राऊत, अल्काताई सेलोकर, तुळसाबाई महाजन, पुष्पाताई बर्वे, शारदाताई बर्वे, प्रणिताताई भैसारे, अर्पणताई वासनिक, विमलताई नागपुरे, आशाताई फुलसुंगे, बबिताताई कोठेकर, रंजनाताई मस्के, रामचंद्र आडमाची, भाऊराव रहाटे, अरविंद कडबे, विनायक तुरक, अश्विन ठाकुर, आरीफ मालाधारी, राधेश्याम उईके, ममता राळे, कांचनताई माकडे, आदिल मालाधारी, चंद्रभान शिवरकर, शिकू चौधरी, श्याम बिसन, नासिर शेख, चंद्रभान शिवरकर, धान्य अडतिया दलाल आणि व्यापारी,भाजी अडतिया दलाल आणि व्यापारी तसेच कर्मचारी वृंद कृषि उत्पन्न बाजार समिती रामटेक इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

कामठी शहरातील सर्व मांस आणि दारूची दुकाने बंद ठेवण्याचे तहसीलदारांना निवेदन

कामठी ■ नंदू कोल्हे



हिंदू समाज, कामठी यांच्या वतीने शुक्रवारी कामठीचे शिलेदार अक्षय पोवम यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रभू श्री राम यांच्या जीवन अभिषेक सोहळ्याच्या दिवशी लेखी निवेदन दिले. २२ जानेवारीला अयोध्येत. शहरातील सर्व मांस आणि दारूची दुकाने बंद ठेवण्याची विनंती करण्यात आल्याचे सांगण्यात आले. जवळपास ५०० वर्षांच्या प्रदीर्घ प्रतिक्षेनंतर घटनात्मक कायदेशीर लढाई लढल्यानंतर मंदिर उभारणीचा मार्ग मोकळा झाला असून २२ जानेवारीला अयोध्येतील भगवान श्रीरामाच्या भव्य मंदिरात अभिषेक सोहळा होणार आहे. यानिमित्ताने देशभरात आनंदाचे व उत्साहाचे वातावरण असून, या दिवशी कामठी नगरमध्ये ठिकठिकाणी विविध प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सर्वांच्या भावना व श्रद्धा लक्षात घेऊन या दिवशी शहरातील सर्व मांस व दारूची दुकाने बंद ठेवावीत. अशी मनाई करण्यात आली, पत्राची प्रत भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, कामठी-मेढा विधानसभेचे आमदार टेकचंद सावरकर यांनाही पाठवण्यात आली. एक पत्र कामठी नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी यांच्याकडे सुपूर्द करून या विषयावर अधिक लक्ष केंद्रित करण्याची मागणी करण्यात आली. निवेदन देणाऱ्यांमध्ये बंटी पिल्लई, अमन तिरपुडे, हर्षल तलमला, योगेश उका, बिट्टू कवडा, पवन शिडी, आदित्य राऊत, सागर बिसाने, अभिषेक नेकरे, चंदन बर्नम, गोलू यादव, शिवम, मंगेश यादव, सोनू निवार, संजय कानोजी, संजय कानोजी यांचा समावेश आहे. होडोती., प्रमोद बर्नम, सुनील खानवानी आदी उपस्थित होते.

बुलडाणा अर्बन चाकूर १३ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात संपन्न



चाकूर/लातूर ■ नवनाथ डिगोळे

शूभेच्छा देण्यासाठी आनेक क्षेत्रातील ठेवीदार , सभासद ,कर्जदाची उपस्थिती 'नविन वर्षाच्या व शुभेच खुप खुप शुभेच्छा शाखा चाकूर बुलडाणा अर्बन परिवार सर्व सन्माननिय ठेविदार, कर्जदार, सभासद व हिंतचिंतकांना सन्मानपूर्वक स्नेह पुर्वक आमंत्रित करुन सर्व कर्मचारी व शाखा व्यवस्थापक यांनी आपुलकी दर्शवली व तसेच शुभेच्छ्यांचा ही स्वीकार केला व संक्लपक स्वरूपात अधिक अधिक वेळ देऊन बुलडाणा अर्बन शाखा चाकूर हे नाव उज्वल करुन दाखवण्याचा प्रयत्न करनार आशी प्रतिक्रिया व्यक्त केल्या.या प्रसंगी चाकूर शाखा मुख्य प्रबंधक श्री रघुनाथ विश्वनाथ हांगे यांनी मांध्यामांशी बोलताना सांगितले आहे.संपर्क : शाखा कार्यालय, पाटील कॉम्पलेक्स, एच.डी.एफ.सी. बँकेच्या वर, मेन रोड, चाकूर

क्रांतिकारकांच्या वारसांचा सत्कार सोहळा २३ जानेवारीला: तेजस बहुउद्देशिय संस्थेचा उपक्रम

कामठी ■ नंदू कोल्हे

देशाच्या स्वातंत्र्यासाठी ज्या क्रांतिकारकांनी आपल्या प्राणाची आहुती दिली, अशा क्रांतिकारकांच्या वारसांचा सत्कार समारंभ कामठी येथील तेजस बहुउद्देशिय संस्थेने आयोजित केला आहे. हा कार्यक्रम 'तुम मुझे खून दो, मै तुम्हे आझादी ढुंगा' असा नारा देणारे सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीचे औचित्य साधून २३ जानेवारीला सकाळी ११ वाजता कामठीतील छत्रपती शिवाजी चौक, शुक्रवारी बाजार, येथे होणार आहे. यानिमित्त रक्तदान शिबिरही आयोजित करण्यात आले आहे.

ज्या क्रांतिकारकांच्या वारसांचा सत्कार होणार आहे, त्यामध्ये शहीद चंद्रशेखर आझाद यांच्या आईची जीवनभर सेवा करणारे कुटुंबातील सदस्य हेमंतराव मलकापूरकर, शहीद भगतसिंग यांचे लहान बंधू कुलवंत सिंग यांचे पुत्र किरणजित सिंग, शहीद शिवराम हरी राजगुरू यांचे नातू प्रशांत राजगुरू, महान क्रांतिकारी बाल गंगाधर टिळक यांचे पणतू शैलेश टिळक, शहीद अशफाक उल्लाह खान यांचे नातू अशफाक उल्लाह खान, क्रांतिकारी रामकृष्ण खत्री यांचे नातू शैलेंद्र चोपडा खत्री, क्रांतिकारी सचिंद्रनाथ बक्षी यांच्या नातीन मीता बक्षी, क्रांतिकारी जयदेव कपूर यांचे नातू मयूर कपूर, क्रांतिकारी अमर शहीद पं. रामनारायण आझाद यांचे नातू पुनीत ऊर्फ बॉबी दुबे आझाद यांचा समावेश आहे.

या ऐतिहासिक कार्यक्रमाचे उद्घाटन वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाचे सहसंचालक डॉ. मिलिंद फुलपाटील यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी माजी ब्रिगेडियर सुनील गावपांडे तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाधिकारी विपिन इटनकर, नागपूर शहराचे पोलिस आयुक्त अमितेश कुमार

विदर्भातील पहिलाच प्रयोग

देशाच्या स्वातंत्र्यासाठी ज्यांनी बलिदान दिले, अशा शहीद क्रांतिकारकांच्या वारसांचा सत्कार सोहळा आयोजित करण्याचा हा देशातील पहिलाच प्रयोग आहे, असा दावा तेजस संस्थेचे संस्थापक अध्यक्ष चंद्रशेखर अरगुलेवार यांनी 'देशोन्नती'शी बोलताना केला. या क्रांतिकारकांचे देशावर फार मोठे उपकार आहे. त्यांच्या कार्याचे स्मरण नवीन पिढीला व्हावे, हा या कार्यक्रमामागचा हेतू आहे. ही संस्था श्री संत गाडगेबाबा यांच्या विचारावर चालणारी आहे. या सोहळ्याची तयारी सुरू असून समाजातील अनेक मान्यवरांचे त्यासाठी हातभार लागत असल्याचा गौरवपूर्ण उल्लेखही त्यांनी याप्रसंगी केला.



प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.या सोहळ्यास विदर्भवादी नेते सीए सुनील चोखारे, कामठी छावणी परिषदेचे माजी उपाध्यक्ष व उद्योगपती महेंद्र भुटानी, माजी खासदार अजय संचेती, जीवन रक्षक पथकाचे अध्यक्ष पुरुषोत्तम कावळे,सीए शिल्पी टिबडीवाल, राधाकृष्ण हॉस्पिटलचे संचालक गोविंद पोद्दार, तिवारी गॅस एजंसीचे बबलू तिवारी, उद्योगपती मोंटू भुटानी, उद्योगपती राजू अग्रवाल, सुप्रसिद्ध ॲड. श्रीरंग भांडारकर, डीबीएचे माजी अध्यक्ष ॲड. कमल सतुजा, डीबीएचे अध्यक्ष ॲड. रोशन बागडे, यांच्यासह अन्य क्षेत्रातील प्रसिद्ध मान्यवर प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी तेजस बहुउद्देशिय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्वेच्छिक सेवानिवृत्त हवालदार चंद्रशेखर अरगुलेवार, उपाध्यक्ष देविदास पेटारे, सचिव किसन अरगुलेवार, कोषाध्यक्ष गोविंद मामडीवार, सदस्य नरेश शिंदे, कृपा किसन अरगुलेवार, इंदिरा अरगुलेवार, ॲड. विलास राऊत, ॲड. दिनेश बोरकर, रोहित कोचर, विदर्भ गोल्डनचे संपादक एम. ए. जब्बार , मिजवां रहमान ,आदी परिश्रम घेत आहेत.

पारशीवणी येथे भाजपची विस्तारित कार्यकारणी जाहीर व कार्यकर्ता मेळावा उत्साहात: १५० च्या वर कार्यकर्त्यांनी घेतला भाजपात प्रवेश

पारशिवनी ■ नंदू कोल्हे



भारतीय जनता पार्टी पारशवणी शहर व तालुका ओबीसी आघाडी च्या वतीने १६ जानेवारीला स्थानिक खडतकर सभागृह येथे सायंकाळीं विस्तारित कार्यकारणी घोषणा व कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष भाजपा नागपुर जिल्हअध्यक्ष सुधाकर कोहळे,तर प्रमुख अतिथी माजी आमदार डी. मल्लिकार्जून रेड्डी, रामटेक लोकसभा निवडणुक प्रमुख अरविंद गजभिये, तालुका अध्यक्ष योगेश वाडीभस्मे, किसान विकास आघाडी प्रदेश सचिव सुधाकर मेंघर, रामटेक विधानसभा विस्तारक मनोज चवरे, महामंत्री भाजपा नागपुर जिल्हा रिंकेश चौरे, महामंत्री किसान आघाडी नागपुर जिल्हा अशोक कुथे, महामंत्री अल्पसंख्याक मोर्चा भाजपा नागपुर जिल्हा अर्शद शेख, तालुका अध्यक्ष वैद्यकिय आघाडी डॉ. प्रमोद भड, तालुका मंडळ उपाध्यक्ष श्याम भिमटे, तालुका अध्यक्ष महीला आघाडी माधुरी बावनकुळे, महामंत्री दीपाली मस्के, जेष्ठ भाजप नेते प्रकाश वांढे, छायाताई येरखेडे, परसराम राउत, राजु भोयर, शकील शेख,माजी नप. अध्यक्षा माधुरी भिमटे,माजी नगरसेवक सागर सायरे, देवानंद वाकोडे,माजी नगरसेवक निकिता गोन्नाडे, मनिषा धूरई, गुलनाज शेख, पुजा कभे, सरपंच अनिल वांढे इत्यादी मान्यवरांची प्रामुख्याने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका अध्यक्ष योगेश वाडीभस्मे तर संचालन महामंत्री अशोक कुथे व आभार शहर अध्यक्ष हरीश बांगडकर यांनी मानले.

या कार्यक्रमाचे आयोजन भाजपा पारशीवणी शहर अध्यक्ष हरीश बांगडकर, माजी उपसरपंच श्याम भिमटे,ओबीसी भाजपा तालुका अध्यक्ष उमेश कुंभलकर सह पारशीवणी शहर भाजपा कार्यकर्त्यांनी केले होते. याप्रसंगी शेकडो कार्यकर्त्यांनी भाजपात प्रवेश घेतला.त्यात काँग्रेसचे उमेश ठाकरे यांच्या नेतृत्वात असंख्य कार्यकर्त्यांनी तसेच शिवसेनाचे सचिन मोहनकर यांच्या नेतृत्वात असंख्य कार्यकर्त्यांनी तसेच काँग्रेसचे रामकृष्णा बडवाईक यांच्या नेतृत्वात असंख्य कार्यकर्त्यांनी भाजपात प्रवेश घेतला. या प्रवेश घेणाऱ्या कार्यकर्त्यांची जुळवा जुळव करण्यात हरीश बांगडकर व श्याम भिमटे उमेश कुंभलकर यांची मोलाची भूमिका होती. प्रवेश घेणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचे उपस्थित मान्यवरांचे हस्ते पार्टीचा दुपट्टा देऊन स्वागत करण्यात आले.

तसेच विस्तारित कार्यकारणी जाहीर करून अनेकांना शहरातील भाजपच्या विविध पदावर समावेश करण्यात आला. कार्यकारणीत सामील करण्यात आलेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे मान्यवरांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भाजपा पारशीवणी शहर व तालुका ओबीसी आघाडी च्या कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले.

करियर कट्टा या उपक्रमांतर्गत बारामती येथे करिअर संसदेतील पदाधिकाऱ्यांच्या दोन दिवसीय राज्यस्तरीय अधिवेशनात रामकृष्ण वाघ कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स च्या समन्वयकासह विद्यार्थ्यांचा सहभाग

कोराडी ■ दिलीप येवले



महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र आणि एग्रीकल्चरल डेव्हलपमेंट संचालित शारदाबाई पवार महिला कॉलेज यांच्या वतीने शारदानगर तहसील बारामती येथे करिअर संसद या नावाने विद्यार्थ्यांचे दोन दिवसीय राज्यस्तरीय अधिवेशन नुकतेच पार पडले या अधिवेशनासाठी राज्यातील अनेक महाविद्यालयातील करीयर कट्टा संसदेतील पदाधिकारी विद्यार्थी विद्यार्थ्यांनी उपस्थित होते त्यामध्ये विदर्भ कोकण मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील चारशे विद्यार्थ्यांचा समावेश होता अशा भव्य दिव्य राज्यस्तरीय अधिवेशनात महाविद्यालयीन समन्वयक प्रा . सचिन देशमुख आणि विद्यार्थ्यांनी आपल्या औद्योगिक केंद्रीय भेटीवरील कोराडी येथील पावर प्लांट प्रेझेंटेशनसह सहभाग नोंदविला.

या अंतर्गत विद्यार्थ्यांनी कृषी विज्ञान केंद्र बारामती, आप्पासाहेब पवार सायंटिफिक रिसर्च इन्स्टिट्यूट डॉ.शरदचंद्र पवार कॉलेज ऑफ एग्रीकल्चर कॉलेज ऑफ अग्री बिझनेस मॅनेजमेंट इनोव्हेशन अँड इंक्युबॅशन सेंटर बारामती ला भेट दिली.

छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेच्या वतीने संचालक डॉ. मारोती वाघ , संस्थेच्या संचालिका लता वाघ, प्रभारी प्राचार्य डॉ. अर्चना कहाळे पत्की, सांस्कृतिक विभाग प्रमुख व महाविद्यालय समन्वयक सायली लाखे पिदळी यांनी सगळयांना हार्दिक शुभेच्छा दिल्या आणि अभिनंदन केले.

महादुला कोराडी कॉंग्रेस कमिटी तर्फे कार्यकर्ता मेळावा , सत्कार आणि पक्षप्रवेश सोहळा

कोराडी ■ दिलीप येवले



महादुला कोराडी कॉंग्रेस कमिटी तर्फे कार्यकर्ता मेळावा सत्कार आणि पक्षप्रवेश चा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून माजी मंत्री सुनील केदार उपस्थित होते. यावेळी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष सुरेश भोयर, नागपूर जिल्हा परिषद च्या अध्यक्षा मुक्ता कोकर्डे, उपाध्यक्षा कुंदाताई राऊत, सभापती अवंतिका लेकुरवाळे, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा रश्मी बर्वे पंचायत समिती च्या सभापती दिशाताई चनकापुरे कृषी उत्पन्न बाजार समिती चे सभापती अनिकेत शहाणे, उपसभापती कुणाल इटकेलवार, संचालक नवलकिशोर डडमल, नगरसेवक तिलक गजभिये, नगरसेविका अश्विनी वानखेडे उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे आयोजन माजी नगरसेवक रत्नदिप रंगारी यांनी केले होते. यावेळी वारेगांवचे सरपंच रत्नाताई उईके, उपसरपंच कमलाकर बांगरे, युवक कॉंग्रेसचे अनुराग भोयर, निखिल फल्के, पुर्वल तकीत, धीरज यादव , क्रिष्णा यादव, धर्मराज आहाके, राजेश मेश्राम उपस्थित होते. तसेच यावेळी ज्ञानेश्वर वाघ, संजय रामटेके, शरद मेश्राम, कैलाश खेरगडे, कॉंग्रेस कामगार सेलचे आकाश उके, आकाश रंगारी, क्रिष्णा भोयर, शैलेश गजघाटे,राजु पवार, निखिल खरवडे, शंकर सोणेकर, प्रशांत मेश्राम, विलास बचाटे, अक्षय राहांगडाले, राजु इंगळे, विकास लझडे, शंकर छत्री, उपस्थित होते. यावेळी भाजपा मधून कॉंग्रेस मध्ये सोनु गजभार पक्ष प्रवेश घेण्या-यामध्ये सोनू, गजभारे,भगवान वाथोडे, मनोज, वाल्मिक, दिनेश मेश्राम, अक्षय धनगाए, अमित शाहू, पंकज गवांडे, चंदू वाहने, प्रदीप कोटकर, राम गुप्ता, पायल गुप्ता,दुर्गा मुसांदे,रक्षा मेश्राम, पायल मडामे, द्वारका भूसंडे, पूजा मेश्राम, आशा पाटिल, सीमा पंचवते, संगीता शाहू, अनिता सेवारे, फूलाबाई पवार, वर्षा शाहू, सोनम शाहू, शोमेश्वरी शाहू, सुनीता शाहू, रेखा गड्पायले, कविता मेश्राम, शकुंतला, रानू डोंगरे, दुर्गा सहारे,सोनी कुंजाम,शीतल भलावी, सरिता पड़ोती, आशा पाटिल, वंदना राउत, पुस्तकला वघाडे, संध्या वाशनिक, लक्ष्मी सहारे, मनीषा ढकने, हीना वासनिक, मोना गुज्जर, मीना गणवीर वैशाली गजभर, ममता बागडे, राखी राउत, सरूबाई वाघमारे, सुजाता जैन, कौशल्या वानेरे, मनीषा भोंडेकर, ओमेश्वरी पटले, राजेश्वरी पटले, शिल्पा ऊपरिकर, शोभा बड़वाइक, वर्षा गजभिये, छाया चंद्रिकापुरे, सुशीला भलावी,किरण ठाकरे,खोमेश्वरी बिसेन, वंदना मेश्राम, पंचफुला बढ़िले, सरिता पड़ोती, सुलोचना नागपुरे, उर्मिला बागंकर,छाया मेश्राम,रीना रामटेके, प्रणाली गड़पाइले, कीर्ति बागडे, गुणवंता खोब्रागड़े पायल राम गुप्ता, रक्षा महेश मेश्राम , आशा आनंद पाटिल, योगिता करण गजभिए, सुनीता मुकेश चौरे, बेबीबाई सुरेश बारमाठे, सुशीला चंद्रमणी भौतिक, मुमताज खान, ममता संतोष जांभूरे, रुकमा अशोक डोंगरे, संगीता, कमला साहेशराव ठाकरे, पायल जितेंद्र मडामे, दुर्गा गुलरान भूसांडे, आशा रविन्द्र मानवटकर, धुरपता प्रमोद राउत, द्वारका रमेश भूसांडे, करिश्मा रामप्रसाद सहारे, सयाबाई रमेश चंदनकर, छाया रक्षू मडामे मनीषा रविन्द्र मेडामे,जाया मनोज मेश्राम, वंदना बसंत मेश्राम,, ज्योति विनोद लांजेवार, सुनीता अजय शाहू, कल्पना शिवप्रसाद तिरपुडे, आशा सुनील बोरकर, कांताबाई, शिवप्रसाद तिरपुडे, शोभा केशव बोरकर, छाया जीतू मेश्राम, यशोधरा दीपक लोनारे, हेमलता कैलाश कापसे, किरण उत्तम कापसे, प्रमिला वसंत गायकवाड, अजय जैन, कुणाल काकडे, अविनाश दुधबर्वे, मंगेश भिलावे, संदीप मेश्राम, अनिल बोरकर, सुधीर धुरीया, संदीप मेश्राम, अनिल कु-हाडकर, संदीप खोब्रागडे, आशिष जरवार, अनिल पखिड्डे, आकाश वंजारी, प्रदीप खोब्रागडे, विजय सोनवणे , अजय वैद्य, कृष्णा पन्ना, निकेश राऊत, बिट्टू खंगारे बबलु मस्करे कुलदीप सहारे, कैलाश शेंडे, पंकज सोमकुवर, सुनील खोब्रागडे, आकाश वंजारी, राजु सहारे, विनोद पटले, छत्रपती टेंभरे, विशाल सोमवंशी, विजय सोनवाणे, विनोद पवार, ओमप्रकाश वाघाडे , गणेश लाडे, दर्पण खोब्रागडे, मनोज पवार संदीप सहारे, दासा लष्करे, संतोष पवार, सुनील मिटकर, धम्मानंद कांबळे, रोहित रंगारी , गणेश शाहु, देवेंद्र लांजेवार, धम्मदीप गडपायले, राजु शेंडे, रोहित भालाधरे, गणेश राऊत, आकाश भलावी, आदित्य बोरकर, अजय पवार, अंशुल काटेखाये, विक्की काटेखाये, निखिल राऊत, राहुल महानंदीया, मासुम महानंदीया, गौतम लांडगे, दिपक पगारे, कमलेश सिन्हा, सागर डुकरे, आकाश चव्हाण, , अनिकेत रंगारी, दिपक गजभिये, नितेश लांजेवार, रविंद्र बडवाईक, दिनेश मेश्राम, विक्की मेश्राम, सम्राट सहारे, लक्ष्मीचंद उके, मनोज राऊत, सतीश मेश्राम, विजय बोरकर, हेसलाल प्रसाद, शंकर छत्री, सोनु वासनिक , सुनिल रहाटे, कृष्णा नेवारे, नंदलाल सरियाम, गोपाल छत्री, किशोर राउत, राहुल राउत, संतोष राउत, महेश बेहनवाल, संजय गायकवाड, विनोद मरसकोल्हे, संजय कावळे, पिंटु मासुलकर, चंद्रकांत गडपायले, अजय शाहु, दिपक भागळकर, प्रविण नागपुरे, रितीकेश शेंडे, सुरज सिन्हा, दिपक उपवांशी, संजय मडावी, ज्ञानेश्वर नागपुरे, सोनू घरटे, विजय डोंगरे, नितेश सय्याम, महेंद्र गजभिये, देवकुमार पडोती, रितेश कोसरे, अजय डोंगरे, शुभम नागपूरे, तारकेश परीहार, सागर मासुलकर, संतोष ढोक, नाया बचाटे, आकाश छत्री, आशिष गुप्ता, सम्राट मेश्राम, उमेश बरेवार, विकास चवरे, सुनील ढबाले, निखिल मासुलकर, प्रशांत बघेले, मनोज राऊत, मनिष नाहरकर, जानी वाल्टर, विक्की मडावी, रोहित राहटे, रोहित मडावी, विनोद राउत, रोशन वर्मा, रोशन मिश्रा, राहुल सरियाम, प्रदीप राऊत, महेश निरुटी, अपर्ण वाघाडे, आकाश मासुलकर, मोनु वासनिक, राहुल कोहळे, सुमित साखरे, शितल भलावी, ज्योती खैरवार, अंकित घोडेस्वार, दुर्गा भोयर, निर्मला रघुवंशी, सोनी ?कुंजाम, वर्षा भेंडे, रत्नमाला शामु लष्करे, राजु कु-हाडकर, सागर डुकरे, अनिल निंबाळे, रवि झाकणीकर, शिवा निंबाळे, अनिल लष्करे, बाबू झाकणीकर, सुनील कु-हाडकर, राजु मिटकर, सावन कु-हाडकर, प्रकाश इटकर, गुलाब डुकरे, विजय पवार, संजय पवार, मारोती लष्करे, बळीराम झाकणीकर, गंगाराम झाकणीकर, मारोती पवार, अरुण पवार, राकेश पवार, दिलीप लष्करे, पप्पू पवार, राजु मिटकर, अर्जुन झाकणीकर, विनोद झाकणीकर, आकाश झाकणीकर, मनोज झाकणीकर, अनिल कु-हाडकर सचिन नारे, निकेश राऊत,बुद्धम , सोनारे,डोमाजी डाखोडे,कृष्णाजी काले,राजेंद्र काले, निखिल लकडे, प्रणय हिवसे,विक्की गौतम,राजेंद्र वानखेडे स्वप्निल वानखेडे, सुरज इंगले, सिद्धार्थ सोनारे,आणि मोठ्या प्रमाणात कांग्रेस पक्षाचे कार्यकर्ते आणि नागरीक उपस्थित होते.

पुस्तकांमुळे मस्तक सुधारले : संजय गाडे

सातारा ■ जीवन मोहिते



अत दीप भव...याप्रमाणे बदल हा निसर्गाचा नियम आहे.तेव्हा धम्मानुसार २३ वर्षांपूर्वी आपण स्वतःमध्ये बदल करवुन घेतला. परिवर्तनवादी पुस्तके वाचनात आली.त्यामुळे पुस्तकांशी दोस्ती झाली. पुस्तकामुळे मस्तक सुधारले.असे प्रतिपादन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई गटाचे) अध्यक्ष संजय गाडे यांनी केले.

येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरातील सभागृहात संजय गाडे (तात्या) यांचा अभिष्टचिंतनपर सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.तेव्हा सत्कारास उत्तर देताना गाडे मार्गदर्शन करीत होते.ते पुढे म्हणाले,'कोणत्याही प्रकारची व्यसने करू नयेत. सर्वांनी सर्वधर्मसमभाव राखला पाहिजे.आयुष्यातील सर्वात मोठा अभिष्टचिंतनचा कार्यक्रम विशाल कांबळे आणि त्यांचे सहकारी यांनी पार पाडला आहे.शिवाय, पक्षाशिवाय समाजातील सर्व घटकांनी माझ्यावर भरभरून प्रेम केले असल्याने आभार न मानता कायम ऋणातच राहीन.माझे उर्वरित आयुष्य समाजासाठी सत्कारणी लागो.'

रिपब्लिकन योद्धा, टायगर जिंदा है। आंदोलनाचा बादशहा आदी उपाध्या देऊन गाडे तात्या यांचा मान्यवरांनी आपापल्या मनोगतात गौरव केला.

यावेळी प्रा.निरंजन फरांदे, कृष्णा गव्हाळे,किशोर धुमाळ, हृषीकेश गायकवाड,महारुद्र तिकुंडे,रोहन राजेशिर्के, प्रकाश काशीळकीर, निलेश मेहंगावकर, मानसिंग खरात, विशाल भोसले, शिवाजी धस्के, प्रशांत उबाळे, राजेंद्र कांबळे, अरुण पवार, चंद्रकांत कांबळे, शिवदास, कारंडे, आशतोष वाघमोडे,व्ही. शंकरराव,प्रशांत भोसले,विशाल कांबळे, दीपक जाधव,दीपक जामदार,लखन गायकवाड,प्रशांत उबाळे,अनिल वीर,राजेंद्र चोरगे यांच्यावतीने दीपक शिंदे यांनी मनोगत व्यक्त केली.सुभाष मोरे यांनी सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन केलें.प्रारंभी,डॉ. आंबेडकर यांच्या पुतळयास संजय गाडे व सहकारी यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.सदरच्या कार्यक्रमास पक्षातील पदाधिकारी,कार्यकर्ते, गाडे तात्या यांचा परिवार,विविध क्षेत्रातील मान्यवर व कार्यकर्ते मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

शौर्य यात्रेचे रणाळयात जंगी स्वागत



कामठी ■ नंदू कोल्हे

वीर बजरंगी सेवा संस्था महाल नागपूरच्या वतीने नागपूर ते रामटेक गड मंदिर मोटार सायकल शौर्य यात्रेचे आयोजन करण्यात आले होते कामठी तालुक्यात रनाळा पंकज मंगल कार्यालय चौकात ढोल ताशे पताका, बँड, डीजे, फटाक्याच्या आतिषबाजी जंगी स्वागत करण्यात आले. आमदार टेकचंद सावरकर यांचे हस्ते भगवान श्रीराम लक्ष्मण व सीता यांची पूजा आरती करून शौर्य यात्रेचे स्वागत करण्यात आले यावेळी भाजप नागपूर जिल्हा महामंत्री अनिल निधान, भूषण सावरकर, शुभम नवले ,कामठी तालुका भाजप अध्यक्ष उमेश रडके, शौर्य यात्रेचे श्रीकांत आगलावे, निलेश टेकाळे ,चेतन खडसे ,रनाळा ग्रामपंचायतचे सरपंच पंकज साबळे, येरखेडा ग्रामपंचायतचे माजी सरपंच मनीष कारेमोरे, जयराज नायडू, सुनील खानवणी ,उपसरपंच अंकिता तळेकर ग्रामपंचायतचे सदस्य स्वप्निल फुकटे, प्रदीप सपाटे ,अरविंद डोंगरे ,माजी सरपंच देवराव आमधारे, रणाला भाजप अध्यक्ष सुनील मोहोळ ,गजानन तिरपुडे ,कुलदीप पाटील, कुबेर महाले, प्रशांत साबळे, गोलू सुबनवार, निलेश गेडाम, श्रावण केळझरकर, नरेश चकोले, मुकेश दुर्गे ,मनोज धानोरकर ,सुभाष राऊत, अशोक ठाकरे ,विजय दलाल ,सतीश नवले, मधुकर गिरी, शेषराव आढाऊ, विशाल गिरी ,मुकेश बडगे, दिलीप चांदवडकर ,बॉबी महेंद्र ,अमोल नागपुरे,प्रा पराग सपाटे, रोहन कुलरकर ,सुनील खानवाणी सह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

कामगार कल्याण मंडळाची विभागीय काव्य स्पर्धा संपन्न

कामठी ■ नंदू कोल्हे

गुरूवार दिनांक १८ जानेवारी २०२४ रोजी कामगार कल्याण मंडळ, नागपूर विभागाच्या वतीने दरवर्षी प्रमाणे ऑनलाईन काव्य स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या काव्य स्पर्धेत नागपूर विभागातील नागपूर,चंद्रपूर, वर्धा, भंडारा, गडचिरोली आदी जिल्ह्यातील २३ स्पर्धकांनी सहभाग घेऊन एकापेक्षा एक सरस कविता सादर केल्या.

स्पर्धेचे परीक्षण नागपुरातील ज्येष्ठ आणि अनुभवी साहित्यिक मीनलताई येवले आणि साहित्यिक कलाकार खापरखेडा येथील शंकरजी घोरसे यांनी केले.

या काव्य स्पर्धेत इंडोरामा बुटीबोरी कंपनीतील गुणवंत कामगार कवी लीलाधर दवंडे यांच्या कामगार असतो जगत या कवितेला प्रथम क्रमांक मिळाल्याबद्दल त्यांचे सर्व साहित्य स्तरावरून, कामगार कल्याण मंडळ, कंपनी व्यवस्थापन तसेच मित्र मंडळीकडून अभिनंदन करण्यात येत आहे. लीलाधर दवंडे यांनी मागील ऑनलाईन काव्य स्पर्धेत सुध्दा नागपूर विभागातून प्रथम क्रमांक पटकावला होता. पुढल्या राज्यस्तरीय काव्य स्पर्धेत लीलाधर दवंडे यांना नागपूर विभागाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी यामुळे मिळालेली आहे.या स्पर्धेत द्वितीय क्रमांक राजरत्न पेठकर यांच्या कवितेला, प्रशांत नागापुरे यांच्या कवितेला तृतीय क्रमांक आणि नेहा भांडारकर यांच्या कवितेला प्रोत्साहन क्रमांक मिळालेला आहे.

तालुकास्तरावर दिव्यांग साहित्य वितरण शिबिराचे आयोजन

वर्धा ■ प्रतिनिधी

केंद्र शासनाच्या एडीआयपी योजनेंतर्गत वर्धा तालुका वगळून जिल्ह्यातील सातही तालुक्यात दि.२३ जानेवारी ते १५ फेब्रुवारी या कालावधीत संबंधित पंचायत समिती येथे मोफत दिव्यांग साहित्य वितरण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. पात्र दिव्यांग लाभार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी केले आहे.देवळी येथे दि.२३ जानेवारी रोजी आयोजित शिबिरात ४७० लाभार्थ्यांना, आर्वी येथे दि.२४ जानेवारी रोजी ४५४ लाभार्थ्यांना, आष्टी येथे दि.२५ जानेवारी रोजी ३७२ लाभार्थ्यांना, कारंजा येथे दि.१२ फेब्रुवारी रोजी ३६४ लाभार्थ्यांना, हिंगणघाट येथे दि.१३ फेब्रुवारी रोजी ३५३ लाभार्थ्यांना, समुद्रपूर येथे दि.१४ फेब्रुवारी रोजी ३६० लाभार्थ्यांना व सेलू येथे दि.१५ फेब्रुवारी रोजी २७९ लाभार्थ्यांना विविध दिव्यांग साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे.शिबिरामध्ये येतांना दिव्यांग लाभार्थ्यांना यापुर्वी झालेल्या मोजमाप शिबिरामध्ये देण्यात आलेल्या पोचपावती, मुळ कागदपत्रे घेऊन उपस्थित राहावे. असे जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी कळविले आहे.

भाजपा द्वारा स्वच्छता अभियान



कामठी ■ नंदू कोल्हे

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत स्वच्छ तीर्थ अभियानांतर्गत अयोध्येतील प्रभू श्रीराम प्राण प्रतिष्ठापना सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर कामठी प्रभाग १५ वित्तु बाबा नगर येथील नाग मंदिरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

माजी नगरसेवक लालसिंग यादव,भाजपा पदाधिकारी उज्वल रायबोले, विक्की बोंबले, बादल कठाने तथा अशोक मिराशे, नरेश यादव, विनोद डेंगे, राहुल यादव, राजु ऊके, दिलीप सेलोकर, पवन गोमासे, राजु उईके, बबलू यादव, राकेश क्षिरसागर, राजु यादव, राजेंद्र घुले, तुलसीराम यादव, श्यामराव मैंद, किशोर शर्मा या रामभक्तांनीही या पवित्र कार्यात सहभाग घेतला.

विभागात २९ हजार प्रगणक करणार राज्य मागासवर्ग आयोगामार्फत सर्वेक्षण सर्वेक्षणासाठी यंत्रणा सज्ज

नागपूर ■ दिलीप येवले

राज्य मागासवर्ग आयोगामार्फतच्या मराठा समाज व खुल्या प्रवर्गातील सर्वेक्षणासाठी विभागात २९ हजार ४२ प्रगणकाची नियुक्ती करण्यात आली आहे. येत्या २३ जानेवारीपासून सुरू होणाऱ्या सर्वेक्षणासाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज असल्याची माहिती विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी यांनी आज दिली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मागासवर्ग आयोगाच्या सर्वेक्षणासंदर्भात उच्चस्तरीय आढावा घेतला. त्यानुसार दि. ३१ जानेवारी पर्यंत सर्वेक्षणाचे काम युध्दपातळीवर पूर्ण करण्यात येणार आहे.विभागातील ६४ तालुक्यातील तसेच महानगरपालिका हद्द अशा ८ हजार ४२९ गावात गावातील १ कोटी १७ लाख ५३ हजार ५२ लोकसंख्या, तसेच २६ लाख ९३ हजार ४३३ घरांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. या सर्वेक्षणासाठी

२३ तारखेपासून प्रत्यक्ष सर्वेक्षणाला सुरुवात

२९,०४२ प्रगणकांच्या सेवा घेण्यात येणार आहे.त्यासोबतच २२३ राखीव प्रगणक नियुक्त करण्यात आले आहेत. तसेच १ हजार ९७० पर्यवेक्षक तसेच १८८ राखीव पर्यवेक्षक नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती श्रीमती विजयालक्ष्मी बिदरी यांनी दिली. १५० प्रगणकाची नियुक्ती करताना १५० ते २०० कुटुंबासाठी एक प्रगणक आणि १५ प्रगणकांसाठी एक पर्यवेक्षक नियुक्त करण्यात आला आहे.

प्रगणक व परीक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.राज्य मागासवर्गीय आयोगाचे सर्वेक्षणासाठी लोकसंख्या व घरांच्या संख्येनुसार प्रगणक व पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार नागपूर महानगरपालिका हद्दीतील पाच लाख २७ हजार ६३४ हजार ६५६ लोकसंख्येसाठी ७०५५ प्रगणक नियुक्त करण्यात आले आहे .नागपूर जिल्ह्यातील चार लाख ४२ हजार ८९७ घरातील २२ लाख १४ हजार ४८५ लोकसंख्या असून त्यासाठी ६७८ प्रगणक राहणार आहेत. वर्धा जिल्ह्यातील तीन लाख ९८४६ घरातील १३ लाख ६७४ हजार लोकसंख्या, भंडारा जिल्ह्यातील दोन लाख ७८ हजार ७६ घरातील बारा लाख ३३४ लोकसंख्या, गोंदिया जिल्ह्यातील दोन लाख ९२ हजार ३६९ घरातील १३ लाखा २२ हजार ५०७ लोकसंख्या, चंद्रपूर महानगरपालिका हद्दीतील ६९ हजार,८६९ घरातील तीन लाख ५२ हजार ४१७ लोकसंख्या, चंद्रपूर जिल्ह्यातील चार लाख ७० हजार ९८२ घरातील १८ लाख ८३ हजार ९२८ लोकसंख्या, तर गडचिरोली जिल्ह्यातील तीन लाख ७६० घरातील दहा लाख ७२ हजार ९४२ लोकसंख्येचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे.

भारतीय सशस्त्र सैन्यदलामध्ये अधिकारी पदासाठी मोफत प्रशिक्षण

प्रशिक्षणास सहभाग नोंदविण्यासाठी मुलाखतीस हजर राहण्याचे आवाहन

वर्धा ■ प्रतिनिधी

भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलात अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना सर्विस सिलेक्शन बोर्ड या परिक्षेची तयारी करण्याकरीता महाराष्ट्रातील नवयुवक व नवयुवतींसाठी मोफत प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रशिक्षणात सहभाग नोंदविण्याकरीता इच्छुकांनी मुलाखतीस उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

सदर प्रशिक्षण दि.१ फेब्रुवारी ते १५ एप्रिल या कालावधीत छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र नाशिक येथे होणार आहे. यासाठी जिल्ह्यातील इच्छुक पात्र उमेदवारांनी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे दि.२९ जानेवारी रोजी मुलाखतीकरीता उपस्थित राहावे. मुलाखतीस येतेवेळी डिपार्टमेन्ट ऑफ सैनिक वेलफेअर, पुणेच्या संकेतस्थळावरुन सीडीएस -६२ कोर्ससाठी प्रवेशपत्र व त्यासोबत असलेली परिशिष्ठांची प्रिंट घेऊन ते पुर्ण भरुन सोबत आणावे.

सीडीएस वर्गामध्ये प्रवेश मिळण्यासाठी उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा. संघ लोकसेवा आयोग नवी दिल्ली यांचे मार्फत घेण्यात येणा-या कंन्बाईंड डिफेन्स सर्विसेस या परीक्षेकरीता ऑनलाईनद्वारे अर्ज केलेला असावा.अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र नाशिक यांच्या ०२५३-२४५१०३२ या दुरध्वनी क्रमांकावर किंवा ९१५६०७८८०६ या व्हॉट्स ?प क्रमांकावर किंवा ूहग्हु.ज्रूर्हैप्ट्रेर्स्त.म्दस या ईमेलवर संपर्क साधावा, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी फ्ला.ले. धनंजय सदाफळ यांनी कळविले आहे.

बिनाकी लेआउट येथील पंचवटी नगर खसरा क्र ९० -९३ मधे १५ वर्षाआधी दलीत वस्ती सुधार योजनेच्या फंडामधुन दोन माळयाची लाईबरी बनविन्यात आली

बिनाकी लेआउट येथील पंचवटी नगर खसरा क्र ९० -९३ मधे १५ वर्षाआधी दलीत वस्ती सुधार योजनेच्या फंडामधुन दोन माळयाची लाईबरी बनविन्यात आली होती,

बनवल्या नंतर त्या लाईबरीचा रीतसर उद्घाटन कतन्यात नाही आल्या ने आणी कोणत्याही सरकारी संस्थांनला हस्तांतरित न केल्या मुळे ती लाईबरी ऐक खंडर झाली होती,

गेल्या २-३ वर्षापासुन त्या लाईबरी ला चालू करन्याच्या ट्रुस्टीकोणातुन पत्र व्यवहार करुन पाठपुरावा केला आणी नागपूर सुधार प्रन्यास कडून लाईबरी दुरुस्त करन्या करीता १५ लक्ष रुपये मंजुर करुन घेतले,

आणी त्या लाईबरी ला गेल्या ४ महीन्या आधी रीपेरींग पण करुन



घेतले,

आता सर्वात मोठा प्रश्न असा की जेव्हा पर्यंत नागपूर सुधार प्रन्यास ही लाईबरी कोणत्याही शासकीय संस्थांना जेव्हा पर्यंत हस्तांतरित करनार नाही तेव्हा पर्यंत ही लाईबरी सुरू होनार नाही

मी ह्या लाईबरी ला शासकीय संस्थांना हस्तांतरित करुन लवकरात लवकर ही लाईबरी सुरू करा अशाप्रकारचे २ पत्र मां, सभापति नागपूर सुधार प्रन्यास यांना दीले आणी मणालो की ह्या लाईबरी ला तुम्ही समाज कल्याण ह्या संस्थेला द्या, जेनेकरुन तीतल्या स्लम भागात राहून शिक्षन करनार्या गोरगरीब विध्यार्थानंकरीता सोईस्तर होईल ,

तर सभापति महोदय मणाले की आमची जागा आहे तर दुसर्यांना का देउ तर मी मणालो की तुम्ही ती लाईबरी चालवा आम्हाला काही ही आपत्ति नाही,

पण आता सभापति महोदय मणतात की ती लाईबरी आम्ही पालकतत्वावरती देउ ह्या गोस्टीला मात्र आमचा विरोध आहे

सभापति महोदय यांनी उत्तर नागपूर डिवीजन ऑफिस मधे फाईल वरती लीहून पाठवल आहे त्या मधे अस लीहल आहे की

संबंधित लाईबरी पालकतत्वावरती देन्या करीता जाहीरात काढन्यात यावी जेनेकरुन नागपूर सुधार प्रन्यास ला पैस्याची आवक होईलि

आमची मागणी ऐवळीच आहे की सरकारनी महाराष्ट्रातील जवळपास २७ हजार जील्हा परीषद आणी महानगर पालिका च्या शाळा बंद करुन शीक्षणाचा खासगीकरण केला

तुमच्या मधे लाईबरी चावन्याच दम नाही आहे तर तुम्ही ही लाईबरी शासकीय संस्थांना का देत नाही आहेत ?

त्याच प्रकारे आता लाईबरीचा सुध्दा खासगीकरण करनार आहेत का ?

जी पण प्रायवेट संस्था संबंधित लाईबरी ला पालकतत्वावरती घेणार ती संस्था लाईबरीच्या मेंटनेंस च्या नावाखाली विध्यार्थानंकडून पैसे घेनार नाही का ?

काय गोरगरीब विध्यार्थांना शीक्षणाचा अधीकार नाही आहे का ?

काय ह्या देशा मधे गरीब आईवडीलांच्या पोटी जन्म घेउन उच्च शीक्षन घेन्याचा स्वपन पाहन गुन्हा झाल आहे का ?

काय दलीत वंचित समाजाला शिक्षन घेन्याचा अधीकार संपुस्टात आलय का ?

असे अनेक प्रश्न आहते सर

सोबत सभापति महोदय यांना दीलेल्या पत्रांची प्रत जोडलेली आहे

देवानंद उके
धम्मदीप नगर, उत्तर नागपूर
९८३४७०४४५४

सर्कसपूर येथे आमदार दादाराव केचे यांच्या हस्ते भूमिपूजन संपन्न

आर्वी ■ प्रतिनिधी



आर्वी तालुक्यातील सर्कसपूर येथील हनुमान देवस्थान प्रांगणात प्रादेशिक पर्यटन विकास योजना सन २०२३ - २४ अंतर्गत हनुमान मंदिर सुशोभीकरण व सभागृहाचे बांधकाम करण्यासाठी १५ लक्ष रूपये किमतीच्या मंजूर कामाचे भूमिपूजन आमदार दादाराव केचे यांच्या हस्ते तथा सुमित वानखेडे वर्धा लोकसभा प्रमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.

गेल्या अनेक वर्षांपासून सर्कसपूर वासिंयांची गावातील मुख्य देवस्थान हनुमान मंदिरात सभागृह असावे अशी मागणी होती. या करीता हनुमान मंदिर ट्रस्टचे विश्वस्त मंडळाने आमदार दादाराव केचे यांच्याशी संपर्क साधून मागणी संदर्भात निवेदनातून कळवले होते. तसेच सुमित वानखेडे यांनाही मंदीर ट्रस्टने निवेदन दिले असता क्षणाचाही विलंब न लावता पर्यटन विकास योजनेंतर्गत हा निधी शासन दरबारी पाठपुरावा करून मंजूर करून दिला. एकीकडे अयोध्येत प्रभू श्री रामाची प्राणप्रतिष्ठापना होत आहे आणि त्यातच हनुमान मंदिरात सभागृहाच्या कामाचे भुमिपुजन झाल्याने सर्कसपूर वासिंयांनी समाधान व्यक्त करत आनंद व्यक्त करत आहेत.

या भुमिपुजन समारंभाला गोपीनाथ कडू अध्यक्ष हनुमान मंदिर ट्रस्ट, सचिंन्द्र कदम, अश्विन शेंडे, गजानन हनवते सरपंच, निखिल कडू, धर्माजी तेलमोरे, उमेश गोरले, विजय सोलव, शाम सरोदे, दिगांबर सोलव, सचिन कडू, मंगेश रहाटे, निलेश सहारे पोलीस पाटील, जयश्री सोलव, पुनम गोरले, रोशनी गोरले, तुषार कडू, अजिंक्य कडू, अरूण कडू, रेखा कडू, रेखा सरोदे, नंदा सरोदे, उषा सरोदे, उषा कडू, वैशाली कडू, रंजना कडू, सिमा कडू, शिला सरोदे, संजय सोलव, पुंडलिक सरोदे, राहुल गोरले, अजाबराव सोलव, मालू फाले, जनार्दन बरडे, पंडीतराव बरडे, विठ्ठल कुरवाडे, सुभाष गोरले,प्रभा कडू, मंदा सोलव, इंदिरा जुनघरे, अंकुश कडू, ज्ञानेश्वर गोरले, उज्वला गोरले, केशव गोरले, दामोदर गोरले, पंचफुला रहाटे, छाया मात्रे, सुभाष सरोदे, दुर्गा गोरले, सुमित सोलव, तुषार सरोदे, कार्तिक गोरले, रोषन गुडधे यांच्यासह अनेक महीला व पुरुषांची लक्षणीय उपस्थिती होती.

पोलीस प्रशासन आष्टी कडून श्रीराम जन्मभूमी प्राणप्रतिष्ठा सोहळा पार्श्वभूमीवर रूट मार्च



आष्टी (शहीद) ■ प्रतिनिधी

आष्टी (शहीद) अयोध्या येथे दिनांक २२ /०१/२०२४ रोजी होणारा श्रीराम जन्मभूमी प्राणप्रतिष्ठा सोहळा देशात सर्वच राज्यात साजरा करण्यात येणार असल्याने पोलीस प्रशासनाच्या वतीने संपूर्ण देशात शांतता व सूव्यवस्था राखण्याहेतु सूचना तसेच संवाद बैठका सुद्धा घेण्यात येत आहे. तर आष्टी पोलीस प्रशासन व होमगार्ड यांच्यावतीने आष्टी शहरात आयोध्या येथील श्रीराम जन्मभूमी प्राणप्रतिष्ठा सोहळा पार्श्वभूमीवर दिनांक २०.१.२०२४ रोजी रूट मार्च घेण्यात आला. रूट मार्च आष्टी पोलीस स्टेशन पासून आष्टी येथील बाजारपेठ,बस स्थानक परिसर ते संपूर्ण गावाला वेढा घालून घेण्यात आला.

सदर रूट मार्च पोलिस अधीक्षक नुरुल हसन,अप्पर पोलीस अधीक्षक सागर कवडे, उपविभागीय पोलीस अधिकारी खंडेराव यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक सुनील सिंग पवार यांच्या निगराणीत आष्टी पोलीस प्रशासन व होमगार्ड यांच्या सह यशस्वीरित्या घेण्यात आला.

शामराव बारई काटोल विधानसभा सहनिवडणुक प्रमुखपदी नियुक्ति



नरखेड ■ अतुल दंढारे

माजी भाजपा अध्यक्ष शामरावजी बारई यांची काटोल विधानसभा सहनिवडणुक प्रमुख जिल्हा अध्यक्ष सुधाकरजी कोहळे यांनी नियुक्ती केली, याप्रसंगी रामटेक लोकसभा प्रभारी अरविंदजी गजभिये, काटोल विधानसभा निवडणूक प्रमुख चरनसिंगजी ठाकूर,जिल्हा महामंत्री दिनेश ठाकरे,जिल्हा उपाध्यक्ष उकेशजी चौहान,नगरविकास आघाडी जिल्हा अध्यक्ष मनोज कोरडे, तालुका अध्यक्ष दीलेश ठाकरे, निलेश धोटे ,राजेश क्षीरसागर, विजय महाजन ,चेतन ठोंबरे व इतर पदाधिकारी उपस्थित होते, त्यांचा निवडीबद्दल माजी मोवाड नगराध्यक्ष सुरेशजी खसारे,इस्माईल बारुदवाले,जिल्हा मंत्री दिलीप तांदळे,प्रफुलजी हवाले, रवीजी दाढे, राजेंद्र सरोदे,मुरलीधर रोकडे,हेमंत कवडकर,युवा मोर्चा तालुका अध्यक्ष परमानंद ढोणे,नरखेड शहर युवा मोर्चा अध्यक्ष सारंग दळवी, मनीष दुर्गे,संजय कामडे,राहुल चौहान,रामटेक लोकसभा विस्तारक मुंगले,विधानसभा विस्तारक विशाल भोसले,सुनील मोहोड,गौरव गुरमुळे,यांनी अभिनंदन केले

संस्कार हीच आयुष्यातील सर्वश्रेष्ठ शिदोरी- महेशबापू ढमढेरे

पुणे ■ रिजवान बागवान

पुणे- संस्कार हीच आयुष्याची सर्वात मोठी शिदोरी असून राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी श्रमसंस्कार जोपासणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन तळेगाव ढमढेरे ता.शिरूर येथील शिक्षण प्रसारक मंडळ व विद्या सहकारी बँकेचे विद्यमान संचालक महेशबापू ढमढेरे यांनी केले.

आमदाबाद, ता.शिरूर येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व तळेगाव ढमढेरे येथील शिक्षण प्रसारक मंडळाचे साहेबराव शंकरराव ढमढेरे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षपदावरून ते बोलत होते.

आमदाबादच्या सरपंच सौ. सोनाली रेवणनाथ थोरात,शिरूर तालुका भाजपाचे अध्यक्ष आबासाहेब सोनवणे,मांडवगण फराटा येथील श्री.)वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठानचे संचालक ज्ञानेश्वर उर्फ पिंटू फराटे पाटील, शिरूर तालुका किसान काँग्रेसचे अध्यक्ष रामदास थोरात, शिरूर तालुका काँग्रेसचे उपाध्यक्ष सुनील शेलार, उद्योजक सतीश थोरात, आमदाबादचे माजी सरपंच पोपटराव घुले, उपसरपंच प्रदीप साळवे, आमदाबादच्या विविध कार्यकारी सोसायटीचे माजी चेअरमन नितीनअण्णा थोरात, माजी सरपंच बबनराव थोरात, तंटामुक्ती समितीचे उपाध्यक्ष अविनाशशेठ सोनार, मेजर भाऊसाहेब जाधव, ह. भ. प. नवनाथ माशेरे महाराज, रेवननाथ थोरात, अशोक माशेरे, उत्तमराव फराटे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष साईनाथ घुले, ग्रामपंचायत सदस्य स्नेहलताई थोरात,



आबासाहेब पवार, मुख्याध्यापिका सुनीता जगताप, सखाराम थोरात, प्रकाश सत्तूभाऊ थोरात, मंदा चौरे, मनोज गांधी, महाविद्यालयाचे प्राचार्य अशोक नवले, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सोमनाथ पाटील, प्रा . डॉ. संदीप सांगळे आदी मान्यवर याप्रसंगी व्यासपीठावर उपस्थित होते.

श्री. महेशबापू ढमढेरे पुढे म्हणाले की,राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार सर्वत्र शिक्षण व्यवस्थेमध्ये अमुलाग्र बदल होत आहेत. या बदलांकडे आव्हान म्हणून न पाहता संस्थाचालक, शिक्षक व विद्यार्थी या घटकांनी संधी म्हणून पाहणे गरजेचे आहे.आजच्या बदलत्या परिस्थितीमध्ये शिक्षण व्यवस्था बळकट होणे गरजेचे असल्याचेही महेश बापू ढमढेरे यांनी सांगितले. कोणतेही व्यक्तिगत हित न पाहता तळेगाव ढमढेरे येथील शिक्षण प्रसारक मंडळ सातत्याने सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून तळागाळातील विद्यार्थ्यांच्या उन्नतीसाठी अहोरात्र प्रयत्नशील असल्याचेही ते म्हणाले.

याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले शिरूर तालुका भाजपाचे अध्यक्ष आबासाहेब सोनवणे यांनी स्वयंसेवकांना श्रमप्रतिष्ठा जोपासण्याचे आवाहन केले.राष्ट्रीय सेवा योजनेची शिबिरे ही आजच्या युवकांसाठी खऱ्या अर्थाने पर्वणी असून जास्तीत जास्त युवकांनी यामध्ये सहभागी होण्याची गरज असल्याचेही ते म्हणाले. विद्यार्थ्यांनी योग्य वयातच आपला बौद्धिक स्तर उंचावण्यासाठी आलेल्या संधीचा लाभ घेऊन समाज व देशाच्या उन्नतीसाठी आपले योगदान द्यावे असेही श्री .सोनवणे यावेळी म्हणाले.

मांडवगण फराटा येथील श्री. वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठानचे संचालक ज्ञानेश्वर उर्फ पिंटू फराटे पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. संघर्षातूनच कोणतेही व्यक्तिमत्व घडत असते याची जाण सातत्याने आजच्या युवकांनी ठेवण्याचे आवाहन श्री. फराटे पाटील यांनी केले. जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वास ही यशाची त्रिसूत्री असून जास्तीत जास्त युवकांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या अशा श्रमसंस्कार शिबिरांच्या माध्यमातून समाजातील तळागाळातील घटकांपर्यंत जाण्याचा प्रयत्न करावा असे ते म्हणाले.

शिरूर तालुका किसान काँग्रेसचे अध्यक्ष श्री. रामदास थोरात यांनी युवकांना आई-वडील व गुरुजनांचे ऋण कधीच विसरू नका असे आवाहन केले.आजच्या नव्या पिढीने ध्येयवेडे झाल्याशिवाय गत्यंतर नसल्याचेही ते म्हणाले. जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहून ग्राम विकासाबरोबरच व्यक्तिमत्व विकास साधण्याचे आवाहन देखील श्री. रामदास थोरात यांनी केले.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या आमदाबाद येथील शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ह.भ.प. नवनाथ माशेरे महाराज, श्री. अविनाश सोनार, सरपंच सौ. सोनालीताई थोरात, आदी मान्यवरांनी आपापली मनोगते व्यक्त केली. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. संदीप सांगळे यांनी प्रास्ताविक तर कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सोमनाथ पाटील यांनी आभारप्रदर्शन केले तर डॉ. दत्तात्रय कारंडे यांनी सूत्रसंचालन केले.

तळेगाव ढमढेरे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या या सात दिवशीय विशेष श्रमसंस्कार शिबिराचा समारोप २५ जानेवारी रोजी होणार आहे. 'युवकांचा ध्यास - ग्राम व शहर विकास' ही यंदाच्या शिबिराची प्रमुख संकल्पना असून शिबिर काळात ग्राम स्वच्छता अभियान, पर्यावरण जनजागृती, नव मतदार जनजागृती, अंधश्रद्धा निर्मूलन, वृक्षारोपण, ग्राम सर्वेक्षण, शिवार फेरी, प्रौढ साक्षरता व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे.

मानवाच्या सर्वांगीण उद्धारासाठीच संतांचे कार्य : ह. भ. प. राष्ट्रीय समाज प्रबोधनकार गजानन महाराज भोरे

खापा पाटण येथे वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा पुण्यतिथी महोत्सव

कामठी ■ नंदू कोल्हे

मानवी जीवन म्हणजे संघर्ष पथ आहे अनंत जन्माच्या पुण्याईनंतर दुर्लभ मनुष्यजन्म प्राप्त झाला आहे. तो सार्थकी लागण्यासाठी संतांच्या विचारावर चालणे. त्यांच्या तत्त्वज्ञानाचे आचरण करणे यातच मनुष्य जन्माचे कल्याण आहे. मानवाच्या सर्वांगीन उत्तरासाठीच संतांचे कार्य आहे. असे प्रतिपादन राष्ट्रीय समाज प्रबोधनकार ग्रामगीताचार्य गजानन महाराज भोरे यांनी गोपाल काल्याच्या कीर्तनातून केले.



खापा (पाटण) येथे वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ५५ व्या पुण्यतिथी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक १८ ते २१ जानेवारी पर्यंत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रचारवीर स्व.श्रीपतरावजी राजुरकर व दानशूर देवरावजी उर्फ बाळासाहेब राजुरकर यांच्या प्रेरणेने गेली ५५ वर्षापासून वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा पुण्यतिथी महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. यात दिनांक १८ ला सामुदायिक ध्यान व पुंडलिक बाबू चौधरी यांचे चिंतन पर विचाराने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. सकाळी सात वाजता श्री गुरुदेव सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रकाश राव भालेराव यांची उपस्थितीत ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यात आले. त्यानंतर श्री पांडुरंग जी निर्मळ, भीमरावजी राजूरकर, वसंतराव गहूकर, गजानन धडाडे, अनिल गहूकर, गोलू वानखडे, निजाम बराडे यांचे उपस्थितीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे पुतळ्याचे व ब्राह्मणात पुतळ्याचे पूजन करण्यात आले. त्यानंतर दुपारी रुक्मिणी महिला भजन मंडळ, वारकरी बाल भजन मंडळ यांचे भजन, सायंकाळी सामुदायिक प्रार्थना गुरुदेव सेवा मंडळ नागपूर येथील रामदास जी टेकाळे यांचे भाषण रात्री सप्त खंजिरी वादक चैतन्य बिले महाराज यांचे कीर्तन झाले. दिनांक १९ ला सामुदायिक ध्यान व चिंतन ज्ञानेश्वरजी गहूकर, त्यानंतर वारकरी भजन, सती अनुसया भजन मंडळ (खापा), दुर्गा उत्सव भजन मंडळ,(गोंड खैरी) सामुदायिक प्रार्थना व चिंतन श्री कळंबे गुरुजी (झिंगाबाई टाकळी, नागपूर) रात्री हरिभक्त परायण गजानन महाराज भोरे यांचे कीर्तन दिनांक २० ला सकाळी सामुदायिक ध्यान, पालखी सोहळा व गजानन महाराज भोरे यांचे गोपाल काल्याचे किर्तन व त्यानंतर प्रसाद महाप्रसादाचे आयोजन श्री गुरुदेव पंचवटी सेवाश्रम खापा पाटण च्या वतीने करण्यात आले होते. यावेळी अनेक मान्यवरांची उपस्थिती होती कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री गुरुदेव पंचवटी सेवाश्रम चे अध्यक्ष शालीकराव वानखडे व श्री दत्तूजी वराडे यांनी केले.

वाचनालयाच्या माध्यमातून गावकरी एकत्र आणण्याचा प्रयत्न - प्रा. प्रकाश खळगे

छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालयात स्नेहसंमेलन व पालक मेळावा उत्साहात साजरा ;लहान मुलांचे संस्कार हे आई-वडीलांवर अवलंबून असतात- एपीआय आमन सिरसट :शाहू महाराज आदर्श वाचनालय-पत्रकार सुनिल डोंगरे



बीड ■ गितांजली लव्हाळे

वडवणी तालुक्यातील पिंपरखेड येथे आज रविवार दि २१.१.२०२४ रोजी छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालयात स्नेहसंमेलन व मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घघाटन सकाळी १० वाजता वडवणी पोलीस स्टेशनचे एपीआय अमन शिरसाट यांच्या हस्ते संपन्न झाले.या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती मा. राहुल वाघमारे संस्थापक अध्यक्ष राजश्री छत्रपती शाहू महाराज स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र बीड,एपीआय आमन सिरसट, लताताई ज्ञानोबा शिंदे सरपंच पिंपरखेड,ॲड.डी एस तागंडे बीड जिल्हा वकील संघ उपाध्यक्ष,ॲड.पि एच शेख जिल्हा न्यायालय बीड,वात्रटिकाकार सादोळकर, पत्रकार सुनिल डोंगरे,पत्रकार सतीश मुजमुले, पत्रकार गितांजली लव्हाळे, मॅडम,नागापुरे मॅडम यांच्यासह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. एपीआय अमन शिरसाट म्हणाले की लहान मुलांचे संस्कार हे आई-वडिलांवर अवलंबून असतात. यावेळी विविध मान्यवरांची भाषणे झाली. यावेळी पत्रकार सुनील डोंगरे म्हणाले की एक आदर्श वाचनालय खळगे सरांनी सुरू केले याचा अभिमान आ.हे सर्व विद्यार्थ्यांना व पालकांना मोलाचा संदेश या कार्यक्रमाच्या माध्यमातून देण्यात आला. त्यानंतर एक वर्दीतला गायक म्हणून आमन शिरसट यांनी शूर आम्ही सरदार आम्हाला काय कुणाची भीती हे गाणे गाऊन सर्वच उपस्थितांची मने जिंकली.

या कार्यक्रमाचे मुख्य आयोजक कु. विशाखा प्रकाश खळगे अध्यक्ष छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालय, श्री प्रकाश तुळशीराम खळगे सचिव छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालय,सौ पल्लवी विकास कोरडे ग्रंथपाल, साहाय्य - श्रीमती अग्नी अण्णाभाऊ खळगे,सहायक ग्रंथपाल शिलाताई ऊजगरे,श्री उदय निवृत्ती खरात, श्री सुखदेव संभाजी वावळ, श्री आनंद प्रकाश खळगे इत्यादी या कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित होते.

सविस्तर वृत्तांत असा आहे की,गेल्या २७ वर्षापासून सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, संस्कृतिक कार्यक्रम घेऊन ग्रामीण भागामध्ये व परिसरामध्ये एक वाचक चळवळ निर्माण करून सामाजिक सलोखा राखण्याचे काम करत आहे. या संस्कार केंद्रामध्ये नवनवीन उपक्रम राबवून विद्यार्थी पालक व समाजातील प्रत्येक घटकाला सोबत घेऊन सामाजिक सलोखा राखण्याचे विद्यार्थ्यांना वाचनालयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत आलेले आहे.

त्याचा खूप मोठा फायदा झालेला आहे. अनेक मुलींना आणि विद्यार्थ्यांना या संस्कार केंद्रापासून प्रेरणा मिळालेली आहे. प्रत्येक वर्षी राष्ट्रीय कार्यक्रमाच्या निमित्ताने शाळेमध्ये आणि संस्कार केंद्रामध्ये विविध सामान्य ज्ञान स्पर्धा, बुद्धिमत्ता स्पर्धा, खेळांच्या स्पर्धा घेऊन विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा विकास केला जातो.

मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा सुरू आहे. त्याचे औचित्य साधून ग्रंथालयाच्या वतीने भव्य पालक मेळावा व स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. अनेक विद्यार्थी विद्यार्थिनींनी नृत्य डान्स करून आलेल्या मान्यवरांची मने जिंकली. तरी या कार्यक्रमाला तालुक्यातील व परिसरातील मान्यवर आवर्जून उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आभार पत्रकार गितांजली लव्हाळे मॅडम यांनी मानले तर आलेल्या सर्वच पाहुण्यांचे अगदी मनापासून आभार प्रा. प्रकाश खळगे सर यांनी मानले.

गौरी ताडकळसकर यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त



दै, जनप्रभात छ.संभाजीनगर जिल्हा प्रतिनिधी ■ मोहन आखाडे

छत्रपती संभाजीनगर येथिल इरा इंटरनाशनल स्कुलच्या शिक्षका यांना माननीय शिक्षण मंत्री दीपक जी केसरकर यांच्या प्रमु उपस्थितीमध्ये पार पडलेल्या महाराष्ट्र इंग्लिश स्कूल ट्रस्टीज असोसिएशनच्या राज्यस्तरीय सांस्कृतिक महोत्सव व ९ वे रज्यस्तरीय अधिवेशन मध्ये इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल खुलताबाद छत्रपती संभाजीनगर शाळेच्या इन्चार्ज गौरी ताडकळसकर मॅडम यांना रज्यस्तरीय आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन प्राचार्या ,मुख्याध्यापक शिक्षक वुंद यांनी अभिनंदन केले

सुप्रसिद्ध अभिनेत्री दीप्ती भागवत व डॉ. निशिगंधा वाड यांनी देखील त्यांचे खूप खूप अभिनंदन केले.व त्यांना पुढिल वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा सर्वाच्या वतिने देण्यात आल्या.

अतिक्रमण धारकांना पाठीशी घालणाऱ्यावर कारवाई करून निलंबित करा

दै, जनप्रभात मराठवाडा उपसंपादक ■ राठोड रामेश पांडित

नांदेडः- नांदेड तालुक्यातील मौजे भायेगांव ग्रामपंचायत हद्दीमध्ये झालेले अतिक्रमणाविषयी वारंवार वरिष्ठांशी पत्र व्यवहार, तसेच तक्रारी अर्ज तसेच उपोषणाचा मार्ग अवलंबूनही आजपर्यंत कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही. अशी तक्रार पत्रकार यज्ञकांत कोल्हे यांनी विभागीय आयुक्त औरंगाबाद यांच्याकडे केली असल्याचे समजते.

या संदर्भात प्राप्त माहिती अशी की नांदेड तालुक्यातील मोजे भायगाव येथील काही नागरिकांनी रस्त्यावर अतिक्रमण केले आहे या अतिक्रमणाबाबत पत्रकार यज्ञकांत कोल्हे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सह पंचायत समिती नांदेड तसेच जिल्हाधिकारी नांदेड यांच्याकडे लेखी निवेदन दिले आहेत तरीसुद्धा अतिक्रमणधारकांवर कोणती कारवाई झाली नाही या उलट अतिक्रमणधारकाला कर्मचारी व अधिकारी पाठीशी घालीत असल्याचा आरोप पत्रकार यज्ञकांत कोल्हे यांनी आपल्या निवेदनात केला आहे. आपल्या तक्रारीची दखल घ्यावी म्हणून त्यांनी २५ जानेवारी रोजी आमरण उपोषण करणार असल्याची माहिती आहे. या प्रकरणात आतापर्यंत झालेल्या पाठपुरावा आणि चौकशी अहवालाची सत्यता पाहून तसेच त्याच्याकडून अहवाल मागवून घेवून संबधितावर कार्यवाही करण्यात यावी नसता मला नाईलाजास्तव मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.नांदेड यांच्या कार्यालयासमोर दि . २५ जानेवारी २४ रोजी पासून आमरण उपोषणास बसत आहे. अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते यज्ञकांत कोल्हे यांनी दिली आहे.

नरखेडात माझी शाळा ,सुंदर शाळा अभियानाचीनाची तयारी जोरात

तालुक्यातील अनुदानित विनाअनुदानित एकूण १९६ शाळांचा समावेश

नरखेड ■ अतुल दंढारे

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी शाळांमध्ये पायाभूत सोयी सुविधा वाढविणे, शिक्षणाबाबत स्पर्धात्मक वातावरण तयार करणे, विद्यार्थ्यांचा निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढविणे, आरोग्याविषयी जागरूकता बाळगणे, विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक साक्षरता निर्माण करणे या विषयावर उपक्रम राबवण्यासाठी शाळांना प्रोत्साहित करणे यासाठी राज्यात मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान जोरात राबविले जात आहे.

तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक, उच्च प्राथमिक, नगरपरिषद तसेच अनुदानित व विनाअनुदानित अश्या एकूण १९६ शाळामध्ये अभियान राबविणे सुरू आहे. शासन निर्णयानुसार तालुकास्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. त्यात गटविकास अधिकारी, नगर परिषदेचे मुख्याधिकारी, ज्येष्ठ विस्तार अधिकारी व व गटशिक्षणाधिकारी अधिकारी यांचा



समावेश आहे, ही समिती ११ केंद्रातील २२ शाळाची निवड करणार आहे. त्यात प्रत्येक केंद्रातून खाजगी एक व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या एका शाळेचा समावेश राहणार आहे.

राबविण्यात येणारे विविध उपक्रम त्यासाठी निश्चित केलेले गुणदान सहभागी असलेल्या या शाळांमध्ये या अभियाना अंतर्गत विविध उपक्रम लाविले जाणार असून यात शाळा व परिसराचे सौंदर्यीकरण १० गुण , विद्यार्थी व्यवस्थापन व न निर्णय प्रक्रियेची क्षमता १५ गुण शैक्षणिक गुणवत्ता व व्यक्तिमत्व विकास १० शाळेची इमारत व परिसराची स्वच्छता१०गुण , राष्ट्रीय एकात्मतेस प्रोत्साहनपर उपक्रम ५ गुण , विविध स्पर्धांचे आयोजन १० गुण अश्या ६० कुणासाठी उपक्रम राबविण्यात येणार आहे , तसेच आरोग्य आर्थिक साक्षरता कौशल्य विकास भौतिक सुविधा तंबाखूमुक्त प्लास्टिक मुक्त शाळा अशा उपक्रमावर भरसुद्धा दिला जाणार आहे.यात तालुक्यातून प्रथम क्रमांक प्राप्त करणाऱ्या शाळेस ३ लक्ष, द्वितीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या शाळेस २लक्ष,तर तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या शाळेत एक लक्ष रुपये पुरस्कार महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त होणार आहे. ही स्पर्धा जिल्हास्तरावर व राज्यस्तरावर सुद्धा राबविल्या जाणार आहे.

'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या अभियानातून तालुक्यातील जास्तीत जास्त शाळा आदर्श बनण्याचा आमचा प्रयत्न सुरू आहे यासाठी स्थानिक पालक व माजी विद्यार्थी यांचा सुद्धा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे '
प्रदीप कुमार जनबंधू
गटशिक्षणाधिकारी प स नरखेड

' माझी शाळा ,सुंदर शाळा हा महाराष्ट्र शासनाचा अतिशय चांगला उपक्रम असून यामुळे शैक्षणिक व्यवस्थेला बळकटी मिळू शकते. परिणामी शाळेला सुंदर रूप व आर्थिक मदत होऊ शकते .
गुलाबराव काळकर
मुख्याध्यापक तथा प्रभारी
प्रशासन अधिकारी नगर परिषद नरखेड

महाविद्यालय व विद्यार्थ्यांना शिष्यवृती योजनेचे अर्ज भरण्याचे आवाहन

वर्धा : सन २०२३-२४ शैक्षणिक सत्रासाठी मॅट्रीकोत्तर शिष्यवृती अर्ज भरण्यासाठी महाडीबीटी पोर्टल सुरू करण्यात आले आहे. महाविद्यालयात मॅट्रीकोत्तर प्रवेशित असलेल्या सर्व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचे भारत सरकार शिष्यवृत्ती, फ्रीशिप, व्यावसायिक शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती, व्यावसायिक शिक्षण देखभाल भत्ता योजनेसंबंधीचे अर्ज कागदपत्रे अपलोड करुन तत्काळ भरण्याचे आवाहन करण्यात आले आहे.शैक्षणिक सत्र २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ मधील प्रलंबित शिष्यवृती अर्ज निकाली काढण्यासाठी महाविद्यालयांना वारंवार सूचना देण्यात आल्या आहेत. त्याअनुषंगाने महाविद्यालयांनी प्रलंबित अर्ज तात्काळ प्रकल्प कार्यालयाच्या लॉगीनवर पाठविण्यात यावे.

शैक्षणिक सत्र सन २०२३-२४ शिष्यवृत्तीचे परीपुर्ण अर्ज विहित मुदतीत प्रकल्प कार्यालयास मंजुरीस पाठविण्यात यावे. विहित मुदतीत अर्ज सादर न केल्यामुळे विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास त्याची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही, असे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी दिपक हेडाऊ यांनी कळविले आहे.

ग्रंथालय पुरस्कारसाठी अर्ज आमंत्रित

वर्धा : राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयाचा गुणात्मक विकास व्हावा. ग्रंथालयाकडून जनतेला चांगल्या ग्रंथालय सेवा उपलब्ध व्हाव्यात, वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे. या उद्देशाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार तसेच भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. शियाली रामामृत रंगनाथन यांच्या नावाने डॉ.एस.आर.रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक पुरस्कार (ग्रंथमित्र) देण्यात येतो. या पुरस्कारासाठी अर्ज मागविण्यात आले आहे.सन २०२२-२३ च्या पुरस्कारासाठी इच्छूक असणारी ग्रंथालये, कार्यकर्ते व सेवक यांनी आपले विहित नमुन्यातील अर्ज दि.२२ जानेवारी ते दि.९ फेब्रुवारी पर्यंत तीन प्रतीत जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाकडे सादर करावे.

राज्यातील शहरी व ग्रामीण भागातील अ, ब, क व ड वर्गातील उत्कृष्ट शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना अनुक्रमे १ लक्ष, ७५ हजार, ५० हजार व २५ हजार रोख व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येते. तसेच राज्यातील एक राज्यस्तरीय उत्कृष्ट कार्यकर्ता व एक राज्यस्तरीय उत्कृष्ट ग्रंथालय सेवक यांना प्रत्येकी ५० हजार रोख व प्रमाणपत्र तसेच राज्यातील प्रत्येक महसूली विभागातील प्रत्येकी एक उत्कृष्ट कार्यकर्ता व उत्कृष्ट सेवक यांना २५ हजार रोख व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. असे जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुरज मडावी यांनी कळविले आहे.

ग्राहक रक्षक समितीमध्ये ३२ पदाधिकारींची नियुक्ती करण्यात आली

सातारा ■ जीवन मोहिते



ग्राहक रक्षक समिती व वसुंधरा परिवार सोशल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ग्राहक संरक्षण कायदा विषयक मार्गदर्शन व पदनियुक्ती कार्यक्रम रिलायन्स मॉल येथे आयोजित केला होता.सर्वसामान्य ग्राहकांच्या हितरक्षणासाठी व ग्राहकांची फसवणूक अथवा दिशाभूल करून करण्यात येणारी लूट थांबविण्यासाठी ग्राहक रक्षक समितीची स्थापना राष्ट्रीय अध्यक्षा डॉ आशा पाटील यांनी केली आहे. या ग्राहक रक्षक समितीमध्ये पुणे शहरच्या सामाजिक कार्यकर्त्या व वसुंधरा परिवार सोशल फाऊंडेशनच्या संस्थापिका अध्यक्षा योगिता गोसावी यांची महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षा या पदावर व संजीवनी महासचिव या पदावर नियुक्ती २४ डिसेंबर राष्ट्रीय ग्राहक दिनाच्या दिवशी नाशिक येथे करण्यात आली होती.

या संस्थेचा विस्तार करण्यासाठी व ग्राहकांना उत्तम सेवा देण्यासाठी योगिता गोसावी व शैलेंद्र निर्मळे यांनी अतिशय जल्लोषात ग्राहक रक्षक समितीमध्ये ३२ पदाधिकारींची नियुक्ती केली. या कार्यक्रमाची सुरुवात उषा वाणी यांच्या स्वागत गीताने झाली त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षा योगिता गोसावी यांनी ग्राहक संरक्षण विषयक कायद्याची माहिती देऊन सर्वांना मार्गदर्शन केले. मार्गदर्शन व मान्यवरांचे सत्कार झाल्यावर पदनियुक्ती करण्यात आली.

राहुल गुंड यांची पुणे जिल्हाध्यक्ष, मिलन पवार पुणे जिल्हाध्यक्ष महिला विभाग, धर्मेंद्र तिवारी पिंपरी चिंचवड अध्यक्ष, सीमा शिंदे पुणे शहर अध्यक्ष, श्यामल मोरे पुणे जिल्हा उपाध्यक्ष, राजश्री नाळे पुणे जिल्हा उपाध्यक्ष, स्वप्नील तलाठी पुणे जिल्हा सचिव, गजेंद्र भालेराव पुणे जिल्हा सहसचिव, सुजाता काकडे पुणे जिल्हा संपर्क प्र, स्नेहल हुले पुणे जिल्हा सहसंपर्क प्र, उषा घोगरे पुणे जिल्हा मार्गदर्शक, सुहास गोडसे पुणे जिल्हा सहसचिव, गीता वाघ पुणे जिल्हा सहसचिव, अनिता जोशी पुणे जिल्हा सल्लागार, रेश्मा केदारी पुणे शहर उपाध्यक्ष, गौरी उगले पुणे शहर प्रमुख, ?ड अश्विनी ठाकरे कायदेशीर सल्लागार, रमेश गायकवाड पुणे शहर सहसचिव, कोमल शिंदे पुणे शहर सहसचिव, पंचशीला कदम पुणे शहर संपर्कप्रमुख, मनीषा गायकवाड पुणे शहर सहसचिव, साजणा भुजबळ पुणे शहर प्रवक्ता, शोभा कमलाकर, एलिस लोबो, सुरेखा सोनवणे, अंजली चव्हाण, सरिता अहिर या सर्वांची पुणे शहर मार्गदर्शक, अर्चना भांडारी पुणे शहर संघटक, नीता नागवंशी पुणे शहर सहसंघटक व अरुणा जाधव पुणे शहर सदस्य या पदावर मान्यवरांच्या हस्ते पदनियुक्तीपत्र व ओळखपत्र प्रदान करून नियुक्ती करण्यात आली. यावेळेस संजीवनीताई बालगुडे, चेतनाताई बिडवे, रिपोर्टर मंगेश गांधी, डॉ राजेंद्र भवाळकर, अनिता शिंदे, श्याम पुणेकर इ मान्यवर उपस्थित होते.रिलायन्स मॉलचे मॅनेजर प्रतीक सर व उपस्थित सर्व मान्यवरांचे मनापासून धन्यवाद. या कार्यक्रमासाठी धर्मेंद्र तिवारी यांनी सहकार्य केले. सूत्रसंचालन अंजली चव्हाण व साजणा भुजबळ यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन वसुंधरा परिवारच्या संस्थापिका योगिता गोसावी यांनी केले होते.

सुराज्य निर्माण सेनेच्या खानदेश प्रभारी पदी विजय पाटील व मराठवाडा अध्यक्ष पदी पोळे यांची निवड

दै, जनप्रभात मराठवाडा उपसंपादक ■ राठोड रामेश पांडित



इंदापूर:- सुराज्य निर्माण सेनेचे प्रदेशाध्यक्ष शिवानंद मठपती व राज्य उपाध्यक्ष स्वप्नील कांबळे यांच्या आदेशानुसार सुराज्य निर्माण सेना महाराष्ट्र राज्य कार्यकारिणी सदस्य विजय पाटील यांची खानदेश प्रभारी म्हणून नियुक्त करण्यात आले त्यांना नाशिक,धुळे, नंदुरबार,जळगाव या जिल्हाचे प्रभारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. सुराज्य निर्माण सेना स्थापनेपासून विजय पाटील हे सुराज्य निर्माण सेनेचे काम करीत आहेत , लोकसभा निवडणुकीत त्यांनी धुळे लोकसभा मतदारसंघातून पक्षांला उमेदवार देऊन भामरे विरूद्ध भामरे अशी टक्कर त्यांनी लावले होते. सुराज्य निर्माण सेनेच्या माध्यमातून त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय व तहसिल कार्यालयावर मोर्चा काढून पक्ष वाढीसाठी काम केले आहे.त्याच बरोबर सुराज्य निर्माण सेनेचे महाराष्ट्र राज्य कार्यकारिणी सदस्य रमेश राठोड यांच्या आदेशानुसार मराठवाडा अध्यक्ष पदी विष्णू मोहन पोळे यांची निवड करण्यात आली आहे. पोळे यांनी पत्रकारांना बोलताना सांगितले की , सुराज्य निर्माण सेनेच्या माध्यमातून मराठवाडा विभागांमध्ये लातूर जिल्हा , बीड जिल्हा,परभणी जिल्हा , धाराशिव जिल्हा यामध्ये जिल्हाध्यक्ष यांची नियुक्ती करण्यात आली आहे उरलेल्या सर्व जिल्ह्यामध्ये जिल्हाध्यक्ष नियुक्ती करून लवकरच मराठवाडा पदाधिकारी यांचा मेळावा आयोजित करणार असल्याचे माहिती यावेळी मराठवाडा प्रमुख विष्णू पोळे यांनी दिली.

इंदापूर तहसील हिंदी अध्यापक संघ निबंध स्पर्धेचे आयोजन



सातारा ■ जीवन मोहिते

इंदापूर तहसील हिंदी अध्यापक संघ निबंध स्पर्धेमध्ये यशस्वी विद्यार्थी. इंदापूर यांच्यावतीने घेण्यात आलेल्या शाला अंतर्गत हिंदी निबंध स्पर्धेमध्ये खालील विद्यार्थ्यांनी स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त केले आहेत त्यांना इंदापूर तहसील हिंदी अध्यापक संघ यांच्या वतीने प्रमाणपत्र व शाळेला ट्रॉफी देऊन विद्यालयाचा सन्मान करण्यात आला सदरचा सन्मान विद्यालयाचे प्राचार्य चंद्रकांत रणवरे सर यांनी केतकेश्वर सांस्कृतिक भवन निमगाव केतकी येथे पुणे शिक्षण विभागाचे माजी आमदार माननीय दत्तात्रय सावंत सर यांच्या उपस्थितीत व पुणे जिल्हा हिंदी अध्यापक संघाचे अध्यक्ष श्री शिंदे सर यांच्या हस्ते स्वीकारला गटानुसार क्रमांक आलेले खालील प्रमाणे विद्यार्थी आहेत

इयत्ता पाचवी सहावी १. नेहा संतोष रणवरे २. भावार्थ संतोष कारंडे ३. वेदांत सचिन कारंडे इयत्ता सातवी आठवी १. वैष्णवी शिवाजी शेळके २. वैष्णवी शिवाजी शेंडगे ३. राधिका धुळदेव शिंदे इयत्ता नववी दहावी १. स्नेहल भानुदास भुजबळ २. साजिया बरकत अली डांगे ३. शिवानी संतोष रणवरे वरील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे विद्यालयाच्या व संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन.

सामाजीक चळवळीतील कार्यकर्त्यांचा सन्मान व्हावा : सिध्दार्थकुमार सूर्यवंशी

दै, जनप्रभात मराठवाडा उपसंपादक ■ राठोड रामेश पांडित



अहमदपूर:- के कार्यकर्ता घडण्यासाठी आयुष्यातील किमान पंचविस वर्ष खर्च करावे लागतात तेंव्हा कूठे एक सजग कार्यकर्त्याचा जन्म होतो.समाजातील सर्वच प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी कूठलाही कार्यकर्ता हा आग्रही भूमिका घेत असतो तेंव्हा सामाजिक क्षेत्रात बरोबर विविध क्षेत्रात काम करणाऱ्या अशा कार्यकर्त्यांचा समाजाने सन्मान करावा अशी अपेक्षा युवकनेते डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांनी व्यक्त केली.

येथील विश्रामगृह येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते गोपीनाथराव जोंधळे यांच्या अभिष्टचिंतन कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

अध्यक्षस्थानी माजी आमदार रामभाऊ गूंडीले हे होते.या प्रसंगी पूढे बोलताना डॉ.सिध्दार्थकूमार सूर्यवंशी म्हणाले की,ज्या प्रमाणे एखाद्या बिया पासून अंकुर फूटून नवे झाड तयार होते त्याच प्रमाणे एक कार्यकर्ता घडत असतो.परंतू एखादा कार्यकर्ता पूढे जावू पहात असेल तर सर्व समाज घटकांनी त्याला प्रोत्साहित करून पूढे पाठविले पाहीजे मात्र प्रस्थापीत व्यवस्थेच्या विचारांची माणसं वृक्षरूपी कार्यकर्त्यांचा अंकुर खूडण्याचे पाप करीत आहेत.ही बाब चळवळीतील कार्यकर्त्यांसाठी पर्यायाने चळवळीसाठी घातक आहे.कार्यकर्ता हा गूण दोषासहित स्वीकारून त्याच्यातील चांगल्या गोष्टीचा पूरस्कार करत समाजव्यवस्थेच्यासाठी,प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी त्याचा वापर करून घेणे गरजेचे आहे अशी भूमिका मांडली.तसेच कार्यकर्ता म्हटला की,तो कामासाठी सज्ज असला पाहिजे फक्त नावापुरताच कार्यकर्ता असने हे सूध्दा चुकीचे असल्याचे प्रतिपादन केले.

या प्रसंगी सत्कारमूर्ती गोपीनाथराव जोंधळे,शिक्षक संघटनेचे विभागीय अध्यक्ष बाबासाहेब वाघमारे,रिपाई नेते अरूणभाऊ वाघंबर,पोलिस उपनिरीक्षक प्रभाकर अंधोरीकर, माजी नगराध्यक्ष सरस्वतीबाई कांबळे,संतोष गायकवाड,पत्रकार शिवाजीराव गायकवाड,भिमराव कांबळे,प्रभाकर गायकवाड चिखलीकर आदींनी मनोगत व्यक्त केली.

माजी आमदार रामभाऊ गूंडीले यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना म्हटले की,सर्वच कार्यकर्त्यांसाठी आजचा काळ अतिशय कठीण असून आपल्यातील एकी हीच महत्वाची बाब आहे.आपापल्या मधे स्पर्धा जरूर असावी मात्र सूप्त संघर्ष असता कामा नये.सूप्त संघर्ष हेच आपल्या अधोगतीचे कारण ठरू शकते असे प्रतिपादन केले.

सत्कारमूर्ती गोपीनाथराव जोंधळे म्हणाले की,आंबेडकरी चळवळ मी प्रामाणिक पणे काम करत आलो आहे.मताच्या पेटीतून मी नेता म्हणून पूढे आलो आहे.त्यामुळेच तालूकास्तरावर सक्रीय पणे कार्यरत आहे.भविष्यात याच्या पेक्षा अधिक गतीने काम करून चळवळीतील कूठल्याही कार्यकर्त्यांच्या पाठीशी खंबीरपणे थांबण्याची आपली भूमीका आहे.तालुक्याला दिशादर्शक चळवळ असावी यासाठी आपला पूढाकार असणार आहे अशी माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाबासाहेब वाघमारे गुरूजी यांनी केले तर आभार रिपाई नेते अरूणभाऊ वाघंबर यांनी मानले.या प्रसंगी सचिन बानाटे, डॉ.बालाजी थिट्टे, बजरंग गायकवाड,माधव बनसोडे, बालाजी बनसोडे,पत्रकार गणेश मूंडे, मनोहर गायकवाड, धम्मानंद कांबळे,संतोष गायकवाड, बालाजी थिट्टे, माधव बनसोडे, गौतम बनसोडे, कलीमभाई अहमद, मिलिंद कांबळे, माधवराव रायभोळे आदींची उपस्थित होते.

बंदीभागात विजेचा लंपडाव मुळे मुरली जेवली गावातील नागरिक त्रस्त



उमरखेड ■ लखन जाधव

तालुक्यातील अतिदुर्गम जंगल भागातील मुरली जेवली परीसरात मागील दोन तीन दिवसांपासून विजेचा लपंडाव सारखा होत आहे या भागातील लोकांची रात्र ही अंधारात जात आहे या भागात पुन्हा पुन्हा विजेचा लपंडाव होत आहे महावितरण कर्मचारी यांनी विजेचा लंपडाव कशामुळे होत आहे यांची पाहणी करून या भागातील विजेचा लंपडाव प्रश्न सोडवा अशी मागनी या भागातील गावकरी करत आहे.

कंत्राटी डॉक्टरांना करता येईल खासगीत प्रॅक्टिस;राज्य सरकारच्या परिपत्रकाला स्थगिती

दै, जनप्रभात मराठवाडा उपसंपादक ■ राठोड रामेश पांडित



3 WP.7807.2021 AS.doc

IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY
CIVIL APPELLATE JURISDICTION
WRIT PETITION NO. 7807 OF 2021

Bargaje Ashok Shivajirao & Ors. ...Petitioners
Versus
The State of Maharashtra & Ors. ...Respondents

Mr. Sangram Chinnappa, for the Petitioners.
Mr. B. V. Samant, AGP for the State.

CORAM : DHIRAJ SINGH THAKUR AND SANDEEP V. MARNE, JJ.

DATE : 17th JULY, 2025.

P.C.:

The Petitioners are working on contractual basis as Doctors under the National Health Mission (NHM). Some of the Petitioners have been engaged on an yearly basis with extensions granted from time to time since 2008. The Petitioners are getting paid a contractual sum ranging from Rs. 25,000/- to Rs. 30,000/- per month.

The grievance of the Petitioners is that for the first time in the year 2021, by virtue of circular dated 12th April, 2021 issued by the

1 of 4

मुंबई:- राष्ट्रीय आरोग्य अभियानान्तर्गत कंत्राटी पद्धतीने नियुक्त केलेल्या डॉक्टरांना खासगीत प्रॅक्टिस करण्यास मनाई करणाऱ्या परिपत्रकाला उच्च न्यायालयाने तात्पुरती स्थगिती दिल्याने या डॉक्टरांना खासगीत प्रॅक्टिस करता येणार आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियान,आरोग्य सेवा संचालकांनी १२ एप्रिल २०२१ रोजी परिपत्रक काढून कंत्राटी पद्धतीने नियुक्त केलेल्या डॉक्टरांना खासगी प्रॅक्टिस व अन्य कामे करण्यास मनाई केली होती.या परिपत्रकाला काही डॉक्टरांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले होते.त्यावरील सुनावणी न्या.धीराजसिंग ठाकूर व न्या.संदीप मारणे यांच्या खन्डपीठापुढे होती.याचिकाकर्ते २००८ पासून कंत्राटी पद्धतीने काम करीत आहेत.

न्यायालय म्हणाले ??आमच्या मते, २००८ पासून किंवा त्यानंतर कंत्राटी पद्धतीने नेमलेले डॉक्टर दरमहा २५ ते ३० हजार इतक्या तुटपुंज्या भत्त्यावर काम करीत आहेत. त्यांच्या कामाची वेळ सकाळी ८:४५ ते संध्याकाळी ५:३० पर्यंत निश्चित करण्यात आली आहे.

?? ड्कामकाजाच्या वेळेनंतरही त्यांना खासगीमध्ये प्रॅक्टिस करण्यास मनाई करणे ,हे कठोर आहे.सरकार प्रॅक्टिस न करण्याच्या वेळेचा भत्ताही देत नाही, असे याचिकादाराचे म्हणणे आहे.

डॉक्टरांना खासगीत प्रॅक्टिस करण्यापासून रोखले नाही तर सरकारी रुग्णालयात हे काम करणार नाहीत.ते सरकारी रुग्णालयात काम करण्यापासून दूर पळतील,असे सरकारचे म्हणणे वाजवी नाही,त्यामुळे परिपत्रकाला स्थगिती देत आहोत.

कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र येथे प्लेसमेंट ड्राईव्ह

वर्धा ■ प्रतिनिधी

जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र येथे दर महिन्याच्या मंगळवारला प्लेसमेंट ड्राईव्ह सुरु करण्यात आले आहे. या प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये महाराष्ट्रातील अनेक नामवंत कंपन्यांना आमंत्रित करण्यात येणार असून जिल्ह्यातील नोकरी इच्छुक उमेदवारांना नोकरी प्राप्त करण्याची संधी मिळणार आहे.

पुढील मंगळवारला कोणती कंपनी व कुठल्या शैक्षणिक पात्रता अपेक्षित राहणार याबाबतची माहिती वृत्तपत्रातून प्रसिध्दी करण्यात येणार आहे. जेणे करुन उमेदवारांना पूर्वीच कल्पना मिळेल या संधीचा नोकरी इच्छुक उमेदवारांनी लाभ घ्यावा. दि.२३ जानेवारी होणा-या प्लेसमेंट ड्राईव्ह मध्ये सन्सूर सृष्टी इंडिया प्रा.लि. ही कंपनी सहभागी होणार असून त्यांच्याकडे असलेल्या शाखा व्यवस्थापक २० पदासाठी निवड करण्यात येणार आहे, असे जिल्हा कौशल्य विकास व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहाय्यक आयुक्तानी कळविले आहे.

लातूर मध्ये खाजगी शिकवणी चालकाकडून दहावीतील अल्पवयीन विद्यार्थिनीचा विनयभंग

आरोपीविरोधात पोक्सोअंतर्गत गुन्हा, पोलिसांनी आवळल्या आरोपीच्या मुसक्या

दै, जनप्रभात मराठवाडा उपसंपादक ■ राठोड रामेश पांडित



लातूर:-लातूर येथील एका खाजगी शिकवणी चालकाने शिकवणीसाठी आलेल्या दहावीतील अल्पवयीन मुलीला वाईट हेतुने आतील खोलीत नेत, तिचा हात पकडून, अश्लिल चाळे करीत तिच्यावर दुष्कर्म करण्याचा प्रयत्न केला असल्याची धक्कादायक घटना घडली असून ,पीडितेने त्या नराधमाच्या तावडीतून स्वतःची सुटका करून घेत पोलिसांकडे धाव घेतली. याप्रकरणी शिकवणी चालक आरोपी सागर मांडे याच्याविरोधात बाल लैंगिक अत्याचार अंतर्गत पोक्सोचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी सांगितले, येथील खाजगी ट्यूशनमधील सागर मांडे याचे शिकवणी वर्ग चालतात. त्याच्याकडे अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनी शिकवणीसाठी येतात, गुरूवारी (दि. १८) सायंकाळी पाच ते सहा वाजेच्या सुमारास आरोपी शिकवणी चालक सागर मांडे हा त्याच्या शिकवणी वर्गात होता. त्याने जाणीवपूर्वक शिकवणीला आलेल्या दहावीतील अल्पवयीन विद्यार्थिनीला एकटीला थांबविले. सदर पीडितेने मला का थांबविले, असे विचारताच मांडे राने तिला पाणी आणण्यास सांगितले. मुलीने त्याला पाणी आणून देताच वाईट हेतुने मांडे याने विद्यार्थिनीचा हात धरला. तिला आतोल खोलीत घेऊन गेला. यामुळे पीडित विद्यार्थिनी

गांगारून गेली, त्याचवेळी मांडे याने आतील खोलीच्या दरवाजाची कड़ी लावून घेत विद्यार्थिनीशी वाइंट उद्देशाने तिला स्पर्श केला. तिच्यासोबत झोंबाझोंबी करू लागला, पीडित मुलीने रडण्यास सुरूवात केली, कसेबसे त्याच्या तावडीतून सुटून दरवाजाची कडी घडून शिकवणी वर्गात आली. त्यावेळी मांडेही तिच्या भागे वर्गात आला. त्याने रडत असलेल्या विद्यार्थिनीला घडलेला प्रकार कोणाला सांगितला तर 'तुझ्यासह माझ्याकडे शिकवणीला असलेल्या तुझ्या लहान भावाला जीवे मारून टाकतो', अशी धमकी दिली,सदर पीडितेने शिकवणीवरून घरी येताच घडला प्रकार आई-वडिलांच्या कानावर घातला, पीडितेच्या फिर्यादीवरून लातूरच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात आरोपी सागर मांडे याच्याविरोधात बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत 'पोक्सो'चा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास शिवाजी नगर पोलीस ठाण्याच्या सहायक पोलीस निरीक्षक मनीषा लटपटे व हेड कॉन्स्टेबल अनिल कांबळे हे करीत आहेत. या प्रकरणातील आरोपी सागर मांडे याला शिवाजीनगर पोलिसांनी अटक केली आहे. न्यायालयासमोर हजर केले असता त्याला न्यायालयाने १४ दिवसांची न्यावालवीन कोठडी सुनावली आहे.

पीडित विद्यार्थिनींनी पोलिसांशी संपर्क साधावा

लातूर शहरात मोठ्या प्रमाणावर खाजगी शिकवणी वर्ग चालतात, त्याचप्रमाणे शाळाही मोठ्या प्रमाणावर आहेत. शिकवणी चालक व शाळेचे शिक्षक विद्यार्थ्यांचा गैरफायदा घेऊन त्यांची शारिरीक पिळवणूक करतात, ज्या विद्याथ्यर्थ्यांसमवेत, पीडितेसोबत असे प्रकार घडत आहेत, अशा पीडित विद्यार्थिनींनी पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या सहायक पोलीस निरीक्षक मनीषा लटपटे यांनी केले आहे

धम्म विचारांवर मन शुद्ध ठेवून वाटचाल करावी : भन्ते दिंपकर



सातारा ■ जीवन मोहिते

काल्पनीक बाबीवर लक्ष्य देवु नये. बुद्धांच्या धम्म विचारांवर बाबासाहेबानी दिलेल्या मार्गावर वाटचाल करणे गरजेचे आहे.तेव्हा आपल्याच असणाऱ्या आदर्शावर मन शुद्ध ठेवून वाटचाल करावी. असे आवाहन भन्ते दिंपकर यांनी केले.

धम्मदीक्षा वर्धापनदिन खेड - नांदगिरी,ता. कोरेगाव येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. तेव्हा भन्ते दिंपकर यांनी धम्मदेसना दिली.

अध्यक्षस्थानावरून बोलताना मिलिंद माने म्हणाले, 'धम्माचरण करणे गरजेचे आहे. धम्म खरे जीवन जगण्यास प्रवृत्त करीत असतो. धम्माचे अधिष्ठान महत्वाचे आहे.संविधान साक्षर समाज झाला पाहिजे.' भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष (पू.)श्रीमंत घोरपडे यांनी २२ प्रतिज्ञा व धमदीक्षा उपस्थितांना दिली.यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे सातारा तालुकाध्यक्ष आबासाहेब दणाने, धम्मबांधवचे प्रमुख अनिल वीर, रिपब्लिकन सेनेचे प.महाराष्ट्र अध्यक्ष चंद्रकांत खंडाईत, जिल्हाध्यक्ष विशाल भोसले,राष्ट्रोत्सव संयोजन समितीचे ?ड.विलास वहागावकर, रमेश गौंड आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी अनेक मान्यवरांनी मनोगत व्यक्त केली.यावेळी ६२ महिला व २५ पुरुष यांनी धम्मदीक्षा घेतली. प्रदीप मोरे यांनी आभारप्रदर्शन केले. सदरच्या कार्यक्रमास जिल्हा,तालुका पदाधिकारी, बौद्धाचार्य,उपासक व उपासिका मोठ्या संख्येनी उपस्थित होत्या.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक,मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर,नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय,नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक,मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242